नववर्षाभिनंदन

मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी, २०१९• पृष्ठे १३२• किंमत : ₹ १५
• वर्ष एकोणिसावे • अंक पहिला

ही वाट कुणी मंतरली, जग झाले बघ झुलणारे
या अनाम हिंदोळ्याला, नभ नवे देऊ या का रे?

आवर्जून वाचावे

पुस्तकांचं गाव भिलार येथे लेखक-प्रकाशक संमेलन नुकतंच पार पडलं. त्या संमेलनात **'वाचनसंस्कृती'** या विषयावर एक परिसंवाद घेण्यात आला. **त्या परिसंवादात बोलताना मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता.** त्यांच्यासह व्यासपीठावर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे मावळते अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, चित्रकार रवि-मुकुल, लेखिका हर्षदा भुरे -बावनकर.

एकाच घरातील तीन पिढ्यांच्या तीन पुस्तकांचं एकत्रित प्रकाशन करण्याचा योग नुकताच जुळून आला. पु. श्री. काळे यांचं 'ललित कलेच्या सहवासात', व. पु. काळे यांचं 'जपुन टाक पाऊल' आणि स्वाती चांदोरकर यांचं 'शेष'... ही अनुक्रमे तीन पिढ्यांची तीन पुस्तकं. या **पुस्तकांचं प्रकाशन करताना ज्येष्ठ अभिनेता विक्रम गोखले, ज्येष्ठ अभिनेता शरद पोंक्षे, लेखिका स्वाती चांदोरकर आणि संयोजक.**

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जानेवारी २०१९ ◆ वर्ष एकोणिसावे ◆ अंक पहिला

संपादक :
सुनील मेहता
कार्यकारी संपादक :
शंकर सारडा
संपादन साहाय्य :
अंजली पटवर्धन
अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.
प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस
मांडणी-अक्षरजुळणी
मेहता पब्लिशिंग हाऊस
संपादक-मुद्रक-प्रकाशक :
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले
कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन
भवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/
२४४७५४६२
mmgj@mehtapublishinghouse.com

— अनुक्रमणिका —

संपादकीय ४
प्रतिक्रिया : प्र. चिं. शेजवलकर ८
पुरस्कार १२
दिनविशेष १४
स्मरण २०
पुस्तक परिचय
शेष ३०
फुल ब्लॅक ४०
हाउ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाइफ ५०
डेमोक्रसीज इलेव्हन ६०
तरंग ७०
थिंक युवरसेल्फ गॉर्जियस ८८
द माइंड जिम रिलेशनशिप्स ९४
ललितकलेच्या सहवासात १०४
जपुन टाक पाऊल! ११४
अभिप्राय
अमृतवेल १२०
बालनगरी १२४
द कॉमेडी ऑफ एरर्स

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune 411 030. Editor-Sunil Anil Mehta.

संपादकीय

आमची ग्रंथसूची

वाचन संस्कृतीच्या बाबतीत चिंता व्यक्त केली जात असतानाही वर्तमानपत्रांच्या रविवारच्या पुरवण्यांमध्ये पुस्तक परिचय, पुस्तकांच्या जाहिराती यांनी रकानेच्या रकाने भरलेले दिसतात. अर्थातच साहित्याचं क्षितिज सतत विस्तारतंच आहे. प्रकाशक विविध पुस्तकांच्या निर्मितीच्या निमित्ताने या विस्तारणाऱ्या क्षितिजाचा एक साक्षीदार असतो. आमचं (मेहता पब्लिशिंग हाऊस) क्षितिज सामावलेलं आहे आमच्या ग्रंथसूचीमध्ये. आमच्या बेचाळीस वर्षांच्या वाटचालीत असंख्य पुस्तकांची निर्मिती आम्ही केली. आमच्या या ग्रंथसूचीच्या नुसत्या अनुक्रमणिकेवर नजर टाकली तरी संख्यात्मकता, गुणात्मकता आणि वैविध्याचा प्रत्यय येतो.

आनंद यादव, शिवाजी सावंत, रणजित देसाई, शान्ता शेळके, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा.मिरासदार, रत्नाकर मतकरी, व.पु. काळे, सुधा मूर्ती इ. दिग्गज साहित्यिकांच्या साहित्यकृतींनी सजलेलं आमचं दालन पाहताना आमचं आम्हालाच आश्चर्य वाटतं. शब्दांशी, भावनांशी, विचारांशी असलेली माणसाची बांधिलकी त्याला लिहायला प्रवृत्त करते आणि प्रकाशक त्याला मूर्त रूप देतो. सर्वसामान्य माणसाच्या सुख-दुःखाला भिडणाऱ्या 'वपुं'च्या कथा असोत किंवा जीवनातील वास्तवाला स्पर्श करून आदर्शाकडे झेपावू पाहणाऱ्या वि.स.खांडेकरांच्या कादंबऱ्या, मिरासदारांच्या खळाळून हसवणाऱ्या कथा असोत की शंकर पाटलांच्या मनोवास्तवावर प्रकाश टाकणाऱ्या ग्रामीण कथा, आनंद यादव यांच्या ग्रामीण जीवनाचं वास्तव दर्शन घडवणाऱ्या साहित्यकृती असोत की व्यंकटेश माडगूळकरांच्या माणूस आणि निसर्गाचा वेध घेणाऱ्या साहित्यकृती...या सगळ्यातून जीवनाचं जे विविधांगी, सखोल दर्शन घडतं, ते वाचकाला स्तिमित आणि समृद्ध करणारं आहे. असं जीवनाचं समृद्ध दर्शन घडविणाऱ्या अनेकानेक साहित्यकृती आमच्या दालनात आहेत.

काय नाहीये आमच्या या दालनात? राजकीय पुस्तकं आहेत, वैज्ञानिक पुस्तकं आहेत, ऐतिहासिक पुस्तकं आहेत, ललित पुस्तकं आहेत, स्वतंत्र आत्मकथनं आहेत, काव्यसंग्रह आहेत, अनुवादित आत्मकथनं आहेत, ललितलेखसंग्रह आहेत, व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकं आहेत, आध्यात्मिक, संशोधनात्मक इ. इ. ही यादी खूप मोठी आहे. या पुस्तकांच्या माध्यमातून भावनांचा, विचारांचा एक सागरच वाचकांच्या भेटीला येतो, ज्याचा अंत दृष्टिपथात येत नाही. अर्थातच हे अथांगपणच माणसाला त्याच्या मर्यादांची जाणीव करून देत असतं, तसंच प्रेरितही करत असतं, जगण्याचा अर्थ शोधायला प्रवृत्त करत असतं...हे सगळे तरंग अनुभवण्यासाठी आमची ग्रंथसूची तुम्हाला मदत करते. सूची बघा आणि तुम्हाला आवडतील ती पुस्तकं घ्या.

आमचं बालसाहित्याचं दालनही असंच वेगवेगळ्या पुस्तकांनी खचाखच भरलेलं आहे. बाल-कुमार गटाचं ज्ञानरंजन आणि मनोरंजन करणारी ही पुस्तकं आहेत. त्यात अद्‌भुतरम्य कथा आहेत, बोधकथा आहेत, बिरबल, तेनालीरामसारख्या, फ्रँकलिनसारख्या मालिका आहेत आणि आता शेक्सपिअरच्या बावीस पुस्तकांची मालिका आम्ही कुमार वाचकांच्या भेटीला आणली आहे.

डॉ. आनंद यादव यांची 'झोंबी', रणजित देसाईंची 'श्रीमानयोगी', वि. स. खांडेकरांची 'ययाति', तसलिमा नासरिन यांची 'लज्जा', मंजुश्री गोखले यांची 'तुकयाची आवली', व. पु. काळे यांची 'पार्टनर' इ. आमच्या बेस्टसेलर कादंबऱ्या आहेत. 'वपुं'चे 'मोडेन पण वाकणार नाही', 'दोस्त', 'सखी' हे कथासंग्रह, सुधा मूर्तींचे 'वाइज अँड अदरवाइज', 'गोष्टी माणसांच्या' हे कथासंग्रह, शंकर पाटील यांचे 'ताजमहालमध्ये सरपंच','धिंड', 'पाटलांची चंची' हे कथासंग्रह इ. आमचे बेस्टसेलर कथासंग्रह आहेत. नसीमा हुरजूक यांचं 'चाकाची खुर्ची' हे आत्मकथन, डॉ. सुनीलकुमार लवटे यांचं 'खाली जमीन वर आकाश' हे आत्मकथन इ. आमची बेस्टसेलर आत्मकथनं आहेत. आमची ही बेस्ट सेलर पुस्तकांची यादीही खूप मोठी आहे; पण जी पुस्तकं बेस्ट सेलर नाहीत ती वाचनीय नाहीत असं मात्र नाही. वाचकांनी आमच्या सूचीद्वारे अन्यही पुस्तकांची निवड करावी आणि त्यांना 'बेस्ट सेलर' ठरवावं; कारण जीवनाचा परीघ

विस्तारायचा असेल तर वेगवेगळ्या प्रकारची पुस्तकं वाचली पाहिजेत. रणजित देसाई, माधवी देसाई, डॉ. आनंद यादव, व्यंकटेश माडगूळकर, वि. स. खांडेकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार , रत्नाकर मतकरी, शान्ता शेळके, व. पु. काळे इ. साहित्यिकांनी लेखन ही साधना मानली आणि ते लिहीत राहिले, हे आमच्या सूचीतील त्यांच्या साहित्यकृतींच्या संकलनावरून सहज लक्षात येतं आणि त्यांच्या साधनेला सलाम करावासा वाटतो.

अनुवादित पुस्तकांचा आमचा विभागही वैविध्यपूर्णतेने नटलेला आहे. इंग्रजीतील साहित्य आम्ही प्राधान्याने मराठीत आणलं. त्यात परदेशी लेखकांच्या साहित्यकृतींचा समावेश आहे. जेफ्री आर्चर, डॅन ब्राऊन, रॉबिन कुक इ. लेखकांच्या 'ॲण्ड देअरबाय हँग्ज अ टेल', 'एन्जल्स ॲण्ड डेमन्स', 'टॉक्सीन' इ. रहस्यमय इंग्रजी कादंबऱ्या तर आम्ही मराठीत आणल्याच; पण परदेशी लेखकांनी लिहिलेली 'हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाईफ', 'लाइफ विदाउट लिमिट्स' इ. आत्मकथनं, 'माय डॉटर माय मदर', 'नागासाकी' इ. सत्यकथा इंग्रजीतून मराठीत आणल्या. ओशोंची इंग्रजीत ग्रंथरूपाने शब्दबद्ध झालेली प्रवचनं अनुवादित स्वरूपात वाचकांसमोर आणली. सुधा मूर्ती, अरुण शौरी, किरण बेदी इ. भारतीय लेखकांनी इंग्रजीत लिहिलेल्या विविध पुस्तकांना आम्ही मराठीचं कोंदण दिलं. बंगालीतील काही साहित्यकृती मराठीत आणण्याचं श्रेय आमचंच. शरच्चंद्रबाबूंची 'देवदास' कादंबरी हे त्याचं ठळक उदाहरण. दिनकर जोषी, ध्रुव भट्ट यांच्यासारख्या दिग्गज लेखकांच्या गुजराती भाषेतील 'कालपुरुष,' 'अतरापी'सारख्या साहित्यकृतींना मराठी अनुवादाचा साज चढवला. एस. एल. भैरप्पा यांच्या 'वंशवृक्ष,' 'पर्व' इ. सारख्या मूळ कन्नड भाषेतील साहित्यकृती अनुवादित स्वरूपात आमच्या संग्रही आहेत. अनुवादित साहित्यामुळे त्या त्या देशातील, राज्यातील, प्रदेशातील, प्रांतातील संस्कृती, सामाजिक परिस्थिती, चालीरीती इ. बाबींचं दर्शन वाचकाला घडतं.

समाजविज्ञानकोश, माहितीकोश, शब्दकोश यांसारखं कोशवाङ्मय, संकीर्ण, आध्यात्मिक, संशोधनात्मक इ.इ. अनेक विभागांत विभागलेल्या आमच्या सूचीची ही केवळ एक झलक आहे. आम्हाला वेळोवेळी मिळालेले

पुरस्कार, आमची कोणती पुस्तकं बेस्ट सेलर आहेत, कोणती ई-बुक स्वरूपात उपलब्ध आहेत, कोणती पुस्तकं नवीन आहेत आणि कोणत्या पुस्तकांची आवृत्ती संपली आहे, याचंही दिग्दर्शन ही सूची करते. याखेरीज वाचकांसाठी असलेल्या आमच्या योजना, वाचकांचे आमच्यापर्यंत पोचण्याचे मार्ग याविषयी सूचीतून माहिती मिळू शकते. आमच्या या सूचीला आतापर्यंत 'द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स'तर्फे सहा पुरस्कार लाभले आहेत.

'गागर मे सागर' असलेली आमची ही ग्रंथसूची इतकी व्यापक, वैविध्यपूर्ण आहे, की एम.फिल., पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रबंधिकेसाठी/प्रबंधासाठी चांगले, नावीन्यपूर्ण विषय मिळू शकतात, साहित्य संमेलनात भरवल्या जाणाऱ्या परिसंवादांसाठी दर्जेदार, नवीन विषय मिळू शकतात. त्याच त्याच विषयांभोवती फिरणाऱ्या हिंदी/मराठी मालिकांनाही या सूचीतून विविध विषय प्राप्त होऊ शकतात.

तेव्हा आमची ही ग्रंथसूची वाचकांना, अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना खुणावते आहे, नवीन वर्षात खूप काही वाचण्यासाठी, अभ्यासण्यासाठी.... या... बघा... निवडा...वाचा...अनुभवा आणि समृद्ध व्हा!

आपलं मानवी जीवन अनेक निष्ठांच्या बळावर जगलं जातं.
साहित्यातून याच निष्ठा साकारत असतात.

- रणजित देसाई

प्रतिक्रिया

मेहता मराठी ग्रंथजगतला मिळालेली ही एक अभ्यासपूर्ण आणि बोलकी पत्ररूपी प्रतिक्रिया

||श्री||

दिनांक :१४/१२/२०१८

माननीय श्री. सुनील मेहता
सप्रेम नमस्कार

'मेहता मराठी ग्रंथ जगत' हा तुम्ही अगत्यपूर्वक अनेक वर्ष पाठवत असलेला अंक मी नेहमी आंनदानं आणि बारकाईनं वाचतो. या अंकामधे तुम्ही देत असलेला पुस्तक परिचय हा विभाग मला अतिशय उपयोगी पडतो. त्यामधे असलेले अभिप्राय माझी उत्सुकता वाढवतात. आणि त्यातील बरीच पुस्तकं मी वाचतो. डिसेंबर २०१८ च्या अंकातील सर्वच पुस्तकांचे अभिप्राय वाचनीय आहेत.

तुमच्या आणि शंकर सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिध्द होत असलेले अंक मराठी साहित्य क्षेत्रात वैभवशाली वाटावेत असे आहेत. तुमचे हे अंक चोखंदळपणे तयार केलेले असतात.

याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार.

तुमचा

(प्र.चिं.शेजवलकर)
अध्यक्ष, आदर्श शिक्षण मंडळी

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाच्या त्रैवार्षिक आणि पंचवार्षिक वर्गणीत आम्ही १५ ऑगस्ट २०१८ पासून बदल केला आहे,

याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आमच्या छापील अंकाच्या वर्गणीतील बदल खालीलप्रमाणे

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

अधिक माहितीसाठी संपर्क

wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

eBooks

www.amazon.in

play.google.com

Online पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

पुरस्कार



संवादु अनुवादु' आणि 'मरी मरी जाय सरीर'ला साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचा पुरस्कार

पुणे : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (मुंबई) आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळ (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात नुकतंच चौतिसाव्या स्त्री साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्या संमेलनाच्या समारोपप्रसंगी वार्षिक पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. डॉ. उमा कुलकर्णी यांना त्यांच्या 'संवादु अनुवादु' या आत्मकथनासाठी पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

योजना यादव यांच्या 'मरी मरी जाय सरीर' या काव्यसंग्रहालाही साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचा पुरस्कार प्राप्त झाला. त्यांच्या वतीने हा पुरस्कार डॉ. उमा कुलकर्णी यांनी स्वीकारला.

'रेझोनान्स'ला पुणे मराठी ग्रंथालयाचा पुरस्कार

पुणे : पुणे मराठी ग्रंथालयातर्फे या वर्षी अजय पांडे लिखित आणि उज्ज्वला गोखले अनुवादित 'रेझोनान्स' या कादंबरीला उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्काराने गौरविण्यात आले. कै. श्री. मधुसूदन मुकुंद शारंगपाणी यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार देण्यात आला. पाच हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुणे मराठी ग्रंथालयाच्या केशव सभागृहात नुकताच हा पुरस्कार वितरण समारंभ पार पडला.

❖

७वी आवृत्ती

॥ वारी ॥

व्यंकटेश माडगूळकर

किंमत : १२०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

अर्जुना पंढरीची 'वारी' करून पुन्हा आपल्या खोपटात आला होता, ...पण पांडुरंगाचं दर्शन न घेताच.

जंगलाच्या वाटेवरील 'वाटसरूं'चा कर्दनकाळ ठरणारा भाल्या धनगर, ...पण एका जिगरबाज फौजदाराच्या हाती लागला.

'तळ्या'मुळे गावचा विकास झाला, सरकारने नुकसान भरपाई दिली, ...पण गावचं सगळं गेलं.

उमा रामोशाने दुष्काळातही गाईचा सांभाळ केला,
...पण दारूच्या नशेत त्याच्या हातून 'पाप' घडलं.
वीस वर्षे जे कुटुंबाचे दु:ख होते, तेच त्या बहिणीचेही दु:ख होते,
...पण आज एकाएकी ती श्रीमंत झाली होती.
रेल्वेतनं येताना एका आंधळ्याची 'सोबत' होती,
...पण तरीही मंजुळा घरी पोहोचली नाही.
'जन्मगाठी'च्या बंधनात अडकण्यास रंगनाथ तयार झाला होता,
...पण त्याने जन्मात लग्न न करण्याचा निर्णय घेतला.

अर्जुना, भाल्या, उमाजी, भालू, मंजुळापासून... रंगनाथपर्यंत
'वारी'तील वारकऱ्यांचा हा जीवनप्रवास!

१६ जानेवारी २०१९ ते १५ फेब्रुवारी २०१९
दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

१७ जानेवारी - मालविका आमडेकर यांचा जन्मदिन

'कांगारू देशीच्या गोष्टी' या चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - २८०/- । सवलत किंमत १७९/-

१७ डिसेंबर ते १९ जानेवारीपर्यंत.

१८ जानेवारी - सुनंदा अमरापूरकर यांचा जन्मदिन

अँबिग्युअस लॉस, आमेन, ॲन आय फॉर ॲन आय, फॅमिली, मिराज, शेम, शांततेने काम करा, द मॅड तिबेटियन, वेदनेची फुले, बंधमुक्त होताना... या अनुवादित पुस्तक संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - १९५५/- । सवलत किंमत ११८९/-

१८ जानेवारी ते २० जानेवारीपर्यंत.

१९ जानेवारी - अभिजित कुलकर्णी यांचा जन्मदिन

'रेड टेप' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - ३४०/- । सवलत किंमत २३९/-

१९ जानेवारी ते २१ जानेवारीपर्यंत.

२३ जानेवारी - नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

'नेताजी', 'नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ४९०/- । सवलत किंमत ३५९/-

`Mahanayak' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - ६९५/- । सवलत किंमत ५१९/-

२३ जानेवारी ते २५ जानेवारीपर्यंत.

२४ जानेवारी - जागतिक कन्यादिन

'अंतराळवीर सुनीता विल्यम्स', स्लमगर्ल ड्रिमिंग, कल्पना चावला, कर्मयोगिनी (अहिल्याबाई होळकर), आखाडा, स्वप्नाकडून सत्याकडे, मी मलाला, रुपेरी सिंधू या पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - १२८०/- । सवलत किंमत ८६९/-

Karmayogini या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - ३५०/- । सवलत किंमत २३९/-

२४ जानेवारी ते २६ जानेवारीपर्यंत.

२६ जानेवारी - प्रजासत्ताकदिन

'फ्रीडम ॲट मीडनाइट', 'मोहनदास', 'परमवीर चक्र', 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया', 'महामानव सरदार पटेल', 'नेताजी', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'सैनिक हो तुमच्यासाठी' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३०६०/- । सवलत किंमत २०१९/-

२६ जानेवारी ते २९ जानेवारीपर्यंत.

२६ जानेवारी - अनिता नायर यांचा जन्मदिन

'लेडिज कूपे', 'विस्मरणातच सर्वकाही!' या अनुवादित पुस्तक संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - ६१०/- । सवलत किंमत ३९९/-

२६ जानेवारी ते २८ जानेवारीपर्यंत.

२८ जानेवारी - मायकेल हेस्टिंग्ज यांचा जन्मदिन

'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - २५०/- । सवलत किंमत १६९/-

२८ जानेवारी ते ३० जानेवारीपर्यंत.

३० जानेवारी - जयंत गुणे यांचा जन्मदिन

'द प्रॉफेट मर्डर्स','झॅप्ड', 'द किस मर्डर' या अनुवादित पुस्तक संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - ५८०/- । सवलत किंमत ३८९/-

३० जानेवारी ते १ फेब्रुवारीपर्यंत.

३० जानेवारी - पिंकी विराणी यांचा जन्मदिन

'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब', 'अरुणाची गोष्ट', 'डेफ हेवन' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ८१५/-। सवलत किंमत ५४९/-

३० जानेवारी ते १ फेब्रुवारीपर्यंत.

२ फेब्रुवारी - खुशवंत सिंग यांचा जन्मदिन

'माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष', 'सेक्स, स्कॉच अँड स्कॉलरशिप', द कंपनी ऑफ विमेन', 'मृत्यू माझ्या उंबरठ्याशी' या पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ८३०/- । सवलत किंमत ५५९/-

२ फेब्रुवारी ते ५ फेब्रुवारीपर्यंत.

२ फेब्रुवारी - गीतांजली वैशंपायन यांचा जन्मदिन

'द गॉड ऑफ ॲनिमल्स', 'अँजेलाज ॲशेस' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ६६०/- । सवलत किंमत ४३९/-

२ फेब्रुवारी ते ५ फेब्रुवारीपर्यंत.

३ फेब्रुवारी - दिप्ती नवल यांचा जन्मदिन

'द मॅड तिबेटियन' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - १५०/- । सवलत किंमत ९९/-

३ फेब्रुवारी ते ५ फेब्रुवारीपर्यंत.

४ फेब्रुवारी - डॉ. गौरी बोरकर यांचा जन्मदिन

'गर्भसंस्कार', 'स्थूलतेला करा टाटा' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३००/-। सवलत किंमत १९९/-

४ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारीपर्यंत.

४ फेब्रुवारी - जागतिक कर्करोग दिन

'कॅन्सर रोखू या', 'इट्स नॉट अबाउट द बाइक' पुस्तक संचावर विशेष सवलत.

मूळ किंमत - ४७५/-। सवलत किंमत ३१९/-

४ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत.

४ फेब्रुवारी - जागतिक फेसबुक डे

'द Facebook इफेक्ट्स' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत – ३९५/-। सवलत किंमत २५९/-

४ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत.

५ फेब्रुवारी - गिरिजा कीर यांचा जन्मदिन

'आकाशवेध', 'जन्मठेप' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ३००/-। सवलत किंमत १५०/-

५ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत.

८ फेब्रुवारी - जॉन ग्रिशॅम यांचा जन्मदिन

जॉन ग्रिशॅम यांच्या १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ५३९०/-। सवलत किंमत २७४९/-

८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारीपर्यंत.

१० फेब्रुवारी - जागतिक विवाहदिन

'जस्ट मॅरीड, प्लीज एक्सक्यूज', 'तिसरा नवरा नको गं बाई!', 'व्हाय मेन डोन्ट लिसन ॲण्ड विमेन कान्ट रीड मॅप्स', 'तो आणि ती', 'चिकन सूप फॉर द कपल्स सोल'या पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ११६०/-। सवलत किंमत ७६९/-

१० फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारीपर्यंत.

१० फेब्रुवारी - राधिका टिपरे यांचा जन्मदिन

'वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत –३००/-। सवलत किंमत १९९/-

१० फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारीपर्यंत.

१० फेब्रुवारी - दयानंद सरस्वती यांचा जन्मदिन

'महर्षी दयानंद सरस्वती' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - ९५/- । सवलत किंमत ३१/-

१० फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारीपर्यंत.

१० फेब्रुवारी - वन्दना अत्रे यांचा जन्मदिन

'कॅन्सर रोखू या', 'सहा संशयित', 'स्लम डॉग मिलेनिअर', 'तिबेटच्या वाटेवर' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ११०५/-। सवलत किंमत ७३९/-

१० फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारीपर्यंत.

१२ फेब्रुवारी - पी. एन. जोशी यांचा जन्मदिन

Glimpses of Changing Banking Scenario पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत – ३००/-। सवलत किंमत ९९/-

१२ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारीपर्यंत.

१३ फेब्रुवारी - कोडी मॅकफॅदियेन यांचा जन्मदिन

'शॅडो मॅन', 'द डार्कर साइड', 'द फेस ऑफ डेथ' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

मूळ किंमत - १४८०/- । सवलत किंमत ९८९/-

१३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारीपर्यंत.

१४ फेब्रुवारी - व्हॅलेंटाइन्स डे

'चिकन सूप फॉर द कपल्स सोल', 'दॅट थिंग कॉल्ड लव्ह', 'एक अनादि अनंत प्रेमकहाणी', 'प्रेमाची परिभाषा', 'अनादि अनंत', 'अद्वैत', 'टू सर विथ लव्ह', 'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद', 'चिकन सूप टू लव्ह पार्ट १', 'चिकन सूप टू लव्ह पार्ट २', 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग', 'प्रेमकथा', 'द प्राइस ऑफ लव्ह', 'अनकंडिशनल लव्ह', 'देवदास' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३८००/- । सवलत किंमत २५५९/-

१४ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारीपर्यंत.

१४ फेब्रुवारी - व्हॅलेंटाइन्स डे

फिफ्टी शेड्स डार्कर, फिफ्टी शेड्स फ्रीड, फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे

संचाची मूळ किंमत - २१००/- । सवलत किंमत १४०९/-

१४ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारीपर्यंत.

आमचे लेखक-अनुवादक यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

❖ **किमतींमध्ये बदलाची शक्यता** ❖**अधिक माहितीसाठी**

संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ /२४४७५४६२ /

What's App No. ९४२०५९४६६५

website : www.mehtapublishinghouse.com

७वी आवृत्ती

सेकंड लेडी

लेखक

आयर्विंग वॅलेस

अनुवाद

रवींद्र गुर्जर

किंमत : २५०/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

वास्तव हे कल्पिताहून अद्‌भुत असू शकतं. याचे दाखले जगात नेहमीच मिळत असतात. एकासारखी एक दिसणारी माणसं दुर्मिळ असतात, परंतु तशी असू शकतात. 'क्लोनिंग'च्या आजच्या जमान्यात तर अशा शेकडो व्यक्ती निर्माण करता येतील, इतकी मजल विज्ञानानं गाठलेली आहे.

भोवाल संन्याशाचा या शतकातील गाजलेला खटला आपल्याला आठवत असेल. एका फार मोठ्या संस्थानातील गायब झालेला गृहस्थ काही वर्षांनी अचानक घरी दाखल होतो. नातलगांना तो संपत्ती लाटण्यासाठी आलेला भोंदू वाटतो. पुढं कित्येक वर्षं त्याच्यावर खटला चालू राहतो... वगैरे.

पेशवाईच्या काळात पानिपतच्या युद्धानंतर असाच एक तोतया सदाशिवराव भाऊ म्हणून पुण्यात हजर होतो. नाना फडणीसांच्या अक्कलहुशारीनं त्याची लबाडी उघडकीस येते.

सेकंड लेडी ही तशीच एक विलक्षण कथा आहे.

आपण जिच्याबरोबर संसार करतो, ती आपली पत्नी प्रत्यक्षात 'दुसरीच' स्त्री आहे, असं समजलं, तर आपल्याला केवढा जबर धक्का बसेल? पण इथं तर खुद्द अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना त्या वस्तुस्थितीवर विश्वास बसत नाही. त्यांचं कामजीवनही 'नेहमीच्या'च परिचित 'क्रीडां'प्रमाणे यत्किंचितही संशय न येता सुरळीतपणे चालू राहतं...

अशी ही नाजूक; पण गुंतागुंतीची, मती गुंग करणारी कादंबरी...

सेकंड लेडी!

स्मरण

सुवर्ण युगातील लोकप्रिय साहित्यिक

-गंगाधर गाडगीळ

गंगाधर गाडगीळ

वि. स. खांडेकर आणि गंगाधर गाडगीळ...खांडेकर पहिल्या महायुद्धानंतरच्या कालखंडात स्वत:चं 'युग' निर्माण करणारे साहित्यिक...तर गंगाधर गाडगीळ दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालखंडातील 'नवकथेचे जनक'...दोघांचंही वाङ्मयाच्या इतिहासातील स्थान तेवढंच महत्त्वाचं...पण दोघांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन मात्र सर्वस्वी भिन्न...अभिव्यक्ती भिन्न...त्या अर्थाने हे दोन साहित्यिक दोन ध्रुवांवर होते. १९९७मध्ये खांडेकरांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने गाडगीळांनी खांडेकरांच्या लेखनवैशिष्ट्यांचा तत्कालीन (खांडेकरकालीन) राजकीय, सामाजिक पार्श्वभूमीवर वेध घेणारा लेख लिहिला होता. साठोत्तरी साहित्य हे वळण पार करून मराठी वाङ्मयाचा इतिहास एका नव्या वळणावर जात असताना गाडगीळांनी लिहिलेला हा लेख आहे. खांडेकरांच्या १२०व्या जयंतीनिमित्त या लेखाद्वारे त्यांचं पुन:स्मरण...

पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात ज्या लेखकांनी मराठी वाचकांवर मोहिनी घातली आणि साहित्याचं क्षेत्र गाजवलं; त्यातले एक होते विष्णू सखाराम खांडेकर. त्या काळात कथा-कादंबऱ्यांच्या क्षेत्रात फडके आणि खांडेकर अग्रगण्य होते. त्यांच्या नावाभोवती एक झगमगतं वलय होतं आणि त्या काळात शाळा-कॉलेजात असलेल्या माझ्यासारख्या मुलांना

त्यांच्याविषयी विलक्षण अपूर्वाई वाटायची, कुतूहल वाटायचं. त्यांना बघावं, त्यांची भाषणं ऐकावी आणि जमल्यास त्यांची स्वाक्षरी घ्यावी, असं फार फार वाटायचं. त्यांच्या कथा-कादंबऱ्या आम्ही झडप घालून वाचायचो आणि आमच्या भावी जीवनातील शृंगार, प्रीती, ध्येयवाद, त्याग इत्यादींची तेव्हा भव्य-दिव्य वाटणारी स्वप्नं आम्ही रंगवायचो. त्यांची बीजं आम्हाला या लेखकांच्या साहित्यात सापडायची.

वि. स. खांडेकर

माझ्यासारख्या शाळा-कॉलेजातल्या मुलांची गोष्ट तर सोडाच, पण वा. रा. ढवळे, वा. ल. कुलकर्णी यांच्यासारखी माणसंदेखील खांडेकर मुंबईला येणार आहेत, हे इतक्या अपूर्वाईनं आणि कौतुकानं एकमेकांना सांगायची की ते ऐकून खांडेकर हे यक्षगंधर्व इत्यादींच्या कोटीतले असावेत अशी आम्हा तरुण मंडळींची खात्रीच असायची. फडके-खांडेकरांबरोबरच अत्रे, यशवंत, माधव ज्युलियन यांच्याविषयीदेखील आम्हाला फार अपूर्वाई आणि कौतुक वाटायचं; पण किती झालं तरी फडके-खांडेकर ते फडके-खांडेकरच. त्यांची गोष्टच वेगळी आणि खांडेकरांविषयी तर अशी भावना केवळ मराठी वाचकांच्याच नव्हे तर गुजराती, तमिळ इत्यादी भाषिक वाचकांच्या मनातही होती.

काही लेखक खूप लोकप्रिय असतात; पण ते अभिजात साहित्य निर्माण करतात, असं जाणते रसिक आणि समीक्षक मानत नाहीत. उलट काही लेखक उत्तम साहित्य निर्माण करतात, असं मानलं जातं; पण त्यांना लोकप्रियता लाभत नाही; पण दोन महायुद्धांमधल्या काळात फडके-खांडेकर हे केवळ लोकप्रियच नव्हेत, तर उच्च कोटीचे साहित्यिक आहेत असं सर्वसामान्यपणे मानलं जात होतं. असं भाग्य फार थोड्या लेखकांना लाभतं.

सुवर्ण युगातला लोकप्रिय साहित्यिक

साहित्यापेक्षा चित्रपट, नाटक, संगीत आणि क्रीडा या क्षेत्रांचं आकर्षण अधिक असतं. सर्वसामान्य माणसाच्या बाबतीत तर हे विशेषच खरं आहे; पण त्या काळात मराठी रंगभूमीचं सुवर्णयुग अस्तंगत पावत होतं. आणि नवी रंगभूमी अस्तित्वात यायची होती. मराठी माणसांच्या कानावर संगीत पडत होतं, ते मुख्यतः रंगभूमीवरून. त्यामुळे रंगभूमी अस्तंगत झाल्यावर

सुगम संगीताच्या क्षेत्रातदेखील संकोच झाला. शास्त्रीय संगीताचा श्रोतृवर्ग त्या मानानं मर्यादित होता. ते काही लोकप्रियतेच्या बाबतीत साहित्याशी तेव्हा तरी स्पर्धा करू शकत नव्हते. चित्रपटांचे अजून बोलपट व्हायचे होते. आणि तीच गोष्ट नाट्यसंगीताची जागा घेणाऱ्या भावगीतांबाबत खरी होती. त्यामुळे साहित्य आणि साहित्यिक यांच्याशी कोणत्याच क्षेत्रात समर्थपणे स्पर्धा होऊ शकत नव्हती. राजकारणाचं आकर्षण तेवढंच होतं; पण साहित्यात राजकारण व समाजकारण यांना स्थान होतंच. साहित्यिकांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रातही पुढारीपण करायचं ही मुळी महाराष्ट्रातली प्रथाच होती. तेव्हा राजकारण देखील लोकांच्या मनात साहित्याला शह देऊ शकत नव्हतं. पुढे १९३९च्या आसपास भावगीतं व बोलपट अस्तित्वात आले आणि नवी रंगभूमी आकार घेऊ लागली; पण पहिले नाटककार, पटकथाकार व भावगीतलेखक हे मान्यवर साहित्यिकच होते. त्यामुळे दोन महायुद्धांमधला काळ व त्यानंतरचीही पाच-दहा वर्षे हे लोकप्रियतेच्या बाबतीत मराठी साहित्याचं सुवर्णयुग होतं आणि या सुवर्णयुगातला अत्यंत लोकप्रिय साहित्यिक होण्याचं भाग्य खांडेकरांना लाभलं.

शिवाय त्या काळात साहित्याचा वाचकवर्गही वाढत होता. भारतीय लोकांना अधिक प्रमाणात नोकऱ्या देण्याचं धोरण माँटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणांनंतर काहीसं वेगानं अमलात आणलं जाऊ लागलं. शिक्षणाचा प्रसार वाढला. अधिक प्रमाणात शाळा-कॉलेजं अस्तित्वात येऊ लागली. बँका, इन्शुरन्स कंपन्या, कारखानदारी इत्यादी क्षेत्रांतही भारतीय उपक्रम अस्तित्वात आले. तिथे आणखी नोकऱ्यांची सोय झाली. त्यामुळे पांढरपेशा वर्गात वाढ झाली. १९२९ साली मंदीची लाट आली नसती तर ती अधिक वेगाने झाली असती. पांढरपेशा वर्गातली स्त्रीदेखील त्या काळात अधिक प्रमाणात वाचू आणि लिहू लागली आणि त्यामुळेही वाचकवर्गात वाढ झाली.

समाजसुधारणेचा प्रभाव

या दोन युद्धांमधल्या काळात महाराष्ट्राच्या समाजजीवनात मोठं परिवर्तन होत होतं. समाजसुधारणेच्या चळवळीचा प्रभाव जाणवू लागला होता. संयुक्त कुटुंब पद्धती अधिक सैल, मोकळी व सुटसुटीत होत होती. कपडेलत्ते, खाणंपिणं, रोजची धार्मिक आन्हिकं या बाबतीतले निर्बंध सैल झाले होते. डोक्यावर केस वाढविणाऱ्या, इतकंच नव्हे तर त्यांचा भांगही

पाडणाऱ्या तरुण मुलांची संख्या झपाट्यानं वाढत होती. पगडी-रुमालाची जागा आता टोपीनं घेतली आणि १९३०नंतर ती देखील डोक्यावरून उडून जाऊ लागली. धोतराची जागा लेंगा घेऊ लागला आणि लांब डगल्याच्या जागी सुटसुटीत तोकडा कोट वापरला जाऊ लागला. त्या तोकड्या खिशातून सुगंधी रुमाल डोकावू लागले. त्यातच गांधीवादी मंडळी खादीचा नेहरू शर्ट, खादीचा लेंगा अगर धोतर व खादीची टोपी अशा पोशाखात सर्वत्र वावरू लागली. त्यातले काही तर पंचा लावूनच हिंडत आणि कम्युनिस्ट तर पँट आणि शर्ट घालून सिगरेटी फुंकीत चक्क बोडके हिंडू लागले.

बायकांची वेशभूषादेखील थोडी मंद गतीनं, पण निश्चितपणे बदलत होती. चोळ्यांच्या जागी आधी पोलकी आणि मग झंपर आले. लुगड्यांची जागा साड्यांनी घेतली. आणि पुढे तर सहावारी की नऊवारी, सकच्छ की विकच्छ या विषयावर मासिकांतून वाद झडू लागले. खोप्याची जागा अंबाड्याने घेतली आणि मग मुली मोठ्या होऊन कॉलेजात गेल्या, तर शेपटाच घालीत असत. पुढे तर कहरच झाला आणि या मुली चक्क दोन शेपटे घालून ते छातीवर मिरवत फिरू लागल्या. पूर्वी झिंज्या चेहऱ्यावर येणं वाईट समजत. आता मात्र त्या झिंज्यांच्या बटा होऊन त्या कपाळावर व गालांवर रुळणं हे सौंदर्याचं लक्षण मानलं जाऊ लागलं आणि एखाद दुसरी मुलगी तर चक्क बॉबकट करायची. पूर्वीचे जड, घसघशीत दागिने जाऊन त्यांची जागा नाजूक चपलाहार, तासाच्या बांगड्या वगैरे घेऊ लागल्या. कुंकवाच्या ढब्बूंच्या टिकल्या झाल्या.

विधवांच्या केशवपनाची चाल झपाट्यानं मोडीत निघू लागली. मुली अधिकाधिक प्रमाणात इंग्रजी शाळेत आणि मग मॅट्रिक होऊन कॉलेजात देखील थोड्या थोड्या प्रमाणात जाऊ लागल्या. तरुण मुलगे एक वर्ष तरी कॉलेजात गेलेली मुलगी अधिक पसंत करू लागले. त्यामुळे जुन्या वळणाच्या पालकांनादेखील मुलगी एखादं वर्ष कॉलेजात पाठवावी लागे. मुलींची आणि मुलांची 'लग्न' उशिरा होऊ लागली. त्यामुळे किशोरवयात अविवाहित तरुण-तरुणींचा एक वर्ग अस्तित्वात आला. साहजिकच प्रीतीची स्वप्नं त्यांच्या अंत:करणात फुलू लागली. ती साहित्यात उमलावी असं मग त्यांना साहजिकच वाटू लागलं.

कुटुंबव्यवस्था बदलली

बाहेरचं खाणं, शिवाशिव इत्यादी बाबतीतले निर्बंध सैल झाले. शाळेतून घरी आल्यावर विटाळलेले कपडे काढून ठेवायची प्रथा मोडीत निघाली. तरुण माणसे सरळ इराण्याच्या हॉटेलमध्ये जाऊन चहा-बिस्कुटं खाऊ लागली आणि काही जण तर चक्क चोरून आम्लेट खात. मुली पाळी असली तरी परीक्षेच्या मंडपात आणि मग वर्गात जाऊ लागल्या. सुना चक्क सासूपुढे वृत्तपत्र वाचू लागल्या आणि एखादी गाणं देखील गुणगुणायची. घरोघरी सुनांची बंडाळी सुरू झाली. आणि काही विधवा, शिक्षिका अगर नर्स म्हणून स्वत:च्या पायावर उभ्या राहू लागल्या. फार काय, आंतरजातीय प्रेमविवाह करण्याचं भयंकर कृत्यदेखील एखाद दुसरा तरुण करू लागला. संयुक्त कुटुंबदेखील मोडून अधिक सुटसुटीत झाली आणि काही घरात तर राजाराणीचा संसारही पाहायला मिळू लागला.

या काळात अनेक नव्या 'वस्त्या' आणि नव्या सुविधा उपलब्ध झाल्या. पुण्यात डेक्कन जिमखाना, मुंबईत हिंदू कॉलनी, शिवाजी पार्क अशा नव्या वस्त्या अस्तित्वात आल्या. माणसं चाळीतून ब्लॉकमध्ये आणि वाड्यातून बंगल्यामध्ये राहायला गेली. बंद न्हाणीघरात नग्न होऊन स्नान करण्याचा विलक्षण अनुभव स्त्री-पुरुषांना, विशेषत: स्त्रियांना घेता येऊ लागला. चुलीच्या जोडीला स्टोव्ह आला. घरोघरी आता वीज आली. सारवलेल्या जमिनीची जागा फरशीनं घेतली. सायकल, विजेचा पंखा, रेडिओ अशा अपूर्वाईच्या गोष्टी अधिकाधिक घरांत दिसू लागल्या. डेक्कन क्वीन सुरू झाली. झोन तिकिटात माणसं गावोगावी प्रवास करू लागली. जी. एन. जोश्यांनी भावगीतांचा जमाना सुरू केला. वाटव्यांचा 'वारा फोफावला'. 'अयोध्येचा राजा' चक्क बोलू लागला. मग 'एक होता राजा,' 'कशाला उद्याची बाऽत,' 'यमुना जळी खेळ...' सुरू झाले. काही विचारू नका. चित्रपटांनी मोठी धमाल उडवून दिली.

या बदलत्या काळात नवे विचार आणि नवे ध्येयवाद अस्तित्वात यावे, हे अपरिहार्यच होतं. समाज सुधारणेचा विचार इतका पुढे गेला की, झुणका-भाकर सहभोजनं ठिकठिकाणी झडू लागली. कर्व्यांच्या शाळेत व विद्यापीठात शिकणाऱ्या बायका स्त्री-स्वातंत्र्याच्या बाबतीत असे जहाल विचार करू लागल्या की, काही विचारू नका. पुढे पुढे तर बर्ट्रांड रसेलचं नाव घेऊन

स्वैर लैंगिक जीवनाचा पुरस्कार देखील काही मंडळी करू लागली. वेब पती-पत्नी, बर्नार्ड शॉ या फेबियन सोशलिस्टांचा समाजवाद इथे आला आणि मग मार्क्सचा जहाल समाजवाद क्रांतीच्या गर्जना करीत या महाराष्ट्रात दणकन दाखल झाला. गांधीजींच्या विचारांनी प्रेरित झालेली माणसं टकळ्या आणि चरखे फिरवीत थेट खेडेगावात आश्रम स्थापन करून समाजकार्य करू लागली. र. धों. कर्वे संतती नियमनाचा प्रचार करू लागले आणि त्यांच्या 'समाजस्वास्थ्या'नं तर सनातन्यांची झोप उडवली.

समाजात जेव्हा असं परिवर्तन होत असतं तेव्हा माणसं गोंधळून जातात. हे काय होतंय हे त्यांना उमगत नाही. नांगर तुटून समाजाचं तारू कुठेतरी भरकटत जातं आहे की काय असं त्यांना वाटू लागतं. जे घडतंय त्याचा बौद्धिक आणि भावनिक अन्वयार्थ कळावा, असं त्यांना वाटत असतं. जुन्याचा आणि नव्याचा सांधा कसा जोडायचा हे त्यांना कळत नाही. जीवनात आलेल्या नव्या वस्तू, नवे रिवाज यांना भावनिक प्रतिसाद कसा द्यावा, त्यांचा स्वीकार करून भावजीवनाची एक नवी घडी कशी बसवावी, हे त्यांना कळत नाही.

बदलणाऱ्या समाजाच्या या ज्या गरजा असतात, त्या पुरवण्याचे काम त्या त्या काळातले कलावंत, शास्त्रज्ञ, विचारवंत व साहित्यिक करीत असतात.

सर्वसामान्य माणसासाठी हे महत्त्वाचं काम त्या काळात वि. स. खांडेकरांनी अत्यंत समाधानकारकपणे केलं. या नव्या काळाला अनुरूप असं नवं, सुटसुटीत, देखणं, मनमोकळं रूप तेव्हा मराठी भाषा धारण करीत होती. आलंकारिक भाषेची जुनी, लोकांच्या मनात रुजलेली मोडणी आणि ही नवी भाषा यांचा सांधा जोडणं आवश्यक होतं. खांडेकरांनी कोल्हटकर-गडकऱ्यांच्या आलंकारिक भाषेला अधिक साधं, सुटसुटीत स्वरूप दिलं. त्या आलंकारिकतेची ज्यांच्या मनावर मोहिनी पडली होती, त्यांना तशीच मोहिनी घालणाऱ्या, नव्या, अधिक सुटसुटीत आलंकारिकतेकडं आणलं आणि त्या भाषेच्या द्वारे वेगळ्या घटना, वेगळी दृश्यं आणि वेगळे आशय व्यक्त केले.

मराठी गद्य शैलीची एक वेगळी परंपरा हरिभाऊ आपटे, देवल वगैरे मंडळींनी निर्माण केली होती. तिला फडक्यांनी आधुनिक, कालोचित, देखणं असं स्वरूप दिलं; पण हरिभाऊंच्या मनोभूमिकेशी खांडेकरांचं देखील जवळचं नातं होतं. त्यांच्या कादंबऱ्यांत शोभतील असे अनेक प्रसंग खांडेकरांच्या कादंबऱ्यांतही होते आणि ते व्यक्त करताना खांडेकरांनी काही प्रमाणात तरी आपल्या कादंबऱ्यांचं व भाषेचं नातं हरिभाऊंच्या परंपरेशी

जोडलं.

अशा प्रकारे जे परिचित त्याचा उपयोग करून नव्या अपरिचित प्रदेशात ते मराठी वाचकाला घेऊन गेले.

पारंपरिक सात्त्विकतेशी नातं

या सात्त्विक भावनाशीलतेत गांधीवाद आणि मार्क्सवाद, पारंपरिक मूल्य आणि आधुनिक मूल्य यातला विरोध विरघळून गेला. सुष्ट-दुष्टांचा संघर्ष देव-दानवांच्या संघर्षासारखा परिचित आणि काव्यात्मक झाला. अनुभवांची मांडणी दोन ध्रुवांच्या संदर्भात झाली. शरीर आणि आत्मा, भोग आणि त्याग, सात्त्विक प्रेम आणि वैषयिक प्रेम अशा आकर्षक सोप्या द्वंद्वात सारे अनुभव मांडले गेले. त्यांचा अन्वयार्थ लावला गेला. काव्यात्मकतेनं सारंच कसं गोड केलं. हालअपेष्टा सहन करणं, दु:ख अनुभवणं हादेखील एक उदात्त, भावपूर्ण अनुभव झाला. 'कंटकशल्ये बोथटली' अशी वाचकांच्या मनाची अवस्था झाली.

जुनं आणितो काळ ध्येयवादांचा होता. हे ध्येयवाद वेगवेगळे, परस्परांशी फटकून वागणारे आणि परस्परविरोधी दोखील होते. आणि यापैकी काही 'ध्येयवादा'चा पारंपरिक सात्त्विकतेशी विरोध होता. कठोर संघर्ष त्यात अनुस्यूत होते. निरनिराळ्या ध्येयवादांतला हा विरोध पुसून टाकण्याचं, ते एकाच दिशेने जात आहेत, असं दाखवण्याचं आणि त्याचं आपल्या पारंपरिक सात्त्विकतेशी नातं जोडण्याचं काम खांडेकरांनी केलं. जे दक्ष, निष्ठूर ते देखील आपल्या भावनाशीलतेनं सौम्य किंवा निदान सुसह्य आणि उदात्त केलं. ही उदात्त, सात्त्विक आणि मनाला मोहून टाकणारी भावनाशीलता ही खांडेकरांच्या साहित्यातील अत्यंत प्रभावी शक्ती होती. तिनं मराठीच नव्हे तर इतर अनेक भाषिकांची मने मनं जिंकली. सारखं त्या भावनाशीलतेत गुंगून जावं, असं वाचकांना वाटू लागलं. त्या गुंगीचं, धुंदीचं विलक्षण आकर्षण त्यांना वाटत राहिलं. खांडेकरांनी त्या भावनाशीलतेनं भारलेलं कितीही साहित्य लिहिलं तरी ते आता पुरे असं त्यांना कधी वाटलंच नाही. ते अधिक मिळावं, आणखी मिळावं असंच त्यांना सारखं वाटत राहिलं. नवं यांचा सांधा जोडणं, एका उत्कट, सात्त्विक भावनाशीलतेनं आपलं सारं लेखन भारून टाकणं, अनेक ध्येयवादांचा आणि विचारसरणींचा समन्वय साधणं, साऱ्या अनुभवांची एक द्वंद्वात्मक मांडणी करणं, काव्यात्मकतेनं सारं लेखन सुगंधित आणि आकर्षक करणं आणि नव्या, साध्या अनुभवांचं चित्रण करतानादेखील एका विशाल, सनातन

अनुभवविश्वात आपण संचार करीत आहोत, असा वाचकाला प्रत्यय देणं आणि त्याला एका उच्च नैतिक पातळीवर नेणं या अनेक गोष्टी खांडेकरांनी साधल्या. त्या साधताना त्यांच्या कल्पकतेच्या सतत चाललेल्या क्रीडेचा त्यांना फार उपयोग झाला. या कल्पकतेमुळे धर्मराजाच्या रथाप्रमाणे वाचकाच्या त्या साहित्याच्या अनुभवाचा रथ देखील जमिनीपासून उचलला गेला आणि स्वर्गीयतेचा आनंद त्याला मिळाला.

रूपकाद्वारे अनुभव

खांडेकरांच्या या कल्पकतेमुळेच ते सारे अनुभव रूपकाच्याद्वारे घेतात. क्रौंचवध, ययाति, दोन ध्रुव ही त्यांच्या कादंबऱ्यांची नावंच ते रूपकाच्या द्वारेच अनुभव कसे घेतात, ते निदर्शनास आणतात. रूपके त्यांनी कृत्रिमपणे आपल्या साहित्यात काव्यात्मकता आणण्यासाठी वापरलेली नाहीत. अशा रूपकांचा उपयोग हा त्यांच्या आकलनाच्या प्रक्रियेचाच भाग आहे. आणि जे त्यांच्या लेखनाचे विशेष वर सांगितले ते सगळे रूपकांच्याद्वारे अत्यंत परिणामकारकपणे साध्य झाले आहेत.

खांडेकरांनी आपल्या साहित्यात अनेक पात्रं निर्माण केली; पण त्यांच्या साहित्यातलं मुख्य पात्र जर कोणी असेल तर ते म्हणजे निवेदक खांडेकर. खांडेकरांनी आपल्या साहित्यात अनेक तांत्रिक प्रयोग केले. वेगवेगळ्या प्रकृतीच्या निवेदकांचा त्यांनी कधीही उपयोग केला नाही. खरं म्हणजे ते त्यांना जमलंच नसतं. अत्यंत तळमळीनं, सात्त्विक , ध्येयवादी वृत्तीनं आणि काव्यात्मकतेनं निवेदन करणारा एकच निवेदक त्यांचं सारं साहित्य व्यापून राहिला आहे.

एखादा साहित्यिक जेव्हा अनेक वर्षं वाचकांच्या मनावर अधिराज्य करतो, तेव्हा त्यांच्या मनाला जाऊन भिडणारं असं काहीतरी त्याच्या जवळ असतं. खांडेकरांच्या साहित्याच्या गुणावगुणांबद्दल मतभेद होऊ शकतील; पण त्यांना माणसांविषयी वाटणारी उत्कंठा, सहानुभूती, त्यांची सात्त्विकता, त्यांची नैतिक कळकळ या गोष्टी खऱ्या होत्या. त्यात खोटेपणा नव्हता.

अत्यंत कळकळीनं लिहिताना जसे खांडेकर आपल्या कल्पकतेला पारखे झाले नाहीत, त्याप्रमाणे साहित्याच्या क्षेत्रात ते सतत प्रयोग करीत राहिले. कविता, नाटक, लघुनिबंध, लघुकथा, कादंबऱ्या आणि समीक्षा हे सर्व साहित्यप्रकार त्यांनी हौसेने हाताळले. इतकेच नव्हे तर पटकथाही लिहिल्या. त्यांनी खूप वाचलं. साहित्यावर त्यांनी मनमुराद गप्पा मारल्या.

आणि माणसांविषयींचं त्यांचं प्रेम आणि आत्मीयता प्रत्यक्ष जीवनातदेखील त्यांनी व्यक्त केली.

मी शाळेत असताना त्यांच्या साहित्यानं अगदी भारावून गेलो होतो. उल्का, दोन ध्रुव इत्यादी त्यांच्या कादंबऱ्या वाचून माझी तेव्हा काय अवस्था झाली होती ते मला आठवतं. पुढे कॉलेजात गेल्यावर मी खूप पाश्चात्त्य साहित्य वाचलं. साहित्यावर खूप विचार केला. माझी रसिकता अशी प्रगल्भ (!) झाल्यावर खांडेकर मला आवडेनासे झाले. आणि मी स्वत: अगदी वेगळ्या प्रकारचं लेखन केलं. १९४८ साली तर मी एका भाषणात त्यांच्यावर कडक टीका केली आणि त्यामुळे एका मोठ्या वादळाला मला तोंड द्यावं लागलं.

हे मी त्यांच्या शताब्दीच्या वर्षात सांगत आहे, ते त्यांचं दोषदिग्दर्शन करण्यासाठी नव्हे, तर त्यांच्या मनाच्या मोठेपणाचा मला जो अनुभव आला, तो सांगण्यासाठी.

राग नाही, उलट कौतुक

मी इतकी कडक टीका केल्यावर खांडेकरांनी माझ्यावर जोरदार हल्ला चढवला असता किंवा त्यांनी माझ्याविषयी मनात राग धरला असता तर ते समजण्यासारखं होतं; पण त्यांनी यातली एकही गोष्ट केली नाही. उलट इतरांजवळ ते माझी आस्थेनं चौकशी करत. माझी बायको शिरोड्याची. या शिरोड्यात खांडेकरांनी अठरा वर्षं काढली होती. त्यामुळे ते माझी चौकशी करताना 'आमचे जावईबापू' असा माझा कौतुकाने उल्लेख करत असत आणि त्यांना ओळखणाऱ्या एका गृहस्थानं मला सांगितलं की 'आजचे चांगले लेखक कोण?' असा प्रश्न त्यांना विचारल्यावर त्यांनी जी नावं घेतली त्यात माझंही नाव होतं.

मनाचा हा मोठेपणा भारावून टाकणारा आणि विनम्र करणारा आहे. त्या विनम्रतेनंच या त्यांच्या शताब्दीच्या प्रसंगी मी त्यांना अभिवादन करतो.

('महाराष्ट्र टाइम्स'च्या 'मैफल'मधून साभार, ५ जानेवारी १९९७)

❖

३री आवृत्ती

याला जीवन ऐसे नाव

संजीव परळीकर

किंमत : १००/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

गोष्टीची पुस्तके आपल्याला नेहमीच आवडतात. छोट्या छोट्या गोष्टींचा संग्रह जर एकाच पुस्तकात मिळाला तर आपल्याला आणखीनच आवडते, त्यातूनही त्या पुस्तकात जर प्राण्यांच्या गोष्टी असतील तर मग काय विचारता! तुम्ही जर माझ्याशी सहमत असाल तर हे पुस्तक तुम्हाला निश्चितपणे आवडेल. ह्या पुस्तकात मी छोट्या छोट्या चौदा गोष्टी लिहिल्या आहेत. काही गोष्टी काल्पनिक आहेत, काही सत्यकथा आहेत, काही प्राण्यांच्या गोष्टी आहेत, तर काही इमेलद्वारे माझ्यापर्यंत पोहोचल्या आहेत. ह्या गोष्टींतून जे मोठे मोठे धडे घ्यायचे आहेत, ते तात्पर्यामध्ये लिहिलेच आहेत, पण हे धडे अमलात आणले तर आयुष्यावर दूरगामी परिणाम काय होतील ते मी सारांशामध्ये लिहिले आहेत. माझे हे गोष्टीचे पुस्तक तुम्हाला निश्चित आवडेल.

पुस्तक परिचय

शेष

सहा बहिणी आणि त्यांचं तुटलेलं घर..घराचा अखेरचा सांधा निखळत असताना भविष्याला कलाटणी देणाऱ्या क्षिप्राची गोष्ट...

स्वाती चांदोरकर यांचा जन्म २१ जून, १९६१ रोजी झाला. त्यांनी गृहविज्ञानात पदवी संपादन केली आहे. तसेच संगीत, नृत्य, रेकी, पेंटिंग, नाट्याभिनय यामध्येही त्यांनी विशेष प्रावीण्य प्राप्त केलं आहे. आठ कादंबऱ्या, चार कथासंग्रह, एक व्यक्तिचरित्र अशी साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. शिवाय ओशोंच्या दहा पुस्तकांचा अनुवादही त्यांनी केला आहे. 'वपु : एक अमृतानुभव' या कार्यक्रमाच्या त्या निर्मात्या आहेत. त्यांच्या 'फॉरवर्ड अँड डिलिट' या कादंबरीसाठी त्यांना २०१४मध्ये नांदेडचा प्रसादबन पुरस्कार प्राप्त झाला. तर २०१४मध्येच 'आणि विक्रमादित्य हरला' या कथासंग्रहासाठी त्यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार आणि राजेंद्र बनहट्टी कथा पुरस्कार मिळाला.

स्वाती चांदोरकर

भूक माणसाला किती लाचार बनवते! आम्ही सगळ्या बहिणी दोन वेळचं पोटाला काही मिळावं म्हणून वणवण करत होतो. वय लहान आणि भूक मोठी. जेवणाच्या वेळेला कुणाच्या तरी दारात जाऊन उभं राहायचं. नाइलाज म्हणून त्या घरातली बाई आत बोलवायची आणि मग तिच्या रागासकट, तिच्या जिव्हारी लागणाऱ्या शब्दांसकट जे पानात पडेल ते गिळायचं. त्या घरातल्या पुरुषाची नजर अंगावरून फिरत राहायची. किळस यायची- जणू ती नजर नग्न करत आहे. पण निर्लज्ज व्हायचं; कारण पोटात भुकेचा वणवा पेटलेला असायचा. आणि तोच वणवा त्या पुरुषाच्या नजरेत पेटलेला असायचा.

दोन्ही भुका शारीरिक.....एक भूक वणवा शमवणारी आणि एक भूक वणवा अजून चेतवणारी...

('शेष' या पुस्तकातून...)

गावदेवीच्या देवळात काकड आरती चालू होती. मशिदीत बांग दिली जात होती. कोंबडा आरवत होता. बैलांच्या गळ्यातल्या घंटा किणकिणत होत्या..आमराई जागी होत होती.

दाराची कडी वाजली..इतक्या पहाटे कोण आलं असेल? दारात विष्णू उभा होता.

''चहा इतक्या लवकर आणलास?''

''ताई, चहा नाही आणलो..काल तुमचं पत्र येऊन सोडलंय एक.. मी विसरून गेलो की...आत्ता मालक सांगून सोडलं की आत्ता देऊन सोड म्हणून. म्हणून ते द्यायला येऊन सोडलो बघा. घ्या. चहा आणून सोडू का?''

''आण''

''क्षिप्रा, पत्र आलंय..बघ कुणाचं आहे?''

''इथे? आणि पत्र? बघू...हे अक्षर तर माऊचं आहे..''

प्रिय आई,

तुला माझं पत्र बघून आश्चर्य वाटेल.

''मोठ्यांदी वाच...''

''तुम्ही सगळ्या जणी कित्येक वर्षांनंतर अशा एकत्र भेटत आहात. मला खरंच खूप बरं वाटतंय. इंदाक्का असताना जर अशा भेटला असतात तर?

'तू जेव्हा आमराईला जायचं असं म्हणालीस ना, तेव्हा जरा मला बेचैनी आली होती. तू आत्तापर्यंत आमराईचं जे काही वर्णन केलं होतंस, त्यावरून वाटत होतं की तू जाऊ नयेस. पण तुझी जिद्द...

'आणि मग जास्त आनंद झाला जेव्हा सगळ्या जणी यायला तयार आहेत, हे ऐकून. किती वर्षांनंतर भेटत आहात गं? काय चाललय? मजा करत आहात ना? आता संगत सोडू नका ..

'आवूमावाशी, मला अजूनही तुझं घर आठवतं. छोटंसं; पण नीटनेटकं. आणि तुझ्या हाताच्या विविध चटण्या..खोबऱ्याची, तिळाची, डाळींची, आमसुलाची, कैरीची,...तोंडाला पाणी सुटलं बघ. आणि तू मला शिवलेला तुझ्या साडीचा परकर ...खूप वर्षं जपून ठेवला होता मी. आणि तुझं शिकवणं ...गणित नाही आलं तर हळुवार चापटी मारणं...शिकवण्या

घेतेस का गं अजून? आणि तुझं भजन...ते कानडी भजन...

ओडी बारय्या वैकुंठा पती, निन्ना नो दुवे मन दडीमाय

शब्द बरोबर आहेत ना?'

'नंदामावशी..तुझ्याकडे माझी लेक चित्र काढायला यायची. काकांकडे.. जर आपण आधी दोस्त झालो असतो तर.. तर ती खूप काही शिकू शकली असती त्यांच्याकडे. काका गेले आणि तू एकटी पडलीस. आता कदाचित तुला असं वाटेल की तुला मूल हवं होतं एखादं. पण नंदामावाशी आम्ही आहोत तुझ्यासाठी. फक्त एकच कर. आईबद्दल जो आकस आहे तुझ्या मनात, तो काढून टाक. खूप वर्षं लोटली आहेत त्या घटनांना. आणि घडून गेलेल्या गोष्टी..बदलू तर शकणार नाहीत..पण येणारा काळ त्यानं दूषित होत राहील. सोडून दे आता. वरवरचं नको प्रेम..आतून येऊ दे. विनंती आहे तुला.

'कारीमावाशी, मला तुझा अभिमान आहे. स्वतः एकटी राहिलीस पण आपल्या बहिणींना मात्र देत राहिलीस कायम. मतभेद, कडवटपणा आला; पण त्याची कारणं समजली असतील तुला. मला तुझा अभिमान आहे. पारितोषिक मिळवलंस. मुख्याध्यापक झालीस...खूप चढ-उतार बघितलेस...पण ताठ राहिलीस आणि ताठ राहायला शिकवलंस..''

'नाईजामावशी गरिबीतही हसतमुखानं, समाधानानं संसार करता येऊ शकतो, हे समजतं तुझ्याकडे बघितलं की. किती तृप्त आहेस तू.. !'

'आणि मुसूमावाशी...तुला काय सांगू? तुझी आणि आईची कथा तशी सारखीच. दोघींनी प्रत्येक परिस्थितीला धीरानं तोंड दिलं. एकच... माझ्या आईनं तिच्या पिल्लांना सांभाळलं. तू का नाही गं तसं केलंस? का सोडून गेलीस शमीला? तिचं दुःख मी बघितलं आहे. ती तुझा तिरस्कार करते, हे गोष्ट खरी आहे. पण मावशी, तू आली आहेस ना परतून आता; मग घे तिला जवळ..तिलाही तूच तर आहेस एकमेव..ती नक्की येईल तुझ्यापाशी. तुझा आईवर राग आहे.. विसर ते आता. ती विसरली आहे. तिनं तुला क्षमा केली आहे. आणि पुढच्या वेळेस तुम्ही सर्वांनी माझ्या घरी यायचं. माझ्या घरी भेटायचं. तुम्हा सर्वांची एक गोष्ट जी अतिशय महत्त्वाची आहे, ती मी शिकले आहे. कशाही परिस्थितीत तुमचं हसत राहणं, आयुष्याला सहजतेनं घेणं, एकमेकींची चेष्टा करणं... संकटं सर्वांवर येतात; पण त्या संकटांना हसून स्वीकारण्याची तुमची मनोवृत्ती मी माझ्यात भिनवून घेतली आहे.

‘आणि आता आई... तुझ्याबद्दल काय लिहू? दौऱ्यावर असताना जेवणासाठी मिळणाऱ्या पैशातून तू आमचं आयुष्य घडवलंस. चहा-पाव खात राहिलीस आणि ते पैसे वाचवून आमच्या गरजा भागवल्यास. वडिलांचं प्रेम नाही मिळालं आणि तुझं प्रेम कळण्यासाठी खूप वर्षं घालवावी लागली. वडीलही प्रेम करत होते; पण एक हरलेला माणूस त्याचं प्रेम व्यक्त नाही करू शकला. आणि तू प्रेम करत होतीस पण तुझ्याकडे वेळ नव्हता. सतत कार्यरत असणं हा तुझा स्वभाव आम्हाला कधी एकटं करत होता तर कधी तुझ्या याच स्वभावामुळे आमची पोटं भरत होती. तुझी असहायता समजत नव्हती असं नाही; पण त्या वयात ती आमच्या पचनी पडत नव्हती. तू एकटीच एकटी नव्हतीस... मीसुद्धा एकटी होते. एकलकोंडी होते..पण मग स्थिर जीवन मिळालं. आणि मी थोडी बोलकी झाले. आज जेव्हा मी पंच्चावन्न वर्षं पूर्ण केली आयुष्याची, तेव्हा मला समजतो आहे तुझा प्रवास.. आणि आता तू तुझ्यासाठी काही करू इच्छितेस तर आई तुझी इच्छा नक्की पूर्ण होईल. आई तुझं आयुष्य म्हणजे एक समुद्राची लाट आहे. जी येते गतीनं, मध्येच झेप घेते, मोठी होते, किनाऱ्यावर येऊन फुटते..आणि मग शांत होते. अलगद माघारी जाते. आणि जाताना किनाऱ्यावरचा केरकचरा घेऊन जाते..

‘तू तशी आहेस...तुझ्या आयुष्यानं गती घेतली..यशाची उंची गाठली..तू झेप घेतलीस..मोठी झालीस..पण आदळलीस, फुटलीस

‘हे करत असताना अनेकांना गर्तेतून सावरलंस. अनेक जण आले, आपल्या छोट्याशा भाड्याच्या घरात राहिले, मुंबईत स्थिर झाले आणि निघून गेले..आजही ते तुला अक्का म्हणतात. पैशांसाठी कुणाकडे हात पसरले नाहीस. जे आधार तू शोधलेस त्यांनी मात्र तुला फसवलं. तरी तू उभी राहिलीस. आम्हा मुलींना कसं उभं राहायचं हे शिकवलंस. शेतकरी झालीस, आणि आता तर पौरोहित्य करतेस..स्वतःला कुठून कुठे आणून ठेवलंस.

‘‘तू परतून येशील ती हसतमुखाने येशील .. मी तुझं स्वागत करणार आहे
तुझी
माऊ.’

‘‘रडत्येस क्षिप्रा? अगं नशीबवान आहेस. आयुष्याच्या उतारावर काय हवं असतं माणसाला? आपल्या माणसांनी आपल्याला ओळखावं ...

गैरसमज नसावेत...अथवा कुठले समज असतील तर क्षमा करावं... आम्ही सगळ्या जणी येणार आहोत माऊकडे राहायला..पूस डोळे.''

मुसू विचारात पडली. 'खरंच करेल का शमी मला क्षमा? आता जर आपण शमीकडे गेलो तर ती म्हणेल....आली. आता एकटी पडली तेव्हा आठवण झाली हिला. नाही. हे मी सहन करू शकणार नाही. मी एकटी पडले म्हणून नाही आले, यावर तिचा विश्वास बसणार नाही. सोडून गेले होते तेव्हा...किती लहान होती शमी..आणि आपण तिला 'लग्न तरी कर नाहीतर तुझं तू बघ, पण इथे रहायचं नाही घरात...' म्हणून चक्क हाकलून लावलं. तिने केलं लग्न, तर तिच्या जिवावर दोन्ही मुलांना आणि सासूबाईंना टाकून निघून गेलो. वळून बघितलंही नाही. सासूबाई गेल्या..तेव्हासुद्धा नाही आलो..आणि रोहिणीनं लग्न जमवलं तर ..

अजयनं तोडलं सगळं.... नाही अजयनं नाही.. आजही आपण त्यालाच दोष देत आहोत.. मी तोडलं, असं म्हण मुसू.. मी तोडली नाती, मी तोडलं मुलांना, मीच .....स्वतःचा संसार थाटण्याची इतकी घाई झाली होती... त्यापुढे मुलांचं भवितव्य नाही बघितलं.. माऊ म्हणते ते खरं आहे, क्षिप्रानं मुलांना नाही सोडलं माझ्यासारखं...मी मात्र.. फक्त माझाच विचार. माझी चैन. माझा आराम...! सर्व फक्त माझं..माझं...! आणि म्हणूनच आज माझं काहीही नाही...एकटी तर मी आहे... मी , माझ्याचमुळे...'

मुसू तिरमिरीनं उठली. तिनं त्या रात्री लिहून ठेवलेले कागद तिच्या पर्समधून काढले. क्षिप्राच्या पुढ्यात ते ठेवले आणि म्हणाली,

''क्षिप्रा, हे काही लिहिलं आहे मी. तुम्ही सर्वांनी अगदी कसलीही भीडभाड न ठेवता तुमचं आयुष्य मोकळेपणानं व्यक्त केलंत. मीच राहिले होते. खरं तर माझ्यात तुमच्यासारखी हिम्मत नव्हती. म्हणून लिहून काढलं. आत्तापर्यंत हे लिखाण दाखवायची हिम्मत होत नव्हती. मला मोकळं व्हायचं होतं तुम्हा सर्वांसारखं. लिहून काढलं आणि वाटलं की झाले मोकळी, रिक्त, रिकामी. पण शांत नाही झाले. पण माऊचं पत्र ऐकलं आणि जाणवलं की खरं मोकळं तेव्हाच वाटेल जेव्हा हे लिखाण तुम्ही सगळ्या जणी वाचाल... मी देवळात जात आहे. तिथे बसून राहणार आहे. तुम्ही वाचा. मला क्षमा नको, माझी भलावण नको, कीव नको आणि आनंद नको. मी जात आहे. कुणी नंतर या बोलवायला... याल ना?''

मुसू निघून गेली. तिला आता कसलाही विचार करायचा नव्हता. ती देवळाच्या चौथऱ्यावर जाऊन बसली. डोळे मिटून घेतले आणि डोळ्यांमधून घळाघळा अश्रू ओघळू लागले. आणि प्रत्येक थेंबात तिला मुक्त वाटू लागलं. अगदी मुक्त...

जाग आली तेव्हा जेव्हा क्षिप्राचा हात तिच्या खांद्यावर विसावला. दोघींनी एकमेकींना घट्ट मिठी मारली.

''वेडाबाई, निघून आलीस इथे? चल. सगळ्या तुझ्या तुझी वाट बघत आहेत.''

एका खोलीत सगळ्या जणी हसून मुसूला कवेत घेत होत्या. आणि मुसू सर्वांमध्ये गुंतता गुंतता सुटत गेली. मोकळा श्वास म्हणजे काय, हे अनुभवत गेली.

''उद्या रात्री तुळशीच्या लग्नाच्या मुहूर्तावर जाऊ आपण वाड्यापाशी. आणि फटाके फोडू. कारंजी लावू, भुईचक्र घेऊ, बाण उडवू...''

''म्हातारे, डोळ्यांना वात दिसणार का?''

''भद्रा आहे ना, आणि त्याची लेक..ती लावेल फटाके. आणि रांगोळी काढायची आहे. मोठ्ठी. मुख्य दारापाशी. कंदील लावायचा.''

''कसा?''

''असा.. हा बघ.. आत बल्ब नाही तर मेणबत्ती लावायची.''

''आजची आपली संध्याकाळ तशी शेवटची. उद्या आपण वाड्यावर असणार आणि परवा सकाळी आपापल्या जागी जाणार. आज जाऊ या नदीवर? देवळात? आणि बाजारपेठेत?''

''जाऊ या.''

नदी शांत वाहत होती. तिच्या किनाऱ्यावर वर्दळ नव्हती. त्या चिखलावरून बारा पावलं उमटत होती. काही पुढे, काही मागे. नदीला त्याचं कौतुक नव्हतं. ती तिची मार्गक्रमणा करत होती. आणि नदी क्षणभर थबकली. तिच्या अंगाला पावलांचा स्पर्श झाला. त्या पावलांवरून तिने तिचे मुलायम हात फिरवले. त्या हातांच्या स्पर्शाने जहागिरदारांच्या कन्यका शहारल्या. नदीला नतमस्तक झाल्या. कदाचित हा तिचा शेवटचा स्पर्श असणार या विचारांनी व्याकुळल्या.

गावदेवीचा चौथरा आश्चर्य बघत होता. सहा वृद्ध महिला एकमेकींचा

हात धरून तो चौथरा चढत होत्या. त्यांच्या हातात परडी होती. नारळ, गजरा, हळदकुंकू, उदबत्ती आणि पेढे असलेली. धारवाडी साड्या नेसलेल्या त्या सहा जणी अतिशय प्रसन्न चित्ताने, समाधानाने गाभाऱ्यातल्या गावदेवीकडे पाणावलेल्या डोळ्यांनी बघत होत्या. सांजवेळ होती आणि आरतीला सुरुवात होणार होती...आवूनं बटव्यातून झांजा काढल्या..चांदीच्या. रेशमी दोरी असलेल्या..आणि झांजा वाजू लागल्या...घंटा घणघणू लागली....गावदेवी डोलू लागली....

आजचा दिवस शेवटचा दिवस... आज आता कुणी रडायचं नाही. गतकाळ आठवायचा नाही. आता आज जे करू ते फक्त मजेचं आनंदाचं असेल, असं प्रत्येकीनं मनोमन ठरवलं. आज कुठलीही पथ्यंसुद्धा पाळायची नाहीत. सर्व खायचं. अगदी यथेच्छ..हेही त्यांनी ठरवून टाकलं

बाजार गच्च भरलेला होता. त्यांच्या मनात काय आलं कुणास ठाऊक? एकीनं सुगंधी तेल घेतलं. एकीनं चंदनाचा साबण घेतला. भजी, वडे, आइस्क्रीम, ... आणि खिदळणं

चंद्र सर्व बघत होता. आता त्यानं त्याचे डोळे पूर्ण उघडले होते. त्याच्या डोळ्यांना त्या सहा जणी दिसत होत्या. आज तो एकाच खिडकीतून डोकावत होता. कारण दुसरी खिडकी आज कुणी उघडली नव्हती. एकाच खोलीत सहा जणी दाटीवाटीनं निजल्या होत्या- कुशीत निजल्यासारख्या. चंद्र हसत होता. त्याला उद्याच्या रात्रीचे वेध लागले होते. त्याला उद्या अजून मोठं व्हायचं होतं आणि खोलीत निजलेल्या त्या लहान होत जात होत्या.

कोंबडा आरवत होता. गावदेवीच्या देवळातल्या घंटा वाजत होत्या. मशिदीत बांग दिली जात होती. बैलांच्या गळ्यातल्या घंटा किणकिणत होत्या. आमराई जागी होत होती.

''चला गं..आज जरा तेल लावू अंगाला.''

''छान.. उटणं नको का?''

''आहे का?''

''आणायचं का?''

''वेड लागलंय तुम्हाला..''

''पण तेल लावायला हरकत नाही. छान थंडी आहे. ऊन ऊन पाण्यानं न्हाऊ मग. मी लावते सर्वांना तेल''

''मुसू..हात दुखतील हो..''

''नाही दुखायचे..आधी कोण येतंय?''

''मी...''

''ये ...असंच करू..जन्माप्रमाणे...उतरती भाजणी...''

आणि मग एका मागोमाग एक..हसत खेळत..थट्टा करत ....वेळ भरारा गेला. पोटपूजा झाली आणि प्रत्येकीनं आपापली बॅग लावायला घेतली. गेल्या आठ, दहा दिवसांत खोलीभर पसरलेले कपडे आवरले गेले. खोली हा हा म्हणता रिकामी भासू लागली. बॅगा गच्च भरल्या. आणि मनंसुद्धा भरून आली.

दिवस हा हा म्हणता उतरणीला लागला. संध्याछाया पसरू लागली. मनं जड झाली.

''निघायचं ना वाड्यावर जायला? आवू तुझ्यासाठी रिक्षा आणू?''

''नको. आज चालत येईन.''

अंबईचं चित्रं क्षिप्रानं पर्समध्ये ठेवलं. सहा जणी नटल्या आणि जड पावलांनी सगळ्या निघाल्या. भद्रा दुकानात त्यांची वाट बघत होता. त्यांना येताना बघून तो दुकानाच्या दाराशी आला.

''तुमचीच वाट बघून राहिलो होतो. या..गौरा आणि पद्माक्षी घरी बोलावून राहिल्यात तुम्हाला. अप्पाजी पण...''

''जाऊ या घरी. पण आधी वाड्यावर जाऊ..फटाके? आणि रांगोळी?''

''हे काय...बांधून ठेवून सोडलोय की सगळं''

''चला...''

''मी दोघींना वाड्यावर बोलावून सोडतो''

''बोलाव.''

वाड्याच्या मुख्य दाराशी सगळ्या पोचल्या आणि थबकल्या... पुन्हा पुन्हा बघत राहिल्या... वाड्याचा मुख्य दरवाजा सताड उघडा होता. दाराशी मोठ्ठी सुरेख रांगोळी काढलेली होती. दाराच्या दगडी कमानीवर मोठा कंदील झगमगत होता. पणत्या तेवत होत्या.. आणि दगडी पायवाट स्वच्छ केलेली होती.

सगळ्या जणी अगदी आश्चर्यचकित झाल्या होत्या...दुकानातून

वाड्याकडे येणाऱ्या भद्राला क्षिप्रानं बघितलं.

''भद्रा, हे काय आहे? तू केलंस हे सर्व?''

''क्षिप्रा, तू जाऊन सोडलीस ना गं साखरदांडेकडे..''

''हो''

''कुणी येऊन सोडलं काल त्यांच्याकडून आणि वाडा सजवून सोडला बघ.''

''खरंच?''

''मी खोटं सांगून सोडेन का?''

''मग तू काल का नाही सांगितलस आम्हाला?''

''मी फोन करून सोडलो की गं...तू घेऊन नाही सोडलीस....''

''कधी?''

''रात्रीला.''

''असं?''

''आत जायचं का आपण?''

''हो..जाऊन सोडा मी येतोच...''

तुळशी वृंदावन अजूनही जरा ओलसर होतं. सिमेंट वाळलं नव्हतं. तुळस वृंदावनात डोलत होती..आणि कोनाड्यात चांदीची समई तेलवातीने सजली होती.

क्षिप्रानं तिथं स्वस्तिक रेखाटलं. आवूनं पावलं काढली. हळद-कुंकू वाहिलं गेलं. आणि बाहेर फटाके फुटू लागले. तुळशीचं लग्न लागत होतं. समई उजळली..तुळशी वृंदावनभर प्रकाश झाला. अंबईचं चित्र तिथे ठेवलं गेलं...आणि मग मात्र त्यांचा बांध फुटला....

भग्नावशेष झालेल्या वाड्याच्या प्रत्येक दालनातून त्यांचं बालपण जणू पळत येत होतं...तुळशीला प्रदक्षिणा घालत होतं. झोपाळा झुलत होता आणि दागिन्यांनी मढलेली अंबई तुळशीच्या लग्नासाठी येत होती, तिला पूजायला....माजघराच्या दारातून...हातात तबक. तबकात सौभाग्य लेणं... आणि तिच्या चेहऱ्यावर मंदपणे पसरलेला चांदीच्या निरांजनात तेवणाऱ्या ज्योतीचा प्रकाश....

❖

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तक परिचय

फुल ब्लॅक

अमेरिकेच्या संपूर्ण विनाशाचा कट उधळून लावणारा स्कॉट हॉर्वाथ.

ब्रॅड थॉर यांची रहस्यमय कादंबऱ्यांचे अमेरिकन लेखक अशी ओळख आहे. 'द लायन्स ऑफ लुसेर्न', 'द फर्स्ट कमांडमेन्ट', 'द लास्ट पॅट्रियट' या त्यांच्या काही कादंबऱ्या. त्यांच्या कादंबऱ्या जगभरातील(जसे ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, रुमानिया, थायलंड इ.) देशांमधून प्रकाशित केल्या गेल्या आहेत. विविध दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील दहशतवादासंबंधीच्या चर्चेत त्यांचा नेहमी सहभाग असतो आणि त्यांच्या कादंबऱ्यांतूनही दहशतवादाचे पडसाद उमटतात. कादंबरीकार होण्याआधी ते 'ट्रॅव्हलिंग लाइट' या दूरचित्रवाणी मालिकेचे लेखक, निर्माता आणि निवेदक होते.

'द लास्ट पॅट्रियट' या त्यांच्या कादंबरीचे द इंटरनॅशनलथ्रिलर राइटर्स असोसिएशनच्या 'बेस्ट थ्रिलर ऑफ द इअर'साठी नामांकन झाले होते. तसेच त्यांच्या 'ब्लोबॅक' या कादंबरीला नॅशनल पब्लिक रेडिओच्या श्रोत्यांनी नेहमी सर्वोत्कृष्ट ठरलेल्या १०० रहस्यमय कादंबऱ्यांपैकी एक कादंबरी म्हणून मत दिले होते. रिचटॉपियाच्या जगातील सर्वाधिक प्रभावशाली २०० लेखकांच्या यादीत थॉर २६व्या क्रमांकावर आहेत.

द हेरिटेज फाउंडेशनचे ते सदस्य आहेत. तसेच अलेक्झांड्रियन डिफेन्स ग्रुपचे सहकारी (फेलो) आहेत. २०२०मध्ये अमेरिकेत होऊ घातलेल्या अध्यक्षीय निवडणुकीत ते डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात उभे राहणार आहेत, अशी जोरदार चर्चा आहे.

ब्रॅड थॉर

अनुवाद

बाळ भागवत

'न्यू यॉर्क टाइम्स'च्या तडाखेबंद विक्री होणाऱ्या साहसकथांच्या यादीत कायम स्थान मिळविणाऱ्या ब्रॅड थॉर यांची हेरगिरी, विश्वासघात आणि कटकारस्थाने यांच्या काळ्याकुट्ट जगामधील अत्यंत घाबरवून सोडणारी कथा.

श्वास घ्यायलाही फुरसत न देणाऱ्या, उत्कृष्ट तऱ्हेने गुंफलेल्या वेगवान घटना शेवटच्या पानापर्यंत खिळवून ठेवतात. काही कामगिऱ्या इतक्या प्राणघातक ठरू शकतात की, त्यांची कल्पना देशाच्या प्रमुखांनाही दिली जात नाही. काळोखातच आखलेल्या या कामगिऱ्या जशा काही अस्तित्वातच नसतात; पण अशा एका कामगिरीचा जेव्हा बोजवारा उडतो, तेव्हा पूर्वी नेव्ही सील टीम सहाचा सदस्य असणारा आणि अत्यंत गुप्तपणे दहशतवाद्यांचा माग काढणारा स्कॉट हॉर्वाथ आजपर्यंत अमेरिकेला तोंड द्यावे न लागलेल्या, अमेरिकेचा संपूर्ण विनाश घडविण्यासाठी रचलेल्या कटाच्या दहशतवादी सूत्रधारांच्या मागे लागतो.

पण या सूत्रधारांची ओळख हळूहळू पटायला लागल्यावर कुणावर विश्वास ठेवायचा, हे कळेनासे होते.

अमेरिकेला वाचविण्याचा एकच पर्याय त्याच्याकडे शिल्लक राहतो. तो स्वत:च पार नाहीसा होतो.

('फुल ब्लॅक' पुस्तकातून...)

अशा वेळीच, स्वसंरक्षणार्थ पिस्तूल बाळगण्यासाठी अजिबात सहकार्य न देणाऱ्या कॅलिफोर्निया राज्याचा गळा दाबावा, अशी ऊर्मी ल्यूक रॅल्स्टनच्या मनात निर्माण होई. आत्ता मध्यरात्र होती, फाटक लावून बंद केलेल्या खासगी इस्टेटीत एक व्हॅन त्याच्या गाडीमागोमाग आत घुसली होती आणि त्याच्याकडे शस्त्रही नव्हते. व्हॅन आणि तिचा ड्रायव्हर या क्षणी इथे असण्याचे पटेल असे कारण असू शकले असते; पण त्याला त्या बाबतीत शंकाच होती. एखादे शस्त्र जवळ असते, तर त्याला खूप बरे वाटले असते.

व्हॅन घेऊन ड्रायव्हर जर चांगल्या हेतूने आला नसेल, तर त्याच्याकडे शस्त्र असण्याची बरीच शक्यता दिसत होती, हे ध्यानात ठेवूनच रॅल्स्टनने हालचालीला सुरुवात केली.

त्याच्या लष्करी कारकिर्दीने *वेग, अनपेक्षित धक्का आणि जबरदस्त हिंसक अशी प्रतिक्रिया* या गोष्टी त्याच्या नसानसांत भिनवलेल्या होत्या. व्हॅन आणि ड्रायव्हरवर आधी हल्ला करणे शक्य झाले नसते तरी वेग आणि अनपेक्षित धक्का यांच्या बळावर तो परिस्थितीवर नियंत्रण ठेवू शकला असता.

त्याने गाडीचे हेडलाइट्स आणि प्रखर दिवे लावून ती दणक्यात व्हॅनच्या दिशेने न्यायला सुरुवात केली.

तत्काळ व्हॅनमधून ड्रायव्हरने खाली उडी मारली. त्याच्या हातात शॉटगन आहे असे वाटल्यावर रॅल्स्टनने पाय ॲक्सिलरेटरवर दाबला.

मोठा आवाज करत एक गोळी सुटली आणि रॅल्स्टनच्या पोर्शेच्या पुढल्या भागावर आदळली. गोळी झाडणारा माणूस हेडलाइट्स उडवायचा प्रयत्न करत असावा. फार मोठी चूक.

रॅल्स्टनची गाडी वेगात निघाली होती. तो गाडी सरळ ड्रायव्हरच्या दिशेनेच नेत होता. त्या माणसाने दुसरी गोळी बंदुकीच्या चेंबरमध्ये घातली असेल आणि रॅल्स्टनने दिवे बंद केले. त्या माणसाला क्षणभर काहीही दिसेनासे झाले.

गाडीच्या आवाजाच्या दिशेने नेम धरण्याशिवाय तो काहीच करू शकत नव्हता आणि गाडी भर वेगात त्याच्याचकडे निघाली होती.

व्हॅनचा ड्रायव्हर खरोखर नेमबाज होता की नशीबवान, याची रॅल्स्टनला

TBC 'क्लासिक'साठी खास सवलत!

७वी आवृत्ती

द दा विंची कोड

डॅन ब्राऊन

अनुवाद

अजित ठाकूर



किंमत : ३२०/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पॅरिसमधील लूव्ह्र या सुप्रसिद्ध संग्रहालयाच्या वयस्कर व्यवस्थापकाचा संग्रहालयामध्येच खून होतो. विचित्र गोष्ट अशी की, त्यांच्या मृतदेहाभोवती जमिनीवर गोंधळून टाकणारी काही चिन्हे आणि खुणा दिसतात. या खुणांचा शोध घेण्याची कामगिरी त्याचवेळी पॅरिसमध्ये आलेल्या रॉबर्ट लँग्डन या हॉर्वर्ड विद्यापीठातील चिन्हशास्त्रतज्ज्ञावर सोपवली जाते. फ्रान्समधील निष्णात गुप्तलिपीतज्ज्ञ सोफी नेव्ह्यू हिच्या मदतीने लँग्डन या चित्रविचित्र खुणांमधून खुनाला वाचा फोडणारी काही दिशा मिळते का, याचा शोध घेतो. यातूनच मग काही वेगळेच रहस्य उजेडात येते. जगप्रसिद्ध चित्रकार लिओनार्दो दा विंचीच्या अनेक चित्रांमधून अत्यंत कौशल्यपूर्ण रीतीने दडवलेले संकेत दोघांना आश्चर्यचकित करतात.

खून झालेले संग्रहालय-व्यवस्थापक 'प्रायरी ऑफ सायन' या पंथाशी संबंधित असतात, ही स्फोटक माहितीही त्यांना कळते. अत्यंत गुप्तपणे काम करणाऱ्या या पंथामध्ये सर ऐझॅक न्यूटन, व्हिक्टर ह्यूगो आणि दा विंची अशा अनेक नामवंत व्यक्ती कार्यरत होत्या. संग्रहालय-व्यवस्थापकांनी मती गुंग करणारे एक ऐतिहासिक सत्य जिवापाड जपलेले असते.

हा शोध घेत असताना एक अव्यक्त प्रतिगामी शक्ती सतत रॉबर्ट आणि सोफीचा पाठलाग करीत असते. अखेर प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेले एक स्फोटक सत्य खुणा आणि संकेतांच्या भूलभुलैय्यातून बाहेर येते.

कल्पना नव्हती; पण दुसरी गोळी तसाच आवाज करत विंडशील्डला भोक पाडून आत घुसली. बकशॉट्स -छर्रे - असते तर ते काचेवरून तसेच उडाले असते. जो कोणी त्याच्यावर गोळीबार करत होता, तो स्लग्ज - वजनदार आणि टोकदार खिळ्यांसारख्या गोळ्या वापरत असणार. त्याच्या शेजारच्या सीटच्या चिंध्या उडाल्या असणार हे कळण्यासाठी रॅल्स्टनला वळून बघण्याची गरज नव्हती. गोळी जर काही इंच डावीकडे बसली असती तर त्याची तीच गत झाली असती.

आता ९११ च्या इंजिनाची धडधड ऐकवेनाशी झाली. पुढे जे घडणार होते त्यासाठी रॅल्स्टन तयार झाला.

पुन्हा एकदा गाडीचे हेडलाइट्स आणि प्रखर दिवे लावताच गोळ्या झाडणाऱ्या माणसाचे डोळे दिपले. प्रचंड दणका उडवत शॉटगनमधून गोळी सुटली, पण त्या माणसाने केलेली ती शेवटचीच गोष्ट होती. रॅल्स्टनच्या गाडीच्या पुढल्या उजव्या बाजूने त्या माणसाला जोरदार धडक दिली.

पण फेकला जाण्याऐवजी तो धिप्पाड माणूस अर्धा गाडीखालीच आला. रॅल्स्टनने गाडीवर ताबा ठेवायचा प्रयत्न केला; पण अदृश्य अशा शक्तीने जणू काही गाडीला उचलून तिच्या सस्पेन्शनखालून त्या माणसाला खेचायचा प्रयत्न केला. पोर्शे उजव्या बाजूला कलंडायला लागली. ती नक्की आडवी होणार असे वाटत असतानाच दाणकन जमिनीवर आदळली.

रॅल्स्टनने गाडीचे चाक घट्ट धरून ती ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. शेवटी ओल्या गवतावर गर्रकन फिरत तिची बाजू शेजारच्या इमारतीवर आदळली आणि ती थांबली. एक भयानक क्षण संपला आणि पुढचा सुरू झाला.

बांधलेला पट्टा सोडून रॅल्स्टनने गाडीबाहेर पडायची धडपड सुरू केली. गाडीची पार वाताहत झाली होती. घाबरल्यामुळेच त्याच्या शरीराची थरथर झाली.

घरामध्ये गोळी झाडल्याचा एक दबका आवाज आला आणि तो भानावर आला. अजून धोका होताच.

ड्रायव्हरची शॉटगन शोधण्यासाठी वेळ दवडण्यात अर्थ नव्हता. फ्लॅशलाइट शिवाय ती पटकन सापडण्याची शक्यता फार कमी होती. व्हॅनमध्ये दुसरी कुठली बंदूक असली, तर तीही शोधता आली नसती. रॅल्स्टनने घराच्या दिशेने धाव घेतली. घरामध्ये शिरून सालोमनचा जीव वाचवायला

हवा होता.

जो कुणी आत असेल त्याने सर्व्हिस रोडवरच्या गोळीबाराचे आवाज ऐकले असणारच. कॅनिअनच्या या एकाकी जागेत एखाद्या शेजाऱ्याने शॉटगनच्या दणक्यांचे आवाज ऐकल्यावर पोलिसांना बोलावले असले, तरी काही फरक पडणार नव्हता. पोलीस येईपर्यंत इथे जे काही घडत होते, ते सर्व संपणार होते. सालोमन आतमध्ये अजूनही जिवंत असेल तर हल्लेखोर निर्धाराने हल्ला चढवून आपले काम संपवून जाणार होते. रॅल्स्टनला घाई करणे भाग होते.

अशा घरफोड्यांत बहुधा नेहमीच *आतल्या कुणाचातरी* हात असतो. हल्लेखोरांना घराच्या अंतर्भागाचा संपूर्ण आराखडा माहीत असतो. घरातील प्रत्येक वस्तू आणि प्रत्येक माणूस कुठे असणार, हे कळलेले असते. या घरफोड्यांना त्यांची रॅल्स्टनशी गाठ पडणार आहे, याचीच फक्त कल्पना नव्हती आणि रॅल्स्टनलाही घराच्या अंतर्भागाची रचना ठाऊक होती.

व्हॅन ज्या ठिकाणी वळली होती ती जागा लक्षात घेता आत गेलेल्या घुसखोराला घराच्या सर्व्हिस एन्ट्रन्सपाशी - नोकरचाकर वापरतात त्या प्रवेशद्वाराजवळ किंवा त्या प्रवेशद्वाराशीच - सोडले होते. *नक्कीच आतला कुणीतरी माणूस त्यांना फितूर झालेला असणार.* तो दाराजवळ आला. ते टेकू देऊन उघडे ठेवले होते. आत जाण्यासाठीच नव्हे तर बाहेर पडण्यासाठीही याच दाराचा वापर होणार होता.

टेकू लावून दार उघडून ठेवल्याचा एक फायदा रॅल्स्टनला होणार होता. सालोमन सुरक्षा यंत्रणा पुन्हा सुरू करायची तसदी कधीच घेत नसे. तीन वेळा धोक्याचा इशारा होऊन गेला असणार. रॅल्स्टन आत शिरल्याचे कुणाच्या लक्षात आले नाही.

सर्व्हिस एन्ट्रन्सजवळ युटिलिटी रूम होती. दररोज लागणारे सामानसुमान ठेवायची जागा. ती एक कुटुंब राहू शकेल अशा छोट्या अपार्टमेंटएवढी मोठी होती. त्या खोलीत इतर वस्तूंबरोबर इलेक्ट्रिक सर्किट ब्रेकर्सचे आठ पॅनेल्स होते.

रॅल्स्टनने वीजपुरवठा तोडला आणि घरात अंधार पसरला. अंधाराला डोळे सरावल्यावर तो शस्त्र शोधायला लागला. कुठलेही शस्त्र.

तो गोल्फ क्लब वापरू शकला असता; पण हाताळायचा सराव असणारी वस्तू त्याला हवी होती. ती त्याला किचनमध्ये सापडली. त्याला गरज होता

तीच. योग्य शस्त्र. खूप मोठे नाही की खूप लहान नाही. चाकू-सुऱ्या ठेवण्याच्या ठोकळ्यामधून त्याने अत्यंत धारदार असा सात इंच लांबीचा मासे कापण्याचा सुरा उचलला.

तो पुढे सरकला. बाहेर असताना त्याने घरामध्ये गोळी झाडल्याचा दबका आवाज ऐकला होता. त्या गोळीचा बळी त्याला आढळला. तो सालोमन नव्हता, हे बघून त्याला समाधान वाटले.

जीन्स, टी-शर्ट, चक टेलर्स या स्टोअरमधून विकत घेतलेले शूज घातलेला एक विशीतला तरुण. कॉलेजमधला पोरगाच वाटत होता. रॅल्स्टनने यापूर्वी त्याला कधीही बघितले नव्हते. *हा होता तरी कोण?* तो विचार करायला लागला. *मित्र? भेटायला आलेला नातेवाईक? की कामाला ठेवलेला माणूस?*

त्याच्या दोन डोळ्यांच्या बरोबर मध्ये गोळी मारली होती. तो बहुधा एका वाटीत दूध घातलेले सीरिअल - गहू, बार्ली, मका, ओट वगैरे कशाचे तरी पोहे खात होता. वाटी उपडी पडली होती आणि जमिनीवर दूध आणि रक्त यांचे थारोळे साठले होते. तो मेला आहे याची खात्री होती तरी रॅल्स्टनने नाडीचे ठोके लागत नाहीत ना, याची खात्री करून घेतली. शरीर अजूनही गरम होते.

त्याने घाईघाईने किचन ओलांडले आणि तो अंधाऱ्या डायनिंग रूममध्ये - जेवणाच्या खोलीत शिरला. सर्व काही जागच्या जागी वाटत होते. मौल्यवान कलाकृती भिंतीवर टांगलेल्या होत्या. चांदीच्या प्राचीन वस्तूंची पेटीही कपाटावर तशीच होती. या गोष्टी आणि ज्या तऱ्हेने किचनमधल्या तरुणावर गोळी मारली होती ते लक्षात घेता, हा चोरी-दरोड्याचा प्रकार नाही तर व्यावसायिक माणसांनी केलेला खुनी हल्ला आहे, याबद्दल त्याची खात्री पटत चालली होती.

हा विचार त्याच्या मनात बळावत असतानाच, जी एक खराब झालेली लाकडाची फळी सालोमनने बदलण्याचे कष्ट घेतले नव्हते, तिच्यावर कुणीतरी पाऊल ठेवल्याचा आवाज आला.

❖

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

TBC च्या सभासदांना निम्म्या किमतीत

ब्लॅक लिस्ट (सारांश...)

अनुवाद : बाळ भागवत

माहिती तंत्रज्ञानाचा गैरफायदा घेऊन अमेरिकेचं (आणि पर्यायाने तेथील प्रत्येक नागरिकाचं) अस्तित्वच धोक्यात आणण्याचं एटीएस या कंपनीचं जबरदस्त नियोजन असतं. हे नियोजन नक्की काय आहे, हे जाणून घ्यायचा प्रयत्न कार्लटन ग्रुप करत असतो; कारण एटीएस कंपनी जे काही करते आहे, ते देशाच्या विरोधात आहे, याची कुणकुण कार्लटन ग्रुपला लागलेली असते. हा ग्रुप दहशतवादाच्या विरोधात काम करत असतो. दहशतवाद्यांना आणि त्यांच्या नेत्यांना शोधा, गाडा आणि ठार करा, अशी त्यांची कार्यपद्धती असते. तर असा हा ग्रुप आपली योजना उधळून लावू शकतो, याची कल्पना एटीएस कंपनीला असते. त्यामुळे कार्लटन ग्रुपच्या सदस्यांना ठार मारण्याचा सपाटा एटीएस कंपनीने लावलेला असतो. एटीएस आणि कार्लटन ग्रुप यांच्यामधील जीवघेणा संघर्ष 'ब्लॅक लिस्ट' या कादंबरीत रंगवला आहे.

या कादंबरीची सुरुवात होते एका थरारक पाठलागाने. कॅरोलाइन रोमरो या तरुणीचा काही लोक पाठलाग करत आहेत. ती कोण आहे आणि ते लोक कोण आहेत, याचा उल्लेख सुरुवातीला येत नाही; पण त्या लोकांपासून तिच्या जिवाला धोका आहे, हे सूचित होते. कॅरोलाइन तिच्या बहिणीला नीनाला एक पेन ड्राइव्ह पाठवते. त्यानंतर कॅरोलाइनचा खून होतो.

नीना त्या ड्राइव्हच्या संदर्भात निकोलसशी संपर्क साधते. तो बुटका असतो. त्याच्या आई-वडिलांनी लहानपणीच त्याला कुंटणखान्याला विकलेलं असतं. तिथे त्याला अनन्वित अत्याचारांना तोंड द्यावं लागलेलं असतं. दारूच्या नशेत बरळणाऱ्या गिऱ्हाइकांकडून माहिती गोळा करण्याच्या सवयीमुळे तो माहिती मिळवण्यात वाकबगार होतो. पश्चिमी देशातील इन्टेलिजन्स एजन्सीज त्याला फक्त ट्रोल या नावाने ओळखत असतात. अत्यंत गोपनीय आणि

संवेदनाक्षम माहितीच्या खरेदी-विक्रीचा धंदा त्याने अत्यंत फायदेशीर उद्योग बनवलेला असतो. तो स्वतः कोणत्याही सॉफ्टवेअरमध्ये अनधिकृतपणे प्रवेश मिळवणारा उत्कृष्ट असा हॅकर असतो. शेअर बाजारासाठी लागणारे अत्यंत उच्च दर्जाचे ट्रेडिंग सॉफ्टवेअर विकसित करून आणि जगामधल्या मोठमोठ्या बँकांना विकून त्याने प्रतिष्ठा आणि प्रसिद्धीही कमावलेली असते. अनाथाश्रमांसाठी काम करत असताना त्याची स्कॉट हॉर्वाथ या कार्लटन ग्रुपच्या सदस्याशी भेट होते आणि त्या दोघांचे मैत्र जुळते.

कॅरोलाइनने नीनाला पाठवलेल्या ड्राइव्हमुळे एटीएसच्या संदर्भात काही महत्त्वाचा धागादोरा हाती लागण्याची आणि कॅरोलाइनच्या खुनाचं रहस्य उलगडण्याची शक्यता असते. अर्थात नीना या सगळ्यापासून अनभिज्ञ असते. निकोलसकडून कॅरोलाइनच्या बाबतीत नीनाला समजतं. कॅरोलाइन संगणक क्षेत्रामधील जादूगार असते. तिने आश्चर्यकारक सॉफ्टवेअर्स लिहिलेली असतात; पण अनेक प्रोग्रॅमर्स करतात त्याप्रमाणे कधी गरज पडलीच तर बँकेच्या सॉफ्टवेअरमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी तिने गुप्तपणे एक चोरदरवाजा उघडा ठेवलेला असतो. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीमधला संजय नावाचा माणूस बँकेची गुप्त माहिती चोरून काळ्या बाजारात विकत असतो. कॅरोलाइनच हे करते आहे अशा तऱ्हेने बदल करून तो तिला फशी पाडतो.

स्वतःचे निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी कॅरोलाइनने अनेक विसंगतींवर बोट ठेवूनदेखील बँक तिला काढून टाकते. दोन दिवसांनी ती त्यांच्या सॉफ्टवेअरमध्ये शिरकाव करून घेऊन आठवडाभर त्यांची एटीएम मशिन्स बंद पाडते. त्यामुळे पोलीस तिला अटक करतात. मात्र मशिन्स पुन्हा ऑनलाइन कशी आणायची हे कुणाला कळत नसतं. शेवटी बँकच माघार घेते आणि तिला तडकाफडकी काढून टाकल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून तिला नुकसानभरपाई देते; मात्र या नंतर कुठलीही बँक तिला नोकरीवर ठेवणे शक्य नसते. यामुळे एटीएससाठी काम करायचे ती ठरवते. दरम्यान, तिचा खून होतो.

इकडे कार्लटन ग्रुपचा सदस्य असलेल्या स्कॉट हॉर्वाथवर एका फ्लॅटमध्ये हल्ला होतो. त्याच वेळेला तिथे असलेली कार्लटन ग्रुपची सदस्य रायली टर्नर या हल्ल्यात मारली जाते. रायलीला मारणाऱ्या हल्लेखोरांना हॉर्वाथ ठार मारतो; पण रायली त्या वेळेला नेमकी तिथे कशी आली होती, याचं कोडं त्याला उलगडत नसतं. हॉर्वॉर्थ हा कार्लटन ग्रुपचा अत्यंत धाडसी, हुशार आणि

सुदृढअसा सदस्य असतो. त्याच्यावरच्या हल्ल्यानंतर तो कार्लटन ग्रुपचा संस्थापक आणि प्रमुख कार्लटन याच्याशी संपर्क साधू पाहतो, तसेच ग्रुपमधील इतर सदस्यांशीही संपर्क साधू पाहतो; पण संपर्क होऊ शकत नाही. त्यामुळे ग्रुपमधील सदस्य आणि कार्लटन मृत्युमुखी पडल्याची भीती हॉर्वाथला वाटायला लागते.

हॉर्वाथची भीती अंशत: खरी असते. त्याच्या ग्रुपच्या सदस्यांना ठार मारण्यात आलेलं असतं आणि ग्रुपचा प्रमुख कार्लटन याच्या घराला आग लावून त्यालाही ठार मारण्याचा घाट घालण्यात आलेला असतो; पण कार्लटन त्यातून शिताफीने सुटतो. शत्रू आपल्या हात धुऊन मागे लागला आहे, हे त्याच्या लक्षात येतं. त्यामुळे आपण जिवंत आहोत, हे शत्रूला कळू न देण्यासाठी त्याला प्रचंड गुप्तता पाळावी लागत असते. त्यामुळे हॉर्वाथशी संपर्क साधणंही त्याला अवघड झालेलं असतं. तरी एकदोनदा प्रयत्न केल्यावरही त्याचा हॉर्वाथशी संपर्क होऊ शकत नाही. त्यामुळे हॉर्वाथ जिवंत आहे की नाही, याबद्दल त्याला शंका वाटायला लागते. कर्ट श्रोडर आणि कर्नल ब्रेमर, क्रेग मिडलटनच्या आधिपत्याखाली एटीएससाठी काम करत असतात. त्यापैकी श्रोडर हा हॅकर असतो.

हॉर्वाथवर वारंवार होत असलेले हल्ले, त्या हल्ल्यांना तोंड देत त्याची सुरू असलेली भटकंती, कार्लटनची ओळख लपवत फिरण्याची धडपड, क्रेग मिडलटनने हॉर्वाथला ठार करण्यासाठी चालवलेले प्रयत्न, कॅरोलाइनच्या ड्राइव्हमध्ये असलेले रहस्य उलगडण्याचा निकोलसचा चाललेला प्रयत्न यांच्या तपशीलवार आणि उत्कंठावर्धक चित्रणातून ही कादंबरी पुढे सरकत राहते. काय असतं कॅरोलाइनच्या ड्राइव्हमध्ये? कार्लटनची आणि हॉर्वाथची भेट होते का, एटीएसचे धागेदोरे हॉर्वाथच्या हाती लागतात की तो एटीएसच्या हल्ल्यांना बळी पडतो...या प्रश्नांची उत्तरं अर्थातच 'ब्लॅक लिस्ट' हे पुस्तक वाचल्यावर मिळतात.

तेव्हा एकदा हातात घेतल्यावर वाचून पूर्ण केल्याखेरीज वाचक ती खाली ठेवणार नाही, अशी ही कादंबरी अवश्य वाचावी अशी आहे.

❖

ई-बुक स्वरूपात उपलब्ध
TBC च्या सभासदांना निम्म्या किमतीत

पुस्तक परिचय

हाऊ स्टारबक्स सेव्हड माय लाइफ

एका लक्ष्मीपुत्राला जनसामान्यांचं जीवन जगायचं शिक्षण देणारी आगळीवेगळी कथा

द न्यू यॉर्कर या मासिकातील एक लेखक, ब्रेंडन गिल यांचा मुलगा मायकेल गेट्स गिल. जे. वॉल्टर थॉम्पसन या सुप्रसिद्ध जाहिरात निर्मिती संस्थेत त्यांनी पंचवीस वर्षांहून अधिक काळ नोकरी केली. सध्या न्यू यॉर्क शहरातील ज्या स्टारबक्सच्या कॉफीशॉपमध्ये ते नोकरी करतात. तेथून जवळच अगदी चालत जाण्याच्या अंतरावर ते राहतात. आयुष्यात त्यांना पहिल्यांदाच मनाजोगती नोकरी मिळाली असल्यामुळे निवृत्त होण्याचा विचारही त्यांना करावासा वाटत नाही.



मायकेल गेट्स गिल

अनुवाद

नीला चांदोरकर

'चिंधीपासून सुरुवात मग सिंधू घेतला कवेत,' असं म्हणता येईल अशी ही एका जाहिरात क्षेत्रातील उच्चपदस्थाची कहाणी. सर्व सुखांच्या राशींवर आरूढअसलेला हा माणूस जन्मापासूनच भाग्यवंत, चांदीचा चमचा तोंडात घेऊनच जन्मलेला; पण- नशिबाच्या एका फटकाऱ्या- सरशी अक्षरश: होत्याचं नव्हतं झालं. अशा वेळी पुन्हा एकदा दैव त्याच्यावर प्रसन्न झालं, ते एका अठ्ठावीस वर्षांच्या तरुणीच्या रूपात. त्याला स्टारबक्स या कॉफीशॉपमध्ये तिनं नोकरी देऊ केली. वयाची पन्नाशी उलटली तेव्हा मायकेल गेट्स गिलकडे काय नव्हतं?-उपनगरात एक प्रशस्त घर, पत्नी, चार मुलं, सहाआकडी पगार आणि आयव्ही लीग म्हणून गणल्या जाणाऱ्या संस्थेतून घेतलेलं शिक्षण. उच्चमान्यताप्राप्त शिक्षण वगळता, (केवळ काही वर्षांनी) यांपैकी काहीही त्यांच्याकडे उरलं नाही- आधी नोकरी गेली, मग घटस्फोट झाला आणि त्यानंतर मेंदूवर कर्करोगाची गाठ आहे असंही त्यांच्या डॉक्टरांनी त्यांना सांगितलं. महाबिकट परिस्थिती समोर ठाकली. स्टारबक्समध्ये नोकरी मिळताच ती घेण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा मार्गच नव्हता. पंचतारांकित हॉटेलांमध्ये ज्यांनी आपल्या अशिलांबरोबर व्यावसायिक वाटाघाटींच्या निमित्तानं जेवण घेतलं होतं, तो माणूस आता कॉफीशॉपमधलं प्रसाधनगृह स्वच्छ करू लागला.

त्यांच्या सुदैवानं त्यांना एक गुरू भेटते. जीवन कसं जगायचं असतं, याचे वस्तुपाठ ती त्यांना देते. वास्तविक पाहता, या दोघांमध्ये काडीचंही साधर्म्य नाही. ती एक तरुणी कृष्णवर्णीय आफ्रिकन- अमेरिकन, मादक द्रव्याच्या आहारी गेलेल्या एका बाईची मुलगी, तर ते नेहमीच अधिकारपदावर काम केलेले, हुकूम सोडण्याची सवय असलेले गौरवर्णीय अमेरिकन; पण एक 'अल्पसंख्याक' म्हणून त्यांच्याबरोबर काम करू लागल्यावर त्यांना अनेक नवी आव्हानं स्वीकारावी लागतात. समोरच्या व्यक्तीला आदरानं, सन्मानानं वागवण्याची शिकवणही त्यांना याच ठिकाणी मिळते. जनसामान्यांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेल्या या कॉफीशॉपमध्ये माइकला अनेक जिवाभावाचे दोस्त मिळतात, आपल्या दुरावलेल्या मुलाबाळांशी त्यांचे पुन्हा एकदा सलोख्याचे संबंध निर्माण होतात. क्रिस्टलसारखी मार्गदर्शक लाभल्यामुळे गमावलेला आत्मसन्मान त्यांना परत एकदा गवसतो आणि त्याहून महत्त्वाची बाब म्हणजे सुखाची गुरुकिल्लीही त्यांना स्टारबक्समध्येच सापडते.

('हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाइफ'पुस्तकातून...)

मी थोडा मोठा झाल्यावर बाबांनी ब्रेंडन बेहॅन नावाच्या एका अफाट आयरिश नाटककाराला बोलावलं होतं. त्यांनी एक आचरट गीत लिहिलं होतं, नरकाच्या घंटा तुम्हाला मंजूळ वाटत असतील, पण मला नाही वाटत.

ब्राँक्सव्हिलमधले ते दिवस छानच होते, असं मी माझ्या मनाला समजावलं तरी अंतरीची गोष्ट सांगायची झाली तर मला असंच म्हणावं लागेल की त्या जंगी मेजवान्या, ते नामांकित साहित्यिक माझ्या लेखी तरी नगण्यच होते. त्यापेक्षा वडिलांच्या संगतीत एकट्यानंच काही वेळ घालवायला मला जास्त आवडलं असतं.

आता मीच चौसष्ट वर्षांचा झालोय, मी स्वत:ला आठवण करून दिली. लवकरच माझाही अंत होईलच... बेहॅनचं गाणं फक्त म्हणतच नाही, जुन्या आठवणी उगाळत, डोळ्यातून टिपं काढतच मी उर्वरित आयुष्य जगणार आहे का? जी काही वर्षं उरली आहेत, ती सकारात्मक दृष्टिकोन ठेवूनच जगायला हवीत.

स्टारबक्समधल्या माझ्या नव्या नोकरीवर जात असताना मी गाडीतल्या गर्दीतला एक बिनचेहऱ्याचा अनामिक माणूस होतो. रेटारेटी करून बसलेला असताना मला सुप्रसिद्ध लेखक, एफ. स्कॉट फिट्झजेराल्डचं एक वाक्य आठवलं, *अमेरिकनांच्या जीवनात दुसरा अंक हा प्रकारच नसतो.*

मी पुन्हा एकदा नव्यानं आयुष्य जगायला निघालेला एक मुसाफिर होतो का? आज मी जे आयुष्य जगत होतो तसलं धकाधकीचं आयुष्य जगणारे लोक काही वर्षांपूर्वी माझ्या दृष्टीनं क्षुद्र होते. म्हणजे मीच चुकीच्या मार्गानं जात होतो का?

एक दीर्घ श्वास घेऊन मी ताठ बसलो. पुन्हा माझ्या मनातल्या शंकाकुशंकांना दूर करण्यासाठी सज्ज झालो.

मला मनापासून वाटलं, क्रिस्टलबरोबर काम करायला मजा वाटते आहे. ही गोष्ट स्वत:शीही कबूल करायला मला जड जात होती की जे. वॉल्टर थॉम्पसनमध्ये उच्च पदावरील नोकरी करत असताना मला जितका आनंद वाटत असे, त्याहून कितीतरी जास्त आनंद मला स्टारबक्समध्ये काम करताना मिळत होता.

स्वत:शीच प्रामाणिकपणे वाग माइक, मी विचार करू लागलो. माझ्याही नकळत मी स्वत:ला स्टारबक्समधल्या माझ्या नावानं संबोधलं होतं. *तुला सध्याच्या कामामुळे फार बरं वाटतं. अंगावर ब्रूक्स ब्रदर्सच्या*

सूटऐवजी स्टारबक्सचा ॲप्रन बांधलायस, तेवढ्याचवरून असं म्हणता येणार नाही की तुला या कामातून आनंद मिळत नाहीये.

मला एकदम हसू आलं. मी मोठ्यानं हसलो.

माझ्या अवतीभोवतीचे लोक दचकून माझ्याकडे पाहायला लागले.

माझ्या डोळ्यातले अश्रू त्यांना दिसले नव्हते, पण माझं मोठ्यानं हसणं, तेही अशा खचाखच भरलेल्या गाडीच्या डब्यात, त्यांना नवीनच होतं.

गाडी ग्रँड सेंट्रल स्थानकात शिरली तेव्हा माझं मन पुष्कळच हलकं झालं होतं. आयुष्यात वरवर जाण्याची महत्त्वाकांक्षा असणाऱ्या तरुणांपेक्षाही जलदपणे मी डब्यातून खाली उतरलो. त्यांच्यापैकी फारच थोडे मी ज्या भागात -टाइम स्क्वेअर आणि अप्पर वेस्ट साइड- जाणार होतो तिकडे जाणारे होते.

मी पुढच्या गाडीत चढलो तेव्ही माझ्या मनाची उभारी माझ्या ताठ उभं राहण्यात प्रतिबिंबित झाली होती.

स्टारबक्समध्ये काम करण्यात कसलाही कमीपणा वाटायचं कारण नाही, मी माझ्या मनाला समजावलं. *उलट जास्तच चांगलं आहे.* आता मला माझा छोटासा फ्लॅटही परवडणार होता. हे घर म्हणजे माझ्या बालपणीचं प्रासादतुल्य घर नव्हतं किंवा माझ्या मुलाबाळांसह, पहिल्या बायकोसह मी ज्या फार्महाउसमध्ये राहिलो होतो ते सुंदर घरही नव्हतं. पण काही असलं तरी आता हे माझं घर होतं. माझा एकट्याचा निवारा होता.

जलदगती गाडीनं मी शहाण्णवाव्या रस्त्यावर आलो. भुयारी रेल्वेस्थानकातून पायऱ्या चढत मी वर आलो. चहूकडे स्वच्छ प्रकाश पसरला होता. न्यूयॉर्क शहरातला एक सुंदर दिवस...वसंत ऋतूतला एक असा क्वचितच आढळणारा दिवस, ज्या वेळी आसमंतात कोवळ्या उन्हाची चमचम जाणवते.

त्र्याण्णवाव्या रस्त्यावरच्या कोपऱ्यावरील स्टारबक्सची हिरवी पाटी मी पाहिली. एक प्रकारच्या अनोख्या उभारीनं मी झपझप पावलं टाकू लागलो.

पुन्हा एकदा फिट्झजेराल्ड या कवीचं आणखी एक सुवचन मला आठवलं. त्यांची पत्नी उत्तर कॅरोलिनामधल्या ॲशव्हिल या गावी असलेल्या मनोरुग्णालयात उपचार घेत होती. अनेक वर्षं तिची प्रकृती खालावतच गेली होती. तिथे लागलेल्या आगीत तिला मृत्यू आला होता. झेल्डानं, त्यांच्या पत्नीनं, पूर्वायुष्यात दिलेलं वचन पाळलं नव्हतं. त्याविषयी लेखकानं

आपल्या मुलीला लिहिलं होतं, *काम म्हणजेच सन्मान, हे तत्त्व फार उशिरा समजलं तुझ्या आईला.*

काम म्हणजेच सन्मान, मी ते शब्द स्वत:शीच उद्‌गारले. आता हाच माझ्या आयुष्याचा मंत्र ठरणार होता.

हे महत्त्वाचं तत्त्व आकळायला मला इतका उशीर का लागला होता? फिट्‌झजेराल्डनी जी शिकवण आपल्या मुलीला दिली ती मी मात्र आचरणात आणू शकलो नव्हतो. उलट, माझ्या मुलीला- एलिझाबेथला, काम करायचं होतं तेव्हा मी तिला विरोधच केला होता. तिला मी बिस अशी हाक मारत असे. बिस बारा वर्षांची होती तेव्हा तिला उन्हाळ्याच्या सुट्टीत एक काम मिळालं होतं. एका व्यावसायिक टेनिसपटूला त्याच्या कामाच्या वेळेची आखणी आणि त्याचं शिकवणं यासंबंधी मदत करणाऱ्याची आवश्यकता होती. कसलं काम आहे, याविषयी बिसशी काहीही चर्चा न करता मी तिला विरोध केला होता, नव्हे सरळ 'नाही' म्हणून सांगितलं होतं.

''हे काय डॅडी, तुम्ही असं कसं करू शकलात?'' रडतरडत बिस मला म्हणाली होती. तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या त्या वेळी.

''कसं केलं म्हणजे काय,'' मी तिला फटकारत म्हटलं, ''मला वाटलं, तू सुट्टी फक्त मजा करत घालवावीस असं.''

''पण मला काम करायला आवडतं डॅडी.'' धुमसतच ती म्हणाली होती.

माणूस काम करतो कारण ते टाळता येत नाही म्हणून, अशी माझी धारणा होती त्या काळी. ज्यांना कधीच काम करण्याची गरज नसते, अशा लोकांचं मला फार कौतुक वाटायचं... माझ्या काही धनिक मित्रांच्या आईवडिलांनी त्यांच्यासाठी मोठे विश्वस्तनिधी करून त्यांची जन्मभराची सोय करून ठेवली होती. मला त्यांचा भयंकर हेवा वाटत असे. बिसला काम न करायला लावून मी तिच्यावर उपकारच करत होतो, असं मला वाटत होतं. किती चुकीची विचारसरणी होती माझी!

घराबाहेर जाऊन काम करायला बिसला फार आवडायचं. अगदी बालवयापासून तिला शाळेचंही वेड होतं. ही माझी सगळ्यात मोठी मुलगी असल्यामुळे तिच्यातला हा गुण दुर्मीळ आहे, हे माझ्या लक्षात आलं नव्हतं. शाळेत जाण्याच्या कितीतरी आधीच तिला वाचायला येऊ लागलं होतं, अन् विशेष म्हणजे तिला कुणी वाचायला शिकवलं नसतानाही ती वाचू शकत होती. एकदा मी माझ्या आवडत्या आरामखुर्चीत बसून एक गूढकथा वाचत

होतो, तेव्हा बिस माझ्या मांडीवर चढून बसली आणि डिक फ्रान्सिसच्या गूढकथेतील वाक्यं वाचू लागली. त्या वेळी ती फक्त तीन वर्षांची होती. मी तर अवाकच झालो. ही पोरगी वाचायला कधी आणि कशी शिकली? आपलं आपणच शिकली की काय? मग माझ्या डोक्यात एक कल्पना आली- टीव्हीवरचा *सेसमी स्ट्रीट* हा कार्यक्रम पाहूनपाहून ती वाचायला शिकली होती. पण काही वर्षांनी माझ्या इतर मुलांचा जन्म झाल्यावर माझ्या ध्यानात आलं की *सेसमी स्ट्रीट* पाहून काही बिस वाचायला शिकली नव्हती- जन्मत:च तिला ही देणगी प्राप्त झाली होती. हा गुण नक्कीच माझ्याकडून घेतला नव्हता तिनं!

बिस आणखी एका बाबतीत भाग्यवान होती तिला रूपाची देणगीही मिळालेली होती. ती अगदी लहान होती तेव्हा तिला घेऊन मी न्यूयॉर्कच्या रस्त्यांवरून चालत असलो की काही अतिउत्साही छायाचित्रकार तिचा फोटो काढू देण्यासंबंधी मला विनंती करत असत. माझ्या एका मित्रानं तिला एका चित्रपटात घेतलं होतं, कारण त्याच्या मते या मुलीत गर्दी खेचण्याची क्षमता होती. सोनेरी केसांचं वलय चेहऱ्याभोवती असलेल्या या मुलीचे डोळे निळसर हिरवे होते. पण तिच्यातला सर्वांत मोठा गुण म्हणजे तिची बुद्धिमत्ता आणि कुठलंही काम तडीला नेण्याची वृत्ती. बिस कष्ट करायला कचरायची नाही. उच्च माध्यमिक शाळा आणि कॉलेजनंतर तिनं न्यूयॉर्क विद्यापीठातून चित्रपटविषयक शिक्षणक्रमाची पदवी मिळवली होती. त्यानंतर मार्टिन स्कॉर्सीज नावाच्या 'कर्दनकाळ' दिग्दर्शकाच्या हाताखाली पडेल ते काम करण्याची नोकरीही केली होती. त्यानंतर तिनं हार्वे आणि बॉब वेनस्टेन या द्वयीच्या हाताखाली काम केलं. हे तर आणखीनच मोठं आव्हान होतं. कामाला वाघ असलेल्या बिसवर दोघंही खूश असल्यामुळे त्यांनी तिच्यावर *द क्रायिंग गेम* या चित्रपटाचं निर्मितीप्रचाराचं काम सोपवलं. निर्माताही तिच्या कामावर खूश झाला आणि त्यानं तिला एका चित्रपटाचं दिग्दर्शन करायला सांगितलं. दिग्दर्शक बनणं हे तर तिचं स्वप्नच होतं. स्कॉर्सीज आणि मिरामॅक्समध्ये काम करत असताना तिनं कामातून वेळ काढून बरेच लघुपट बनवले होते. आता तिला एक पूर्ण लांबीचा चित्रपट बनवण्याची संधी मिळाली होती. *गोल्ड इन द स्ट्रीट्स* या चित्रपटाचं चित्रीकरण न्यूयॉर्क आणि आयर्लंडमध्ये करण्यात आलं. यादरम्यान तिच्या असं लक्षात आलं की स्त्रीदिग्दर्शकांसाठी आयर्लंडमध्ये अधिक संधी उपलब्ध आहेत, म्हणून तिनं तिकडे जाण्याचा निर्णय घेतला.

कष्टाळू वृत्ती तिच्या रक्तातच आहे, हे मला उमगलं खरं, पण

त्यापासून मी का नाही काही धडा घेतला? तिच्या वृत्तीतूनच मी श्रमप्रतिष्ठेचं महत्त्व जाणायला हवं होतं, शिकायला हवं होतं मग ती नोकरी गिऱ्हाइकांना कॉफी देण्यासारखी क्षुल्लक का असेना. कुठलंही काम बिस उत्साहानं आणि मनापासून करत असे. खरंच, बिस हा माझ्या दृष्टीनं एक चमत्कारच होता. माझ्यातील अक्षरओळखीच्या वैगुण्यावर तर तिनं मात केलीच होती, शिवाय तिनं एक असा गुण दाखवला होता जो माझ्यात अजिबात नव्हता. माझ्यासाठी काम म्हणजे निव्वळ पाट्या टाकणं होतं; स्वखुशीनं पत्करलेला, आवडीचा उद्योग नव्हता.

बिसबद्दलच्या आठवणी मनात जाग्या झाल्या अन् माझ्या मनाला एक प्रकारची उभारी आली. मी कॉफीशॉपचं दार उघडलं आणि कष्टाचं काम करण्याच्या तयारीनं दुकानाच्या मागील बाजूकडे वळलो.

दुकानातील तिच्या नेहमीच्या जागी क्रिस्टल असेल आणि काउंटरवरच्या कामाऐवजी ती मला एखादं कष्टाचं काम देईल, अशी आशा मला वाटत होती. एक नवीन भागीदार म्हणून मला माझी पात्रता सिद्ध करायची होती, परंतु इतर सहकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष गिऱ्हाइकांना तोंड द्यायला मी अजूनही कचरत होतो. कॅश रजिस्टर हाताळण्याचं काम मी यापूर्वी कधीही केलेलं नव्हतं. त्या विचारानंही माझं मन घाबरत होतं, त्यामुळेच मी बहुतेक वेळा क्रिस्टलच्या ऑफिसच्या अवतीभोवती रेंगाळत असे. तिचं ऑफिस म्हणजे तरी काय तर एक छोटं टेबल, एक खुर्ची आणि एक संगणक, एवढंच. मी तिथे उभा असलो की क्रिस्टल माझ्याकडे वळून बघायची आणि मला विचारायची, ''आज काहीतरी साफसफाईचं काम करायला आवडेल का तुला?''

''अगदी अवश्य.'' मी नेहमी उत्साहानं म्हणत असे. हा प्रकार गेले काही आठवडे चालला होता. साफसफाईचं काम केलं तर मला त्या कॅशरजिस्टरपासून चार हात दूर राहता येईल, मी स्वत:शीच म्हणायचो. एकीकडे गिऱ्हाइकांशी बोलायचं अन् दुसरीकडे त्यांना उरलेले सुटे पैसे द्यायचे, ही दोन्ही कामं आपल्याला जमणार नाहीत, हे मला चांगलं ठाऊक होतं, म्हणूनच मी तिच्या आसपास घुटमळत असे. तिचा विश्वास संपादायचा आणि तिला पटवून द्यायचं की दुकानात माझी गरज आहे, हा माझा त्यामागचा उद्देश होता.

अर्थात या साफसफाईच्या कामाचाही मला आधीचा अनुभव म्हणावा तर काही नव्हता. घरातल्या साफसफाईची कामं माझी पत्नीच सांभाळत असे. ती स्वत: तरी करत असे किंवा ती कामं करणाऱ्या बायकांकडून

स्नानगृहं, स्वयंपाकघर वगैरे साफ करवून घेत असे. जे.डब्ल्यू.टी.मध्ये मी उच्चपदावर काम करत असताना मला माझी कामाची जागा कधीच साफ करावी लागली नाही. हातात प्लास्टिकची मोठी पिशवी, व्हॅक्यूम क्लीनर घेऊन साफसफाईचं काम करणाऱ्या स्त्रिया रात्री उशिरा आमच्या कंपनीत येत असत. मी उशिरापर्यंत काम करून घरी जायला निघालेलो असलो तर त्या माझ्या दृष्टीस पडत असत. मी त्यांच्याशी नेहमीच सभ्यपणे वागत असे आणि त्याचा मला अभिमानही वाटत असे. मात्र या बायका एवढी मोठी जागा इतकी स्वच्छ कशी ठेवतात, त्याबद्दल मी क्वचितच विचार करत असे.

माझ्या पहिल्या साफसफाईच्या दिवशी क्रिस्टल मला म्हणाली होती, 'ह्याला कीटण म्हणतात. आपल्या दुकानात जमिनीवर सगळीकडे लाद्या आहेत. त्यांच्यामध्ये जमलेलं कीटण काढायला बरेच कष्ट घ्यावे लागतात. या कीटणाच्या समस्येला मी एक वेगळं नाव देईन. मी त्याला 'कीटणाची संधी' असं म्हणेन.'

माझ्यापुरतं बोलायचं झालं तर ती एक संधीच होती.

कीटण काढण्यासाठी जो वेगळा ब्रश वापरला जातो तो क्रिस्टलनं मला दिला. मग तिनं एका बादलीत गरम पाणी घेऊन त्यात साबणाचं द्रावण कसं घालायचं, ते दाखवलं. आधी केर काढायचा, मग फरशी पुसायची आणि नंतर ब्रशनं कीटण खोदून काढायचं आणि त्यानंतर पुन्हा एकदा पुसायचं, असा सगळा मामला होता. काही फुटांचा भाग स्वच्छ करायलाही पुष्कळ वेळ लागायचा. सबंध दुकान साफ करायला तर कित्येक तास लागले असते. एक प्रकारच्या झपाटलेपणानं मी माझं स्वच्छता अभियान सुरू केलं.

केव्हातरी क्रिस्टल तिथे आली. माझा झपाटा बघून ती हसायलाच लागली.

''माइक, इतक्या उत्साहानं हे काम करताना मी कुणालाच पाहिलं नाही.''

''मला मनापासून आवडतंय.'' मी म्हटलं, अन् ते अगदी खरं होतं. आपलं काम खरोखरच छान होतंय, हे माझ्या डोळ्यांना दिसत होतं. इतर भागीदारांनी सुद्धा माझ्या कामाची पावती दिली, अर्थात फार न बोलता. एक गोरा अमेरिकन म्हातारा पुरुष कीटण काढण्याचं काम इतक्या उत्साहानं करेल, याची त्यांना अपेक्षाच नसावी.

मधेच एकदा केस्टर आला. त्याच्या नेहमीच्या पद्धतीनं हसून तो

म्हणाला, ''बाथरूम साफ करताना नीट लक्ष दे हं!''

अगदी त्याच दिवशी क्रिस्टल मला म्हणाली, ''माइक, बाथरूम अगदी स्वच्छ कशी धुवायची, ते मी तुला दाखवणार आहे. काही गॅरेजमध्ये तू अशी पाटी पाहिली असशील ना, आम्ही तुमच्या गाडीची अथपासून इतिपर्यंत साफसफाई करतो! तसंच काम आपण आपल्या बाथरूममध्ये करायचं. एकदा आपण ते काम दोघं मिळून करू. त्यानंतर मग बाथरूम नेहमी अगदी चकाचक आहे, हे बघण्याचं काम तुझं.''

मग तोही अध्याय सुरू झाला. क्रिस्टलनं मला हातात मोजे चढवायला लावले आणि मग एक अतिशय परिणामकारक असं द्रावण दिलं. अस्मादिक खाली बसले अन् कमोडच्या आजूबाजूला जमलेली घाण घासूनघासून काढू लागले. काही वेळानं माझं मलाच आश्चर्य वाटलं. काही वर्षांपूर्वी जे काम करणं मला माझ्या योग्यतेचं वाटलं नसतं, ज्याविषयीचा विचारही मला अपमानास्पद वाटला असता, ते काम करायला मला यत्किंचितही किळस वाटत नव्हती. यामागचं कारण एकच होतं-क्रिस्टलचा त्याबाबतचा दृष्टिकोन अत्यंत सकारात्मक होता. बाथरून चकचकीत करणं, हे तिला एक आव्हान वाटत होतं. तिच्या मते हे काम करण्यासाठी घ्यायचे कष्ट योग्यच होते तर मग तिच्या कामाबाबतच्या किंवा जगाबाबतच्या दृष्टिकोनाला आक्षेप घेणारा मी कोण होतो? आपलं अस्तित्व टिकवून धरण्यासंबंधीची प्राणिमात्रांमधली जी सगळ्यात मूलभूत प्रेरणा असते ती माझ्यातही होतीच. ती उफाळून वर आली, क्रिस्टलला हवं असलेलं काम करण्यात मी यशस्वी ठरलो तर मला माझी नोकरी टिकवून ठेवता येईल. कॅश रजिस्टरनं माझ्या मार्गात अडचणी उभ्या केल्या, किंवा इतर काही आव्हानं उभी ठाकली तरी बेहेत्तर! या एकाच विचारानं प्रेरित झाल्यामुळे बाथरूम स्वच्छ करण्याचं काम मी अगदी जीव ओतून केलं.

लवकरच बाथरूम लखलखू लागली.

क्रिस्टलच्या चेहऱ्यावर हसू झळकलं.

''तुझ्याइतकं स्वच्छ काम मी दुसऱ्या कुणाचंच पाहिलं नाही, माइक. ही गोष्ट मी तुला सांगायलाच हवी.''

❖

२री आवृत्ती

२६/११
मुंबईवरील हल्ला

संपादन
हरिंदर बावेजा
अनुवाद
प्रा. मुकुंद नातू

किंमत : २९५/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

कराचीहून सागर मार्गाने आलेले दहशतवादी, साठ तास देशाच्या आर्थिक राजधानीत रक्तरंजित थैमान घालतात; त्याची ही प्रत्यक्षदर्शी कहाणी. परदेशी पर्यटक, श्रीमंत मंडळी यांची गर्दी असलेल्या कुलाब्यातील लिओपोल्ड कॅफे, ते हॉटेल ताज आणि हॉटेल ट्रायडेंट–ओबेरॉय पर्यंतच्या मुक्त संचारात नरिमन हाऊस आणि सीएसटी येथेही त्यांनी बेबंद नरसंहार केला. हे सर्व वाचताना दु:ख आणि वैफल्याने मन विषण्ण होते.

परंतु या भीतिदायक काळातही सामान्य मुंबईकरांनी दाखवलेले धैर्य आणि विविध सुरक्षा दलांतील अधिकारी आणि जवानांनी दाखवलेली कर्तव्यनिष्ठा यांनी मन उचंबळून येते. 'ये है बम्बई मेरी जान...' या जुन्या गाण्याची आठवण येते. धडाडीचे कार्यक्षम सर्वोच्च पोलिस अधिकारी 'ज्युलिओ रिबेरो' यांनी देशाच्या ढिसाळ सुरक्षाव्यवस्थेची केलेली चिरफाड काळजी निर्माण करते. अर्थात ते यावर उपायही सुचवतात. पण ते अंमलात कसे येणार

हा वेगळा प्रश्न आहे.

....असे हल्ले भारताला आणखी काही काळ तरी सोसावे लागणार आहेत, याची कारणमीमांसा ज्येष्ठ पत्रकार हरिंदर बावेजा यांनी केली आहे.

पुस्तक परिचय

डेमोक्रसीज इलेव्हन

भारतीय क्रिकेटची महान गाथा

'२०१४ : द इलेक्शन दॅट चेंज्ड इंडिया' हे त्यांचं अत्यंत गाजलेलं आणि लोकप्रिय पुस्तक. अनेक भारतीय भाषांत त्या पुस्तकाचा अनुवाद झाला आणि तोही खूप गाजला. सध्या ते इंडिया टुडे ग्रूपचे सल्लागार संपादक आणि प्रमुख न्यूज अँकर आहेत. वयाच्या २३ व्या वर्षी त्यांनी पत्रकारितेच्या प्रवासाला प्रारंभ केला आणि आजवर म्हणजे गेली ३० वर्षे ते पत्रकारितेच्या प्रवासात आपले योगदान देत आहेत. आयबीएन १८ नेटवर्क या वृत्तवाहिनी समूहाचेही ते संस्थापक. या समूहांतर्गत सीएनएन आयबीएन, आयबीएन ७ आणि आयबीएन लोकमत या वृत्तवाहिन्यांत त्यांनी पत्रकारिता केली. त्यापूर्वी एनडीटीव्ही २४ बाय ७ आणि एनडीटीव्ही इंडिया या वाहिन्यांचेही ते व्यवस्थापकीय संपादक होते. वृत्तवाहिन्यांचा काळ सुरू होण्यापूर्वी त्यांनी टाईम्स ऑफ इंडियाच्या मुंबई आवृत्तीत सीटी एडिटर म्हणूनही पत्रकारिता केली. पत्रकारितेच्या या प्रवासापलीकडची एक ओळख म्हणजे क्रिकेटपटू दिलीप सरदेसाई यांचे ते सुपुत्र. वडिलांचा क्रिकेटचा वारसा त्यांनाही लाभला. ऑक्स्फर्डला शिकत असताना त्यांनी तिथं फर्स्ट क्लास क्रिकेटही खेळलं. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठाच्या संयुक्त संघात ते पाकिस्तान संघाविरुद्ध एक सराव सामनाही खेळले होते. त्या वेळी पाकिस्तान संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर होता आणि पाहुण्या संघाला सराव म्हणून खेळवण्यात आलेल्या सामन्यात इंग्लिश संघात सरदेसाईही खेळले होते. ऑक्स्फर्ड विद्यापीठातला अत्यंत मानाचा, प्रतिष्ठेचा 'ऑक्स्फर्ड ब्लू' हा किताबही त्यांना लाभला.

त्यानंतर मात्र त्यांनी क्रिकेटचं मैदान सोडलं आणि आपली स्वतंत्र वाट चालत पत्रकारितेच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केली. पत्रकारितेतील अत्यंत प्रतिष्ठेच्या रामनाथ गोएंका पुरस्कारासह ५० हून अधिक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने त्यांचा सन्मान केला आहे.

राजदीप सरदेसाई

अनुवाद

मेघना ढोके

क्रिकेट.

भारताला एका सूत्रात बांधण्याची किमया क्रिकेटइतकी अन्य खेळांना साधलेली नाही.

भारतीय क्रिकेट संघात खेड्यापाड्यातले खेळाडू खेळतात, तसे महानगरांतलेही. इथं रांचीतल्या एका साध्या पंप ऑपरेटरचा मुलगा अशक्य वाटणारं स्वप्न पाहण्याची हिंमत करतो. आणि मुंबईतला एक कोवळा मुलगा, बालचमत्कारच, तो हैदराबादच्या गच्च गर्दीच्या गल्लीत वाढलेल्या मुस्लीम तरुणासह खांद्याला खांदा लावून खेळतो.

गुणवत्तेला प्राधान्य आणि समान संधी हे आपलं घटनात्मक तत्व क्रिकेटनं प्रत्यक्ष जगून दाखवलं. भारतात जे जे सर्वोत्तम, उदात्त आणि महन्मंगलत्या साऱ्यांचं प्रतिबिंब क्रिकेटमध्ये पडलेलं दिसतं.

-हे पुस्तक म्हणजे भारतीय क्रिकेटची तीच महान गाथा.

सुप्रसिद्ध पत्रकार आणि ख्यातनाम लेखक राजदीप सरदेसाई, क्रिकेटचा हात धरत, अकरा खेळाडूंचं आयुष्य उलगडत, बदलत्या भारताचा एक थरारक पट मांडत आहेत.

१९६०च्या दशकात खेळणारे दिलीप सरदेसाई आणि नवाब पतौडी यांच्यापासून या प्रवासाला प्रारंभ होतो आणि काळाचं एकेक पान उलटत आपण वर्तमानात महेंद्र सिंग धोनी आणि विराट कोहलीपर्यंत येऊन पोहोचतो.

भारतीय क्रिकेट आणि भारतीय समाज कसा बदलत गेला, त्याचा पैस आणि पट उलगडणारं हे पुस्तक एका उत्क्रांतीचीच गोष्ट सांगतंय.

('डेमोक्रसीज इलेव्हन' पुस्तकातून...)

राहुल द्रविड

भारतीय क्रिकेटचा कॉन्शस-कीपर

कर्नाटक क्रिकेटचा हा सुवर्णकाळच होता. त्याच सुवर्णकाळात कर्नाटक क्रिकेटने एकाच दशकात तीनदा रणजी करंडक जिंकला. १९९८-९९ च्या मोसमात तर भारतीय संघात खेळणाऱ्या खेळाडूंत आठ खेळाडू कर्नाटकचे होते. कितीतरी वर्षे मुंबई क्रिकेटच्या अजस्र सावलीत कर्नाटक क्रिकेट दडपलं गेलं होतं. आता ती सावलीच झुगारून देत कर्नाटकने भारतीय क्रिकेटमध्ये आपली सत्ता आणि गुणवत्ता गाजवायला सुरुवात केली. कुंबळे म्हणतो, ''द्रविड वॉज की फॅक्टर! द्रविड असा बॅट्समन होता ज्यानं कर्नाटकची बॅटिंग बुलंद केली. आमच्याकडे उत्तम गुणी बॉलर्सचा ताफा होता, पण प्रतिस्पर्ध्याला रोखता येईल इतपत धावा आम्हाला करून द्यायचं काम द्रविड करू लागला, आणि इथंच चित्र पालटलं.''

सत्ताकेंद्र असं फक्त क्रिकेटमध्येच बदललं नाही. १९९०च्या दशकात ते मुंबईकडून बंगळुरूकडेही सरकलं. मुंबई म्हणजे देशाची अनभिषिक्त आर्थिक राजधानी आणि बंगळुरू म्हणजे उद्यानांचं शांत शहर, पेन्शनरांचं गाव असं लेबल अनेक वर्षे होतं. पण पेन्शनरांच्या या गावानं अशी उभारी घेतली की ते भारतीय तारुण्याच्या जिद्दीचा नवचेहरा बनलं. इन्फोसिस आणि विप्रो या दोन महाकाय कंपन्यांनी बंगळुरूला भारताची सिलिकॉन व्हॅली बनवत थेट मुंबईला आव्हान दिलं. मुंबईच्या शेअर बाजाराची गणितंच उलथून टाकत प्रस्थापितांना जोरदार झटके दिले. कर्नाटकच्या क्रिकेटपटूंनी जशी मैदानात मुंबईची मक्तेदारी मोडीत काढली तशीच बंगळुरूच्या आयटी

कंपन्यांनी मुंबईच्या आर्थिक सत्तेला हादरवून टाकलं. क्रिकेट आणि नवउद्योजकता यांनी पिढ्यान्‌पिढ्यांची भौगोलिक दरी सांधली. आणि भारताची स्टार्ट अप राजधानी म्हणून बंगळुरूनं नवीन रूप धारण केलं.

अर्थात हे सारं अवतीभोवती घडत असलं तरी द्रविडच्या डोक्यावर भारतीय संघाची कॅप सहजासहजी आली नाही. त्याला झगडावं लागलं, स्वत:ला सिद्ध करावं लागलं. फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये ५० पेक्षा जास्त सामने आणि १५ शतकं त्यानं ठोकली. ५ वर्षे लागली या प्रथम दर्जाच्याच प्रवासाला. आणि मग एक दिवस भारतीय संघाच्या टोपीनं त्याच्या मस्तकावर विराजमान व्हायचं ठरवलं. ती टोपी डोईवर येईपर्यंतचा काळ मात्र अखंड परीक्षेचा होता. त्याच काळात तो चेन्नईलाही गेला. नव्वदच्या दशकाच्या मध्यातली ही गोष्ट. इंडिया सिमेन्टसाठी तो तिथं खेळत असे. पाच अन्य क्रिकेटपटूंसह भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहायचा. आपल्याला जास्तीत जास्त टर्फ विकेटवर खेळता यावं, धावा करण्याचा अनुभव वाढावा, आपला खेळ सुधारावा या एकमेव इच्छेनं तो झपाटला होता. इच्छा तर भारतीय संघात स्थान मिळवण्याचीच होती, पण दुर्दैवानं भारतीय संघाची दारं आपल्यासाठी नाहीच उघडली तर हाताशी काहीतरी हवं असा बॅकअप प्लॅनही त्यानं तयार ठेवला. त्यातून वाट काढायची म्हणून द्रविडने वर्षभराच्या कॉरस्पॉन्डन्स एमबीए कोर्सलाही प्रवेश घेतला होता. अभ्यास सुरू केला. सुदैवानं त्याची मेहनत फळाला आली. स्वत:चा खेळ सतत उंचावत नेण्याची त्याची जिद्द च खरंतर फळली आणि भारतीय संघात खेळणं हे त्याचं विधिलिखित प्रत्यक्षात उतरलं. या साऱ्या प्रवासाकडे पाहण्याची द्रविडी दृष्टीही मोठी सकारात्मक आहे. तो म्हणतो, ''वयाच्या तेविसाव्या वर्षी माझी भारतीय संघात निवड झाली ते बरंच झालं म्हणायचं. फारच कोवळ्या वयात, विशीपूर्वीच निवड झाली नाही ही इष्टापत्तीच होती असं आता मला वाटतं. भारतीय संघात निवड होण्यापूर्वी देशांतर्गत फर्स्ट क्लास क्रिकेटच्या रगाड्यात मी जमेल तेवढं खेळून घेतलं. त्यानं माझा खेळ तर सुधारलाच, पण मानसिकदृष्ट्याही मी जास्त कणखर झालो. मॅच्युअर झालो. निवड झाली तेव्हा भारतीय संघात खेळण्यासाठी 'तयार' होतो...''

१९९६च्या इंग्लंड दौऱ्यासाठी द्रविडची निवड झाली आणि त्याचा उमेदवारीचा काळ संपला. उमेदवारी संपली पण परीक्षा संपली नव्हती. उलट अनोळखी वाटांवरच्या अवघड परीक्षा त्याची वाटच पाहत होत्या. भारतीय

संघात निवड झाली तेव्हा द्रविडला तरी कुठं त्या परीक्षांचा आणि भविष्याचा अंदाज होता. बंगळुरूचा लाजराबुजरा, स्कॉलर मुलगा आत्यंतिक कठीण परीक्षांना सामोरं जायलाच नाही, खरंतर त्या उत्तीर्ण होऊन दाखवायलाच निघाला होता...

~

सगळ्याच क्रिकेटवेड्यांना क्रिकेटपंढरी लॉर्ड्सच्या दर्शनाची आस असते. लॉर्ड्सवर जाणं, तिथं फोटो काढणं हा क्रिकेटप्रेमाचा अद्‌भुत सोहळाच असतो. द्रविडचे क्रिकेटप्रेमी बाबाही कधी काळी लॉर्ड्सवर गेले होते. तिथं पॅव्हेलियनसमोर उभं राहून त्यांनी हौशीनं स्वत:चा फोटो काढून घेतला होता. त्याच लॉर्ड्सवर भारतीय संघाची कॅप डोक्यावर घेऊन त्यांचा मुलगा कसोटी क्रिकेट खेळायला उतरणार होता. पहिलावहिला आंतरराष्ट्रीय सामना खेळणार होता. लॉर्ड्सवर पोहोचताना नवख्या द्रविडच्या मनातही भावनांच्या अशाच लाटा उसळत होत्या. त्याला आठवत होतं, याच मैदानात भारतानं १९८३ साली पहिल्यांदा विश्वचषक जिंकला. हेच ऐतिहासिक मैदान जिथं आजवर अनेक खेळाडूंनी इतिहास घडवला. हेच ते मैदान जिथं तो पहिल्यांदा भारतासाठी खेळणार होता. द्रविड म्हणतो, ''लॉर्ड्सवर जाताना मनात हे सारं होतंच. ज्या दारातून मी या मैदानात जात होतो, त्याच दारातून कधीकाळी गावसकर आणि ब्रॅडमन आत गेले असणार. याच स्टेडिअमनं, याच मैदानानं, याच वातावरणात इतिहास घडताना पाहिला असणार.. आपण खरंच इथवर पोहोचलोय हे स्वप्नवत्‌च वाटत होतं...''

द्रविड म्हणजे क्रिकेट इतिहासाचा किडा. त्याचं कसोटी क्रिकेट पदार्पण लॉर्ड्सशिवाय दुसरं कुठंही होणं काही बरं दिसलं नसतं. लॉर्ड्सवरच कसोटी क्रिकेट पदार्पण त्याच्या नशिबात होतंच बहुधा. ध्यानीमधी नसताना अचानक त्याचं नशीब फळफळलं. कसोटी सामन्याच्या आदल्याच दिवशी संजय मांजरेकरच्या घोट्याला दुखापत झाली आणि त्यानं सामन्यातून माघार घेतली. अचानकच द्रविडला संघात जागा निर्माण झाली. द्रविड सांगतो, ''राखीव खेळाडू म्हणूनच माझी संघात निवड झाली होती. या मालिकेत आपल्याला कदाचित एकही सामना खेळायला मिळणार नाही, अशी मनाची तयारी करूनच मी दौऱ्यावर गेलो होतो. संजय जायबंदी झाला नसता तर संधी मिळणंच शक्य नव्हतं. मात्र माझ्या नशिबात ती संधी होती, नशीब म्हणतात ते हेच...''

द्रविड पहिल्यांदा लॉर्ड्सवर उतरला. पहिलाच सामना, पहिलीच संधी आणि संघाची अवस्था मात्र भीषण होती. २०२ वर ५ आउट अशी गत. द्रविड संघातला शेवटचा अधिकृत फलंदाज. उसळत्या खेळपट्टीवर पत्त्याच्या बंगल्यासारखी फलंदाजी कोसळते म्हणून भारतीय संघानं एक जास्तीचा बॅट्समन या मॅचमध्ये खेळवायचं ठरवलं होतं. पण नावाजलेले पहिले ५ फलंदाज स्वस्तात तंबूत परतले. इंग्लंडने दिलेलं टार्गेट गाठायचं तरी भारतीय संघ किमान १०० धावांनी पिछाडीवर होता. अशा भयानक अवस्थेत हा २३ वर्षांचा मुलगा सातव्या क्रमांकावर बॅटिंगला आला होता. भारतीय फलंदाजीचं शेपूटच तग धरून होतं म्हणायचं. त्यात द्रविड एकटाच या सामन्यात पदार्पण करत नव्हता, दुसऱ्या टोकाला अजून एक अननुभवी मुलगा होता. सौरव गांगुली त्याचं नाव. सौरव भारतीय संघात द्रविडला फक्त सहा महिने सीनिअर. त्याचीही पहिलीच मॅच. मैदानात उतरल्या क्षणापासून त्याला सूर सापडला होता. शतकाच्या दिशेनं त्याची वाटचाल सुरू झाली होती. सौरवचा निभाव लागला तसा आपलाही लागेल इतपत बळ द्रविडच्या गाठीशी त्या क्षणी होतं. अन्डर-१९ खेळायचे त्या काळापासून द्रविड आणि सौरव एकमेकांना ओळखत होते. इंडिया अ संघातही ते एकत्र खेळत, तिथंही त्यांनी काही यशस्वी भागीदाऱ्या केल्या होत्या. द्रविड म्हणतो, ''मी बॅटिंगला उतरलो, जोडीला सौरव. त्याचीही पहिलीच मॅच. तो उत्तम खेळत होता. तो सोबत असल्यानं माझ्याही मनावरचा ताण निवळला. खेळणं सोपं झालं, धीर चेपला!''

पुढचे काही तास या दोन नवख्या मुलांनी कमालीचा अप्रतिम खेळ केला. सौरवने तर शतक झळकावत १३४ धावांची उत्तुंग कामगिरी पदार्पणातच केली. द्रविड आणि त्यानं मिळून ९४ धावांची भागीदारी केली. भारताचा डाव या दोन नवख्या, पदार्पणकरू मुलांनीच सावरला. द्रविडचं शतक मात्र हुकलंच. ९५वर खेळत असताना तो विकेटच्या मागे विकेटकीपरच्या हातात झेल देत बाद झाला. पहिल्यावहिल्या सामन्यात लॉर्ड्सवर शतक समोर दिसत असताना हा मुलगा आउट झाला खरा, पण त्यानं अम्पायरकडे पाहिलंही नाही, अम्पायरने आउट दिलंय की नाही याची खात्रीही करून न घेता तो सरळ मैदान सोडून चालू लागला. आउट झालं तर निघायचं हे त्याचं तत्त्व, ते जिवापाड कसं जपतात हे या मुलानं पहिल्याच आंतरराष्ट्रीय सामन्यात जगाला दाखवलं. इथंच त्याच्या मूल्यव्यवस्थेचंही जगाला दर्शन झालं.

लॉर्ड्सवर पदार्पणातच कसोटी शतक झळकवण्याची संधी केवळ ५ धावांनी हुकल्याची चुटपुट किती जीवघेणी असेल. द्रविड म्हणतो, ''शतकाच्या इतकं जवळ येऊन आउट झालो, निराश तर वाटलंच. पण आपण पहिलं पाऊल तर उत्तम टाकलं, त्यात काही उणं राहिलं नाही, कसर केली नाही ही भावनाही माझ्यासाठी खूप मोठी होती!'' तो म्हणतोय ते खरंय. पदार्पणाच्या कसोटीत, तेही संघ संकटात असताना केलेल्या ९५ धावांचं मोल काय करणार, कुणासाठीही कारकिर्दीची ही अप्रतिमच सुरुवात ठरावी. त्यानं त्या दिवशी केलेला खेळही टिपिकल द्रविडचा ट्रेडमार्क गेम होता. उत्तम डिफेन्स. अत्यंत बचावात्मक खेळत त्यानं ऑन साइडला अप्रतिम फटके मारले. गोलंदाजांच्या संयमाची परीक्षाच पाहिली आणि स्वत:ही संयम आणि बचावात्मक खेळीचा पाया घातला. त्या वेळी भारतीय संघाचे प्रशिक्षक असलेले संदीप पाटील सांगतात, ''त्या दिवशी द्रविडचा खेळ पाहताना वाटलं की हा मुलगा कसोटी क्रिकेट खेळण्यासाठीच जन्माला आला आहे. अत्यंत शांत, संयमी खेळाचंच त्यानं प्रदर्शन केलं!''

लॉर्ड्सवरचा तो दिवस, त्यानंतर द्रविडने कधीही मागे वळून पाहिलंच नाही. इंग्लंडमध्ये त्याचं पहिलं शतक हुकलं, पण त्या पहिल्यावहिल्या डावात तो इंग्लंडच्या आणि इंग्लंड त्याच्या प्रेमात पडलं हे नक्की. पहिल्या मॅचमध्ये शतकानं लपाछपी खेळत दगा केला, पण त्यानंतर पुढच्या १५ वर्षांत या पहिल्या प्रेमाची जादू मात्र त्याच्यावर चढली. इंग्लिश वातावरणातला रोमान्सच रंगला. द्रविडने इंग्लंडमध्ये १३ कसोटी सामने खेळत ६ शतकं आणि ४ अर्धशतकं झळकावली. आणि या साऱ्या प्रवासात ७०च्या आसपास त्याची सरासरी होती. क्रिकेटच्या पंढरीत कुणाही भारतीय खेळाडूनं असा अप्रतिम खेळ करणं हा खराखुरा त्या खेळाबरोबरचा रोमान्सच म्हणायला हवा.

गावसकरने वेस्ट इंडिजमध्ये खेळत जी काय कामगिरी केली, तिनं त्याच्या कारकिर्दीची पायाभरणी केली. तेच काम 'इंग्लिश समर'ने द्रविडसाठी केलं. इंग्लंडच्या थंड हवामानात उसळत्या, हिरव्या खेळपट्ट्यांवर द्रविडने जो अप्रतिम खेळ केला त्यानं त्याचं संघातलं स्थान पक्कं होत गेलं. तंत्रावरची हुकमत, बॅकफुटची नजाकत, पुढं येत जमिनीला समांतर फटके मारणं या साऱ्याच्या जोरावरच इंग्लंडमधल्या सीम आणि स्विंग बॉलिंगला तो पुरून उरला. नुसता पुरून उरला नाही तर प्रसंगी ती तोडून काढत त्यानं उत्कृष्ट

खेळ केला. चेंडू पुरेसा टप्प्यात आल्यावर सावकाश तो चेंडू खेळायचा. आपला 'ऑफ स्टम्प' कुठं आहे हे त्याला पुरतं माहीत होतं आणि चुकून कधी ऑफ स्टम्प बाहेरच्या चेंडूला हात लावत तो बाद झाला नाही की त्यानं कुणाच्या हाती झेल दिला नाही.

इंग्लंडच्या खेळपट्ट्यांवर जिथं भलेभले लडखडतात तिथं द्रविडच्या खेळात बहार आली. ही जादू नेमकी कशाची याची उकल करताना द्रविड सांगतो, ''खरं सांगतो, अगदी सुरुवातीलाच बहुतेक मी इंग्लंडच्या प्रेमात पडलो, म्हणून हे जमलं असेल!'' इंग्लंडच्या प्रेमात तो होताच हे उघड आहे, कारण इंग्लंडमधली जीवनशैली त्याच्या स्वभावाला साजेशी आहे. शांत, संथ आणि आपापलं खासगीपण जगणारं तिथलं जगणं द्रविडच्या स्वभावाला मानवणारं होतं. शांतपणे खेळ पाहणं, तो अनुभव स्वत:त मुरू देणं. मोठाल्या बागेत निवांत चक्कर मारायला जाणं आणि लंडनच्या कॉस्मोपॉलिटन संस्कृतीतलं वैविध्य अनुभवणं हे सारं द्रविडला पोषक-पूरक होतं. २००० साली इंग्लिश काउन्टी केन्ट बरोबरही त्यानं करार केला. त्यासाठी खेळला. पुढे तीन वर्षांनी आपलं हनिमून इंग्लंडमध्ये साजरं केलं आणि स्कॉटलंडमध्ये क्रिकेटही खेळला.

केन्ट काउन्टी क्लबमध्ये खेळणारा त्याचा सहकारी खेळाडू इड स्मिथ. द्रविडच्या निवृत्तीनंतर लिहिलेल्या लेखात तो म्हणतो, ''कॅन्टनबरीच्या सेन्ट लॉरेन्स ग्राउन्डच्या ड्रेसिंग रूममध्ये राहुल द्रविड पहिल्यांदा आला तो क्षण मला अजून जसाच्या तसा आठवतोय. स्प्रिंग सुरू झाला होता, ऊन होतं पण हवेत गारठा होताच. द्रविड आला तशी त्याच्यासोबत एक वेगळी ऊब आली. त्याला पाहताक्षणीच कळलं की हा माणूस वेगळाच आहे. त्याच्या वागण्यात ना रुबाब होता, ना 'माहितीये ना मी कोण आहे' छापाची अकड होती, ना स्पर्धेत टिकण्यासाठी दाखवावा लागतो असा काही 'मॅचो' तोरा होता. तो आला, स्वत: जाऊन ड्रेसिंग रूममधल्या प्रत्येकाला भेटला. सीनिअर-ज्युनिअर असा काही भेद न करता तो कर्णधारापासून ज्युनिअर खेळाडूपर्यंत तिथल्या प्रत्येकाशी एकसमान आदरानं बोलला. परदेशी खेळायला येणारे खेळाडू 'तयारी'नं येतात. सगळ्यांशी 'प्रोफेशनल' गरज म्हणून ठरवून चांगलं वागतात तसं 'ठरवलेलं' किंवा 'घोटलेलं' त्याच्या देहबोलीत काहीही नव्हतं. अत्यंत साधेपणानं, सहज आपण आपल्या माणसांशी मायेनं बोलतो तसं तो प्रत्येकाशी बोलला. वागला. त्या दिवशी आम्हाला भेटला एक सरळ

साधा माणूस, एक जन्टलमन. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू भेटला तो नंतर, लक्षात राहिला तो द्रविडमधला साधा माणूस!''

त्याची सभ्यता हीच त्याची ओळख ठरली. काळाच्या कसोटीवरही खरी उतरली. स्मिथ म्हणतो तसं त्याचं शालीन आणि संयत वागणं हे इतकं उपजत होतं की ते त्याच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग होतं. त्याचंच एक रूप दक्षिण आफ्रिकेतल्या जोहान्सबर्गमधल्या वॉन्डरर्स स्टेडिअमवरही दिसलं. आंतरराष्ट्रीय क्रिकेट पदार्पणात शतक हुकल्यानंतर त्यानं आपलं पहिलंवहिलं कसोटी शतक याच मैदानात झळकावलं. त्याही सामन्यात भारतीय संघाची अवस्था दारुण होती. द्रविडने त्याच्या संयत शैलीनं अत्यंत बिकट परिस्थितीत शतक ठोकून भारताची शान राखली. त्याचा कणखरपणा आणि अचल मानसिक दृढता ही त्याची ताकद कायमच होती. पण ती किती असावी याची साक्ष आजही दक्षिण आफ्रिकेतला तो एकदिवसीय सामना देतो. १९९७ चा दक्षिण आफ्रिका दौरा. एका सामन्यात त्यानं ॲलन डोनाल्डच्या डोक्यावरून एक उत्तुंग षटकार ठोकला. तो षटकार इतका उत्तुंग होता की सारं स्टेडिअमच काय सारं क्रिकेट जग अवाक् झालं. डोनाल्ड म्हणजे त्या काळचा जगातील सर्वांत वेगवान गोलंदाज. घरच्या म्हणजे दक्षिण आफ्रिकेच्या उसळत्या खेळपट्ट्यांवर त्याच्या चेंडूला असं भिरकावणं हे द्रविडच्या कणखरपणाचंच एक प्रतीक होतं. तो नुसता षटकार नव्हता तर साहसाचा एक अचाट आविष्कार होता. ज्या खेळाडूकडे फटकेच नाहीत, जो बचावात्मकच खेळतो असं जग म्हणत होतं त्याच खेळाडूनं अत्यंत अवघड परिस्थितीत जगातल्या सर्वांत वेगवान बॉलरला त्याच्याच डोक्यावरून उचलून मारलं होतं. डोनाल्ड खवळला, त्यानं संतापून एक कचकचीत शिवी हाणली. द्रविड मात्र नेहमीसारखाच शांत होता, जणू काही घडलंच नाही. पण 'घडलं' होतंच, त्या क्षणी जगाला कळून चुकलं होतं की आपण एका नव्या आणि खास, अनोख्या क्रिकेटपटूचा उदय पाहतो आहोत. तो उदयच होता एका वेगळ्या द्रविडचा.

❖

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

TBC 'क्लासिक'साठी खास सवलत!

२री आवृत्ती

झॅप्ड

कॅरोल हिगिन्स क्लार्क

अनुवाद

जयंत गुणे



किंमत : १६०/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

लोकप्रिय अमेरिकन लेखिका कॅरोल हिगिन्स क्लार्क हिच्या रेगन रैली मालिकेतील 'झॅप्ड' ही एक उत्कंठावर्धक रहस्यकथा. लॉरेन लिली ही हॉलीवूडमध्ये पदार्पण करू पाहणारी एक नटी. न्यूयॉर्कच्या जे.एफ.के विमानतळावरून टॅक्सीतून मॅनहॅटनमधल्या तिच्या घरी परत येत असते. वाटेतच तिचा धनाढ्य नवरा फोन करून घटस्फोटाची नोटीस देत असल्याचे तिला सांगतो. तेवढ्यात न्यूयॉर्क शहराचा वीज पुरवठा खंडीत होतो आणि संपूर्ण शहर काळोखात बुडून जाते. या काळोखात अनेक गोष्टी होत असतात. एका छोट्या जागेत 'स्टँड अप कॉमेडीचा शो' बघण्यासाठी वीकएन्डच्या निमित्ताने गर्दी झालेली असते.

दोन व्यक्ती लॉरेनच्या घराचे कुलूप तोडण्याच्या खटपटीत असतात. एका निष्पाप तरुणाला आपल्या जाळ्यात फसवून जन्माची अद्दल घडवण्याच्या उद्देशाने एक तरुणी त्याच्या मागे हात धुवून लागलेली असते. सगळी तरुणाई नाक्यावरच्या बारमध्ये जमा होते. घरात बसून अंधारात दुसरे काहीच करण्यासारखे नसल्याने लोक चौकाचौकात जमून 'बार्बेक्यू पार्टी' करत धमाल करत असतात.

ब्लॅकआउटच्या रात्री वरवर वेगवेगळ्या वाटणाऱ्या या घटनांची सांगड घालत लेखिकेने मोठ्या कौशल्याने एका उत्कंठावर्धक कथानकाची गुंफण केली आहे. कथानक न्यूयॉर्कच्या मॅनहॅटन या भागात घडते. जेथे दिवे दिवसासुद्धा चालू असतात त्या मॅनहॅटनवर आता अंधाराचे साम्राज्य पसरलेले असते. रात्र सरत जाते तसा गुंता सुटत जातो आणि हडसन नदीवर सूर्याचे प्रथम किरण पडता-पडता सर्व काही आलबेल होते आणि वाचक सुटकेचा नि:श्वास टाकतो.

पुस्तक परिचय

तरंग

विविध आठवणी व अनुभवांवर आधारित वैशिष्ट्यपूर्ण कथा

नाव धनंजय श्रीनिवास बेन्नुरवार, परंतु सारे लेखन कल्याणीरमण या टोपणनावानेच झाले आहे. जन्मगाव नागपूर. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईमध्येच झाले. चाळीस वर्षांच्या सेवेनंतर मुंबई उच्च न्यायालयातून राजपत्रित अधिकारी म्हणून निवृत्त. बालवयापासूनच अनेक सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी संपर्क. पुढे त्याच संस्थांमधून कार्य. ठाणे जिल्ह्यामधील वनवासी क्षेत्रातसुद्धा काही वर्षे काम. सध्या संस्कृतिसंवर्धन प्रतिष्ठान या शालेय विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या संस्थेत कार्यरत. सदर संस्थेसाठी पुस्तकांचे लेखन. त्या पुस्तकांच्या हिंदी, मराठी, गुजराथी आणि इंग्रजी भाषांमध्ये अनेक आवृत्त्या निघाल्या. आजवर सुमारे सात लाख प्रतींचे विद्यार्थ्यांमध्ये सशुल्क वाटप झाले आहे. श्रीसंत माधवराव महाराज संस्थान पाटणबोरी, जिल्हा यवतमाळ या परंपरागत व पीठासीन संतांच्या संक्षिप्त चरित्र ग्रंथास सांप्रदायात आधार व संदर्भग्रंथ म्हणून मान्यता मिळाली. अनेक कथा आणि वैचारिक लेखांस वेगवेगळ्या दिवाळी अंकांतून प्रसिद्धी मिळाली आहे. सन २००९ मध्ये आलेल्या जिवावरच्या दुखण्याच्या काळात सक्तीने विश्रांती घ्यावी लागली. त्या काळातच प्रदीर्घ चिंतन आणि वाचनाचा परिपाक म्हणून 'अग्निदिव्य' या ऐतिहासिक, राजकीय कादंबरीचे लेखन झाले. किशोरांसाठी लिहिलेल्या शिवचरित्रातील कथांचे पुस्तक प्रकाशनाच्या प्रतीक्षेत आहे. महाराजांच्या चरित्रावर आधारित त्यांच्या जीवनातील एका रोमहर्षक प्रसंगावरील कादंबरीचे लेखन सुरू आहे. त्याच्या जोडीने समूर्तगम कीर्ती, भूमिकन्या सीता हिची जीवनकहाणी लिहिण्याचे कामसुद्धा सुरू आहे.



कल्याणीरमण बेन्नुरवार

आयुष्याच्या वाटचालीत अनेकांच्या अनुभवांचे आपण साक्षीदार असतो. कधी त्या घटनांमध्ये आपला प्रत्यक्षअप्रत्यक्ष सहभाग असतो कधी स्वेच्छापूर्वक वा आकस्मिकपणे किंवा नाइलाजाने आपद्धर्म म्हणून. अनेक व्यक्ती भेटतात. कुणी चटका लावून जातात, कुणी चटका देऊन जातात. कुणी धडा घालून देतात तर कुणी धडा शिकवतात. कालौघात पुढे कधीतरी कारणपरत्वे मनामध्ये आठवणी उचंबळून येतात; भावभावनांच्या विविध लहरींनी मन व्यापून जाते. कधी व्याकूळ होते. या आठवणींना कल्पिताच्या मखरात बसवल्यानंतर ज्या कथा निर्माण झाल्या, त्या कथांचा संग्रह म्हणजेच 'तरंग'.

या कथा वाचकाला आपल्याच अनुभवांचे किंवा अनुभूतींचे प्रतिबिंब वाटल्याशिवाय राहणार नाहीत.

('तरंग' पुस्तकातून...)

नाडीपरीक्षा

स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार या अपसमजातून घडलेल्या चुकीचे दाहक परिणाम

''भँवरलाल शेठ, या वर्षीचा मुहूर्त तुम्हाला असा लाभदायक ठरेल की, गेल्या पंचवीस वर्षांत कधी तुम्हाला असा लाभ झाला नसेल.''

दिवाळीतली, नवीन वर्षाच्या मुहूर्ताची पूजा आटोपल्यावर अहेर व दक्षिणा पडशीत ठेवताठेवता, पंडित डाह्याभाई जोशी आपले पिढीजात यजमान शेठ भँवरलाल गालांना तोंडभरून आशीर्वाद देत होते.

''एम केम ब्राह्मण देवता, असे तर तुम्ही दर मुहूर्ताला म्हणता. धंदा-पाणी वर खाली होतंच राहतो; पण मला आता आस लागली आहे, घरात जावई येण्याची. एकदा कोमलची डोली विदा केली की, मी आपली वृंदावनला जाऊन राहायला मोकळी.''

डाह्याभाईंसमोर मिठाई आणि मेव्याने भरलेले ताट ठेवत फुलवंतीबेन म्हणाल्या.

''शेठाणीजी, माझे पोट केवढे! मी काय इतकी मिठाई खाणार? मी आपला फक्त मसाला दूध घेतो. बाकी बांधून दिलेत तर घरी पोरे-बाळे दिवाळी मजेत करतील.''

''ते देते; त्याची चिंता करू नका. सदान्कदा लक्ष तिकडेच. मी काही सांगितले, तर तिकडे लक्ष देणार नाही.''

''असं कसं शेठाणीजी, मी स्वतःच तुम्हाला सांगणार होतो, तर तुम्हीच विषय काढलात बघा. माझे दुसरे एक यजमान आहेत, शेठजी ओळखतात त्यांना. शेठ लखीचंद छेडा. फार मोठी आसामी आहे. मोठे दोन्ही मुलगे वडिलांच्या धंद्यात लक्ष घालतात. एक जावई अमेरिकेत, तर दुसरा न्यूझीलंडमध्ये. त्यांचेही मोठे बिझिनेस आहेत. त्यांचा सर्वांत धाकटा मुलगा आहे, डॉ. प्रवीणभाई. खूप हुशार आहे. एम.बी.बी.एस.ला दाखला मिळत असताना आयुर्वेदाचा डॉक्टर झाला. स्वतःची चांगली प्रॅक्टिस तर आहेच; पण सगळे भाईलोक मिळून देशी दवाईची फॅक्टरी काढत आहेत. दोन्ही जावईसुद्धा इंपोर्ट-एक्सपोर्टवाले, मग सगळी दवाई फॉरेनला पाठवणार. मुलगा एकदम

लाख माणूस आहे. आता त्यांच्याचकडे जाणार आहे. हुकूम केला तर बात चालवतो.''

''हां हां, मी चांगला ओळखतो शेठजींना. आपल्या जातीचे पंच आहेत, लखीचंद शेठ. एकदम मस्त माणूस. धंद्याला चोख. शब्दाला पक्का. त्याचे पोरेलोक पण मेहनती. काही हरकत नाही. चालवा बात.''

''संपदा बेनला तर मीसुद्धा ओळखते; पण त्यांचा धाकटा तर डांगच्या जंगलामध्ये काहीतरी सोशल वर्क करायला गेला होता कामधंदा सोडून; त्याचं वय पण जास्त आहे.''

''शेठाणीजी, प्रवीणभाई ग्रेट माणूस. डॉक्टर झाला आणि आदिवासी लोकची सेवा करायला डांगमध्ये गेला; पण शेवटी बेपारी बच्चा. तिकडे आदिवासी लोकला जडीबुटी शिकवली आणि आता त्यांचाच माल फॅक्टरीत बनवून एक्स्पोर्ट करणार. ते लोकची सेवा अन् आपलापण फायदा. हं, आता उमर तीस वरस आहे. बस तेवढाच वांधा आहे.''

''काय? तीस? चक्क दहा वर्षांचा फरक.''

''असू दे. काय वांधा नाही. आपल्यामध्ये किती फरक आहे? तुला काय कमी झाला? डाह्याभाई तुम्ही आजच बात चालवा.''

शेठ भँवरलाल गाला म्हणजे मुंबईच्या दाना बाजारमध्ये बडे प्रस्थ. घरात लक्ष्मी पाणी भरत होती. त्यांच्या दोन्ही मुलांवर कारभार सोपवून शेठजी ज्ञातीचे आणि समाजाचे काम करत होते. सर्वांत धाकटी म्हणून कोमल जरा लाडावलेलीच होती. कॉलेजात शिक्षणापेक्षा मौजमजेतच तिचे जास्त लक्ष होते; त्यामुळे शेठजी आणि शेठाणींना तिची काळजीच वाटत होती. भाऊ लाड पुरवत होते म्हणून ती भावजयींनाही जुमानत नव्हती. त्यांचे इशारे ती अजिबात मानत नव्हती.

भाईदूज झाली आणि दुसऱ्याच दिवशी पं. डाह्याभाई जोशी यजमानांच्या दारात दाखल झाले. डॉ. प्रवीण आणि कोमलची जन्मकुंडली जमत होती आणि भँवरलाल शेठसारख्या समाजामधील मातब्बर आसामीशी सोयरीक जुळून येणे शेठ लखीचंदना फायद्याचे होते. कोमलचे सौंदर्य पाहून घरातल्या सगळ्यांनाच हा रिश्ता मंजूर होता. फक्त धाकट्या सुनेने जरा नाराजीचा सूर लावला होता; एवढेच. तिची छोटी बहीण कोमलच्याच कॉलेजात होती आणि तिच्या मौजमस्तीचे अनेक किस्से ती घरी सांगत असे; पण जमाना पुढारलेला आहे. कॉलेजात आपल्या पोरांनी मौजमस्ती नाही करायची तर मग कोणी?

अशा गोष्टींकडे कानाडोळा केलाच पाहिजे, असे सर्वांचे मत पडल्यावर तो प्रश्नही निकालात निघाला. मात्र, डॉ. प्रवीणचा आग्रह होता की, फक्त पंडितजींवर विसंबून न राहता, समक्ष जाऊन मुलगी पाहावी, तिच्याशी बोलावे. शेठ भँवरलाल आणि फुलवंती बेनना त्यात काहीच वावगे वाटले नाही. लगेच दोन्हीकडून फोनाफोनी झाली. दुसऱ्याच दिवशी सकाळी दहा वाजता भेटीचा कार्यक्रम ठरला. म्हणजे मग सगळेच आपापल्या कामधंद्याला मोकळे होणार होते.

कोमल सुंदर होतीच, चटपटीत वागणे-बोलणे आणि मोकळा स्वभाव याची सर्वांवर चांगलीच छाप पडली. छेडा मंडळी तिच्यावर खूश झाली. मॅनेजमेंटचे शिक्षण घ्यायला आणि फॅक्टरीच्या अनेक कामांची जुळवाजुळव करायला डॉ. प्रवीण लवकरच अमेरिकेला रवाना होणार होता. मग दोन वर्षे तरी त्याला परत येणे जमणार नव्हते. त्याच्या दोन्ही बहिणीही दिवाळीसाठी भारतात आलेल्या होत्या. म्हणून येत्या पंधरा-वीस दिवसांतच लग्न उरकावे, असा लखीचंद शेठ आणि संपदा बेनचा आग्रह पडला. लग्नानंतर कोमल नवऱ्याबरोबर अमेरिकेला जाणार होती; पण त्याआधी नव्या सुनेला घेऊन त्यांना नाथद्वारला श्रीनाथजींचे दर्शन करून यायचे होते.

देवदयेने साधनांची मुळीच कमतरता नव्हती. दोन्ही घरचे उपाध्याय एकच आणि ते बैठकीला उपस्थित. बसल्या बैठकीतच मुहूर्त ठरला. ताबडतोब सगाईची रसम पुरी करायचे ठरले. तरुण मंडळी खरेदीला धावली, तर वडील मंडळी नोकरांकडून बाकी व्यवस्था करवून घेण्यात गुंतली. फोनवरूनच पटापट आमंत्रणे गेली. दुपारी एक-दीडपर्यंत शेठ भँवरलालजींच्या घरीच सगाईचा कार्यक्रम करून मंडळी बड्या हॉटेलात जेवायला निघालीसुद्धा! घटना इतक्या वेगाने घडत गेल्या की, कोणाला फारसा विचार करायला वेळच मिळाला नाही. लग्नाची तयारी, अमेरिकेत जाण्याची तयारी, खरेदी, व्हिसा, आमंत्रणे, मित्र-मैत्रिणींना पार्ट्या या साऱ्या धामधुमीत प्रवीण आणि कोमल फक्त फोनवर बोलूनच भेटल्याचे समाधान मिळवत होते. सगळ्या गडबडीत लग्नाचा दिवस कसा उजाडला कोणाला कळलेच नाही.

लग्न पारंपरिक पद्धतीने रात्री होणार होते; पण जेवणावळीची धमाल दुपारपासूनच सुरू होती. रोषणाईमुळे दिवस मावळून अंधार पडलेला जाणवलाच नाही. शेठ भँवरलालच्या वाळकेश्वरच्या हवेलीसमोरच भला मोठा मांडव घातलेला होता. एकुलत्या एक आणि सर्वांत लहान मुलीचे लग्न.

घरातील शेवटचे कार्य. वैभवात कुठेच कमतरता नव्हती. उत्साहाचे मोर मांडवात थुईथुई नाचत होते. मुलांचा गोंधळ, तरुण-तरुणींचा जल्लोष आणि मोठ्यांची लगबग. सगळी धमाल उडून गेली होती.

लांबून फटाक्यांचे बार ऐकू येऊ लागले. मागोमाग बँडचे स्वर कानांवर येऊ लागले. बारात जवळ आल्याचे संकेत मिळताच, वरातीच्या स्वागतासाठी सर्व मंडळी प्रवेशद्वाराशी सज्ज झाली. निरांजने ओवाळली. कॅमेरे रोखून सज्ज झाले. घोड्यावर बसून पारंपरिक पोशाखात दुल्हेराजा आले. वरातीचा आणि वऱ्हाड्यांचा नूर तोडीस तोड होता. बारीकसारीक रीतीरिवाज आणि सगळ्यांचे मानपान सांभाळत वरातीचे स्वागत झाले. वऱ्हाड्यांना जलपान झाले.

मंगल वाद्यांच्या गजरात, मंगलघोषात आणि मंगलमय वातावरणात विवाह विधींना सुरुवात झाली. मंगलाष्टके होऊन वरमाला घातल्या गेल्या. लाडक्या लेकीला चांगले स्थळ मिळाले, याचा आनंद आणि तिच्या वियोगाचे दुःख, अशा संमिश्र भावनांनी गाला पति-पत्नी भारावून गेले होते. कन्यादानाची वेळ आली. कोमलचे कन्यादान करण्यासाठी आणि स्वीकारण्यासाठी वधू-वरांचे माता-पिता समोरासमोर उभे राहिले. मध्यभागी वधू-वर एकमेकांसमोर उभे होते. मंत्रघोष सुरू होता. ब्राह्मणांनी पाणिग्रहण करण्यासाठी कोमलचा हात हातात घेण्याची प्रवीणला सूचना केली. भोवताली दोघांच्या मित्र-मैत्रिणींच्या थट्टामस्करीला ऊत आला होता. आता तर ती टिपेला पोहोचली. स्मितानेच थट्टेचा स्वीकार करत प्रवीणने कोमलचा हात हातात घेतला.

''छे! छे!! असा शेकहँड नाही करायचा. हात चांगला पक्का मजबूत धरायचा. संपूर्ण तळवा आपल्या हाताच्या पकडीत धरायचा. एकदा धरला, म्हणजे असाच सात जन्म धरून ठेवायचा. सोडायचा नाही.''

पं. डाह्याभाईंनी हसतहसत अशी सूचना करताच हास्याचा मोठा कल्लोळ उडाला. कोमल लाजून चूर झाली. तिरप्या नजरेने पाहत प्रवीणने तिचा संपूर्ण तळवा आपल्या विशाल आणि मजबूत पंजाने धरला. अनायासेच त्याचा अंगठा तिच्या मनगटावर आला. बघताबघता प्रवीणची चर्या बदलली. चेहरा पांढराफटक पडला. कपाळावर घामाचे थेंब चमकू लागले. काळजात जोरदार कळ उठावी तशी तीव्र वेदना त्याच्या मुखावर उमटली. झटकन त्याने कोमलचा हात सोडला. दोन्ही हातांनी मस्तक दाबून धरून तो विवाह वेदीवरून बाजूला झाला. कोणीतरी त्याला लगेचच शेजारच्या कोचावर बसवले. मांडवातील नूर झपाट्याने पालटला. उत्साहाची जागा काळजीने घेतली.

मोठ्या भावाचा आधार घेत प्रवीण शेजारच्याच एका खोलीत गेला. बराच वेळ दरवाजा बंद राहिला. चिंताक्रांत चेहऱ्याने प्रवीणचा भाऊ खोलीबाहेर आला. दाराशीच उभ्या असलेल्या प्रवीणच्या आणि कोमलच्या आई-वडिलांना आत सोडून, दरवाजा बाहेरून बंद करून तो दारातच थांबला. प्रश्नांचा मारा करून साऱ्यांनी त्याला भंडावून सोडले. सर्व प्रश्नांना त्याचे 'विशेष काही नाही' एवढेच उत्तर होते. त्याने दोन्हीकडील वयस्कर नातेवाइकांना आग्रहपूर्वक सांगितले, ''काळजीचे काही कारण नाही. थकव्यामुळे चक्कर आली आहे. थोड्याच वेळात सर्व ठीक होईल. तोपर्यंत कृपा करून पाहुण्यांना खोळंबून ठेवू नका. जेवणे सुरू करा.''

उभय माता-पिता खोलीत आले. एका सोफ्यावर हात-पाय पसरून प्रवीण अस्ताव्यस्त पडला होता. वेदनेने पिळवटलेला त्याचा चेहरा बघवत नव्हता. वडील मंडळी आत येताच तो सावरून बसला. संपदा बेन गाईसारख्या पाडसाकडे झेपावल्या आणि त्यांनी त्याला कुशीत घेतले. आईच्या कुशीत तोंड लपवून तो बराच वेळ गदगदत राहिला. शेठ लखीचंद अस्वस्थपणे त्याच्या पाठीवरून हात फिरवत राहिले. काहीच न उमगल्याने शेठ भँवरलाल आणि फुलवंती बेन दिङ्मूढहोऊन टकामका बघत उभे राहिले.

काही वेळाने प्रवीण आईच्या कुशीतून दूर झाला. त्याने आता मनावर ताबा मिळवला असला, तरी तसे करताना त्याला भयंकर त्रास झाला होता. चर्या शांत दिसत असली तरी नेहमीचे निर्व्याज हसू मावळले होते. त्याची जागा गांभीर्याने घेतली होती.

कातर स्वरात लखीचंद शेठनी विचारले, ''बेटा काय झाले, अचानक? लग्नविधी अर्धवट टाकून असा इकडे येऊन का बसलास? डॉक्टरांना बोलावू का?''

''आता मी ठीक आहे बापू. फक्त मला तुम्हाला जे सांगायचे आहे, ते मला मध्ये न अडवता ऐका. बसा. आधी सगळे खाली बसा.''

मन चिंती ते वैरी न चिंती. अशुभाच्या आशंकेने थरथर कापत गाला पती-पत्नी शेजारच्याच खुर्च्यांवर टेकले. लखीचंद शेठ मुलाचा हात हातात धरून एका बाजूला, तर डोक्यावरून हात फिरवत संपदा बेन लेकाच्या दुसऱ्या बाजूला बसल्या. खोलीत तणावपूर्ण शांतता पसरली. खोलीबाहेरची कुजबुज आणि अस्वस्थ हालचाल आत जाणवत राहिली.

''कोमलची बा, जरा कोमलला बोलावून घ्या. एकटीच. सोबत दुसरे

१५वी आवृत्ती

गुलमोहर
वपु काळे

किंमत : १३०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

गुलमोहराचं झाड केव्हाही छान दिसतं.

निळ्या-निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर ते जेवढ्या डौलानं शेंडे वर करून डुलतं, तेवढ्याच श्रीमंतीनं काळ्याभोर पावसाळी ढगांवरसुद्धा वैभवशाली दिसतं, भव्य वाटतं.

पण दिवाकरपंतांना गुलमोहराचं झाड आता बघवेना. तो त्यांचा पराभव होता. भंग पावलेलं स्वप्न होतं. लाकूडतोड्या झाडावर सरड्याप्रमाणे चढला. वरच्या फांदीवर पहिली कुऱ्हाड बसली आणि त्या पहिल्या घावानं दिवाकरपंतांच्या अख्ख्या भूतकाळातील आठवणींवर तडाखा हाणला.

दुसऱ्या घावासरशी त्यांचा भविष्यकाळ नष्ट केला. तिसरा घाव बसला आणि दिवाकरपंतांना प्लॉटचा वर्षवाढदिवस आठवला. घावा-घावागणिक आठवणींचा मोहर झोडपला जात होता. खाली पडणाऱ्या फांद्या चुकवीत-चुकवीत दिवाकरपंत तांबडी फुलं भराभर वेचत होते.

घावावर घाव बसत होते. झाडाची उंची कमी होत होती, दिवाकरपंतांचं स्वप्नही लहान-लहान होत होतं.

कोणी नको.''

धास्तावलेली कोमल खोलीत आली. आईच्या शेजारी बसली. तिने तिच्या थरथरणाऱ्या हातात आईचा थरथरणारा हात घट्ट धरून ठेवला होता. तिच्याकडे एकटक पाहत, गंभीर स्वरात, प्रवीण म्हणाला, ''बापू, बा, मला क्षमा करा. काळजावर दगड ठेवून, पूर्ण विचार करून, सर्व शक्यता तपासून मी हा निर्णय घेतला आहे; मला त्याशिवाय दुसरा काही मार्गच दिसत नाही. मला हे लग्न करणे शक्य नाही.''

तापलेल्या शिशाचा रस शिरावा, तसे ते शब्द गाला मंडळींच्या कानांत शिरले. कोमल अन् फुलवंती बेनच्या तोंडून एकदम विचित्र चीत्कार बाहेर पडला. बसलेला धक्का एवढा जबरदस्त होता की, डोळ्यांतून अश्रूसुद्धा ठिबकला नाही. काही क्षणांच्या भयाण शांततेनंतर सर्वांत प्रथम भानावर आल्या त्या संपदा बेन.

''प्रवीण बेटा, अरे हे तू काय बोलतोस? आपण काय करत आहोत, त्याचे परिणाम काय होतील, तुझ्या लक्षात येतंय का?''

''बा, तुला माहीत आहे, मी कुठलीही गोष्ट अविचाराने करत नाही. मी जो निर्णय घेतलाय त्याला सबळ कारण आहे. कोमलला ते कारण माहीत आहे.''

तोपर्यंत भँवरलाल शेठसुद्धा सावरले होते. थरथरत्या, कापऱ्या आवाजात ते कसेबसे बोलले, ''बेटा, काही गैरसमज असेल तर, काही नाराजी असेल तर किंवा काही हवे असेल तर आपण नंतर सावकाश ठरवू. तुझी कोणतीही इच्छा पूर्ण करण्याची ठाकूरजींच्या कृपेने माझी कुवत आहे. बेटा, लग्नाचे बाकी सर्व विधी पूर्ण झालेच आहेत. आता फक्त पाणिग्रहण आणि फेरे तेवढे बाकी आहेत. असा कुठला आततायी निर्णय घेऊ नकोस. तुम्हा दोघांच्या साऱ्या आयुष्याचा प्रश्न आहे. ऊठ बेटा, चल. बाहेर सगळे खोळंबले आहेत. मुहूर्त टळून चालला आहे. कोमलची काही चूकभूल असेल, तर तिला क्षमा करा. तिच्यासाठी मी माफी मागतो.''

''नाही, कोमलचे बापू. आता ते शक्य नाही. आता सारे संपले आहे. चूक असेल तर क्षमा होते; पण फसवणुकीला क्षमा करणे कसे शक्य आहे? हे लग्न होणे शक्य नाही.''

मुलाचा हा प्रकार पाहून हतबुद्ध झालेले लखीचंद जरा तीव्र स्वरात म्हणाले, ''मघापासून तेच तेच बोलतो आहेस; पण कारण काय आहे ते सांगशील की नाही?''

वडिलांचे कठोर शब्द ऐकण्याची वेळ प्रवीणवर आजवर कधीच आली नव्हती. ओठ दाताखाली घट्ट दाबून तो थोडा वेळ गप्प राहिला. काही वेळाने त्याने सावकाश मान वर केली. आईला बिलगून पाषाणपुतळीसारख्या उभ्या असलेल्या कोमलकडे पाहत, मनातील कटुता लपवण्याचा किंचितही प्रयत्न न करता; पण अतिशय संयत स्वरात, स्पष्ट आवाजात, एक एक शब्द तुटक तुटक उच्चारत तो म्हणाला, ''कोमलला दिवस गेले आहेत. तूच सांग बा, अशा परिस्थितीत मी तिच्याशी लग्न करणे कसे शक्य आहे?''

एका जोरदार हुंदक्याशिवाय कोमलच्या तोंडातून शब्द फुटला नाही. 'नाही नाही' अशा अर्थाने तिची मान मात्र हलत राहिली. सगळ्यांवरून एकदा नजर फिरवून, प्रवीणकडे रोखून बघत लखीचंद शेठ म्हणाले, ''प्रवीण, तू भानावर आहेस ना? सगाईपासून आजपर्यंत तुमची एकसुद्धा भेट नाही. मग तू हे जे म्हणतो आहेस, ते कसे कळले? असे धरून चालू की, तुला कोणीतरी सांगितले किंवा तसे कोणाचे पत्र आले. जर असे असेल, तर सेहरा बांधण्यापूर्वीच आम्हाला तसे सांगायचे होतेस. वेळीच या गोष्टीची शहानिशा करून घेतली असती. दोन्ही घरांची अशी बेइज्जत करण्याची काय गरज होती?''

''बापू, तुमच्या लाडक्या प्रवीणवर तुमचा विश्वास नाही का? मला कोणी काहीतरी सांगितले आणि त्याची सत्यासत्यता न पडताळता मी ते तसेच मानले, असे आजवर कधी झाले आहे का? ही गोष्ट मला स्वतः कोमलनेच सांगितली. आत्ता कन्यादानाच्या वेळीच सांगितली.''

हे ऐकून सारेच थक्क झाले. भँवरलाल शेठ आणि फुलवंती बेनच्या चेहऱ्यावर संताप उमटला. कोमल अधिकच घाबरली. लखीचंद शेठ व संपदा बेनसुद्धा अविश्वासाने आणि आश्चर्याने त्याच्याकडे बघत राहिले. अस्वस्थ शांततेचा भंग करत संपदा बेन म्हणाल्या, ''अरे, काय हे असे वेड्यासारखे करतोस. आम्ही सगळे तिथेच तुमच्यासोबत हजर होतो ना? मग आम्हाला कसे काहीच ऐकू आले नाही? कोमल, खरोखरच तू याला असे काही सांगितलेस का? हा काय प्रकार आहे?''

कोमलच्या तोंडातून शब्द फुटेना. तिची आईची गळामिठी अधिकच घट्ट झाली आणि सारे अंग हुंदक्यांनी अधिकच गदगदू लागले. तिच्याऐवजी प्रवीणनेच उत्तर दिले,

''प्रत्येक गोष्ट तोंडाने सांगण्याची वा कानाने ऐकण्याची प्रत्येकालाच गरज

असते असे नाही. बा, मी डॉक्टर आहे. तेसुद्धा आयुर्वेदिक. नाडीपरीक्षेचा मी तज्ज्ञ समजला जातो, हे तर तुला माहीत आहे ना? आजपर्यंत कधीच मी नाडीपरीक्षा करून केलेले निदान खोटे ठरलेले नाही. कोणत्याही प्रसंगी, सदासर्वदा माझ्यातला डॉक्टर शंभर टक्के जागृत असतो. पाणिग्रहणासाठी तुम्हा सर्वांच्या साक्षीने मी कोमलचा हात हातात घेतला, त्याबरोबर तिची नाडी स्पष्ट शब्दांत आणि आवाजात मला सांगत होती- ती गर्भवती आहे. सहा आठवड्यांपेक्षा जास्त; पण आठ आठवड्यांपेक्षा कमी दिवस गेले आहेत. या माझ्या निदानात थोडी जरी चूक झाली असे निष्पन्न झाले, तर आयुष्यात परत कधीच कोणाची नाडी पाहणार नाही आणि डॉक्टरकी सोडून देईन.''

प्रवीणच्या नजरेतील वेदना आणि स्वरातील आत्मविश्वास स्पष्ट सांगत होता की, तो जे बोलला त्याची आणि त्याच्या होणाऱ्या परिणामांची त्याला पूर्ण खात्री होती. भँवरलाल शेठ आणि फुलवंती बेनवर तर जणू विजेचा लोळच कोसळला. दोन्ही खांदे गदागदा हलवत फुलवंती बेन कोमलला म्हणू लागल्या, ''सांग कोमल, सांग; हे खोटं आहे. धादांत खोटं आहे. याचा आत्मविश्वास अनाठायी आहे. माझी कोमल मनमोकळी आहे, थोडी उच्छृंखल आहे; पण अशी बेजबाबदार नाही, मूर्ख नाही. मला पूर्ण खात्री आहे, तू पूर्ण शुद्ध आहेस. निष्कलंक आहेस. पवित्र आहेस. सांग कोमल, सांग.''

आईचे शब्द ऐकून कोमलने हंबरडाच फोडला. सोसाट्याच्या वादळात गदगदा हलणाऱ्या वेलीसारखी ती हुंदक्यांनी घुसळत होती. डोळ्यांतून अविरत अश्रू ओघळत होते. ओठ कापत होते; पण शब्द उमटत नव्हते. आईने आर्त स्वरात पुनःपुन्हा विचारल्यानंतर सिसकत सिसकत ती एवढेच बोलू शकली,

''बा अगं, हे जे बोलताहेत ते काय खरे आणि काय खोटे, मला काहीच माहीत नाही; पण बा, बा, मला क्षमा कर. मी तुझ्या विश्वासाला पात्र नाही. माझ्या हातून तुझ्या विश्वासाचा भंग झाला. बा, बापू मी चुकले. मी मोहात पडून वाहात गेले. माझ्याकडून मर्यादेचे उल्ल्लंघन झाले. बापू, मला क्षमा करा.''

कोमलच्या तोंडून अशी जवळजवळ स्वीकारोक्तीच ऐकून फुलवंती बेन झाड उन्मळून पडावे तशा खाली कोसळल्या. इतका वेळ लटलट कापत उभे असलेले भँवरलाल शेठ मटकन खालीच बसले. लखीचंद शेठ आणि संपदा बेनच्या चेहऱ्यावर तिरस्कार उमटला. ते दोघे काही क्षण गाला मंडळींकडे तिरस्काराने आणि विषादाने बघत उभे राहिले. मग हळूहळू जड पावलांनी

लखीचंद शेठ दरवाजाकडे वळले. त्यासरशी सर्व शक्ती एकवटून भँवरलाल शेठ उठले. डोक्यावरची भरजरी भाटिया पगडी उतरवून त्यांच्यापुढे करत ते अतिशय कळवळून म्हणाले, ''शेठजी, शेठजी, थांबा. असे कठोर होऊ नका. अजाणतेपणे माझ्या लेकीच्या हातून चूक झाली. तिला माफ करा. तिच्या मनात पाप नाही. तिला पदरात घ्या. अशी टाकून देऊ नका. आज माझा सारा सन्मान, सारी प्रतिष्ठा, इज्जत, पत तुमच्याकडे गहाण आहे. माझी लेक तुमच्या घरात बटीक होऊन राहील. आम्ही ब्र उच्चारणार नाही. तिची आणि माझ्या घराण्याची इज्जत अशी मातीमोल करून जाऊ नका. माझ्या पदरात एवढी भीक घाला. मी माझ्या कातड्याचे जोडे तुमच्या पायी घालीन.''

कशाबशा सावध होत, स्वतःला सावरत फुलवंती बेन म्हणाल्या, ''समधन, मी लेकीच्या चुकीवर पांघरूण घालत नाही, तुम्हीसुद्धा आई आहात. आईच्या अंतःकरणाने तिला एकदा क्षमा करा. तिचा अपराध पोटात घ्या. तिला सुधारण्याची एक संधी द्या. प्रवीण बेटा, तू स्वतः डॉक्टर आहेस. यावरचा उपाय तुला माहीत आहेच. ज्ञातीसाठी, समाजासाठी, दीन-दुःखितांसाठी तू एवढा झिजतोस. आम्हा दीनांवर दया कर. आम्हाला असा अनाथ करून, वाऱ्यावर सोडून जाऊ नकोस. माझ्या लेकीला एक संधी दे. तिची इज्जत अशी बाजारात मांडू नकोस. बेटा, दया कर आमच्यावर.''

''कोमलच्या बा, घडली गोष्ट या खोलीबाहेर कोणाला समजणार नाही, असे मी स्वतः आणि बा-बापूंच्या वतीने तुम्हाला वचन देतो; पण मी अगतिक आहे. तुमची विनंती मी मान्य करू शकत नाही.''

''भँवरलाल शेठ, तुम्ही ज्ञातीचे पुढारी. तुमच्या शब्दावर आपल्या ज्ञातीच्या माणसांचा मोठा भरवसा. तुम्हीच त्यांना नीतिअनिती शिकवणार. तुमच्या घरात काय चालते हे तुम्हाला समजू नये? आश्चर्य आहे! आमच्या घरातसुद्धा लेकी-सुना आहेत. त्या काही गोषात आणि पडद्यात वावरत नाहीत; पण बरोबरीला आलेल्या मुली-बाळींना किती मोकळीक द्यायची, याला मर्यादा हवी. त्यांच्या जाण्या-येण्याच्या वेळांवर, पेहरावांवर, मित्र-मैत्रिणींवर आई-बापाचे लक्ष हवे. माझ्या सुसंस्कारित घरात, स्वतःच्या हाताने हा जळता निखारा घेऊन मी घराला आग लावू शकत नाही. मीसुद्धा ज्ञातीचा पंच आहे. उद्या एखादा असाच बखेडा माझ्यासमोर आला, तर निवाडा देताना माझे हात स्वच्छ हवेत.''

''शेठजी, तुम्ही कर्णासारखे उदार आणि धर्मराजासारखे दयाळू आहात,

न्यायी आहात, हे सारी ज्ञाती जाणते. माझ्या पोरीचा अपराध पोटात घ्या. माझी इज्जत, माझा जीव वाचवा. माझी पगडी ठोकरून असे जाऊ नका.''

भँवरलाल शेठनी आपली पगडी लखीचंद शेठच्या पायांशी ठेवली. दोन्ही हातांनी त्यांचे पाय धरून त्यांना आसवांनी अभिषेक सुरू केला. लखीचंद शेठ थोडेसे गलबलले; पण प्रवीणची निर्विकार मुद्रा आणि संपदा बेनच्या डोळ्यांतील तिरस्कार पाहून त्यांनी मन घट्ट केले. पाऊलभर मागे सरकून त्यांनी आपले पाय हलकेच सोडवून घेतले. पगडीला पाय लागणार नाही याची काळजी घेत, ते पगडी ओलांडून पुढे झाले. तिघेही छेडा खोलीतून हलकेच बाहेर आले.

बंद दाराआड खोलीत बराच काही गंभीर प्रकार सुरू आहे, हे जाणून पाहुण्यांनी आधीच काढता पाय घेतला होता. दोन्ही पक्षांची मोजकीच - फक्त घरचीच - मंडळी खोलीच्या दाराशी उत्कंठेने उभी होती. अधिक उणा एक शब्द न बोलता लखीचंद शेठनी आपल्या कुटुंबीयांना घरी परत चलण्याचा आदेश दिला आणि ते प्रवीण व संपदा बेनसह गाडीत जाऊन बसले. काही मिनिटांतच वऱ्हाडी मंडळी निघून गेली आणि गालांच्या घरची मंडळी घाबऱ्याघुबऱ्या खोलीत दाखल झाली.

खोलीतील दृश्य काळजाचे पाणी करणारे होते. गुडघ्यात मान घालून कोमल स्फुंदत होती. फुलवंती बेन शुद्ध हरपून गालिच्यावर अस्ताव्यस्त पसरल्या होत्या. भँवरलाल शेठ लखीचंद शेठचे पाय धरण्यासाठी वाकले होते, तसेच गोठल्यासारखे दिसत होते. तोंडावर पाणी मारल्यावर फुलवंती बेन तर सावध झाल्या; पण भँवरलाल शेठना उठवण्याचा प्रयत्न करताच ते खाली कोसळले. त्यांचे प्राण त्यांचे शरीर सोडून साऱ्या भाव-भावनांच्या पलीकडे निघून गेले होते. काही वेळापूर्वी मंगल वाद्यांनी आणि मंगलमय मंत्रांनी दुमदुमणारी हवेली शोकात, विलापात, आक्रोश आणि आक्रंदनात बुडून गेली.

काळ कोणासाठीच थांबत नसतो. दुसऱ्या दिवसाची मध्यान्हीची वेळ. हवेलीच्या दारात मांडव तसाच होता; पण आता त्याच्यावर सुतकी कळा पसरली होती. पांढऱ्या वस्त्राने झाकलेले भँवरलाल शेठचे शव दिवाणखान्यात ठेवले होते. एका भिंतीला टेकून फुलवंती बेन पत्थराच्या मूर्तीसारख्या निश्चल बसून होत्या. शून्यात नजर लावलेली कोमल त्यांच्या खांद्यावर डोके टेकून विद्ध पक्षिणीसारखी बसली होती. तिच्या अंगावर वधूवेष अजून तसाच होता.

TBC 'क्लासिक'साठी खास सवलत! **९वी आवृत्ती**

नॉट विदाऊट माय डॉटर

लेखिका
बेट्टी महमूदी
सहलेखक
विल्यम हॉफर
अनुवाद
लीना सोहोनी

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

"आता तू जन्मभर इथंच राहायचं, समजलं? तू आता इराण सोडून कधीच जायचं नाही, मरेपर्यंत इथंच राहायचं."

बेट्टी महमूदी आणि तिचे पती डॉ. सय्यद बोझोर्ग महमूदी (अर्थात 'मूडी') हे अमेरिकेतून इराणला आले, ते आपल्या कुटुंबीयांना भेटण्याच्या निमित्तानं. त्यांच्यासोबत त्यांची चार वर्षांची मुलगी माहतोब सुद्धा होती.

इराणमधील गलिच्छ राहणीमानाची बेट्टीला घृणा वाटली. ज्या देशात स्त्रियांना कस्पटासमान वागणूक मिळते, पाश्चात्त्यांचा तिरस्कार केला जातो, त्या देशात राहण्याच्या कल्पनेनं ती भयभीत झाली. लवकरात लवकर अमेरिकेला परतण्यासाठी ती व्याकूळ झाली. पण मूडी आणि त्यांच्या दुष्ट कुटुंबीयांचं काही वेगळंच कारस्थान शिजत होतं.

लवकरच आई आणि मुलगी एका परकीय संस्कृतीच्या कचाट्यात कैदी होऊन राहू लागल्या. एका जुलमी, क्रूर माणसाच्या हातचं बाहुलं बनून...

कालांतरानं बेट्टीला एका माणसाचं नाव समजलं. हा माणूस त्यांना इराणमधून पळ काढण्यासाठी मदत करणार होता.

पण सुटकेचा मार्ग संकटमय, भीतिप्रद होता. आजपर्यंत असला प्रवास करण्याचं साहस जवळपास कुठल्याच स्त्रीनं व तेही लहान मुलांना घेऊन, केलेलं नव्हतं.

घरी परतण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची सुरुवात एखाद्या दु:स्वप्नासारख्या भासणाऱ्या हिमवादळानं झाली...

तिच्या भावजया आणि भाऊ जवळच बसले होते. अंत्ययात्रेची तयारी पूर्ण झाली होती. एवढ्यात फाटकाशी दोन कार थांबल्या. त्यातून लखीचंद शेठ पत्नी, सुना व तीन मुलांसह खाली उतरले. त्यांच्या येण्याची कोणीच दखल घेतली नाही. सारे कलेवराजवळ आले. नमस्कार करून पुष्पांजली वाहिली.

गाला कुटुंबातील कोणीच शब्दसुद्धा उच्चारला नाही वा हालचाल केली नाही. प्रवीणची थोरली भावजय पुढे झाली. कोमलच्या शेजारी ती जमिनीवरच बसली. तिने कोमलला जवळ ओढून कुशीत घेतले. रात्रीपासून तिरस्काराच्या नजरांचा सामना करणाऱ्या कोमलला त्या स्पर्शातले आश्वासन जाणवले. तिने तिच्या गळ्याला घट्ट मिठी मारली आणि रडण्याला वाट मोकळी करून दिली. संपदा बेन फुलवंती बेनच्या शेजारी बसल्या. त्यांनी हलकेच त्यांच्या मस्तकावर हात ठेवला; पण कुठलीच प्रतिक्रिया उमटली नाही. पुरुषमंडळी अस्वस्थ हालचाली करत थोडा वेळ तशीच उभी राहिली. लखीचंद शेठनी नजरेने खूण करताच थोरला पुढे झाला. कोमलच्या मोठ्या भावासमोर येऊन हलक्या आवाजात तो म्हणाला, ''भाईसाब, जरा थोडेसे बोलायचे आहे. थोडे बाजूला येता का? प्लीज?''

भावनांना आवर घालत, स्वरातून तिरस्कार व्यक्त होणार नाही याची काळजी घेत त्याने उत्तर दिले, ''मला वाटते, तुम्हाला जे बोलायचे होते ते बापूंबरोबर बोलून झाले आहे. आता बोलण्यासारखे काही उरले असेल, असे वाटत नाही. तुमची आमच्यावर आधीच खूप मेहेरबानी झाली आहे. आता एक शेवटची कृपा करा. आमच्या संयमाचा बांध फुटण्यापूर्वी इथून निघून जा.''

लखीचंद शेठ पुढे झाले. त्याच्या पाठीवर थोपटत भरल्या गळ्याने ते म्हणाले, ''बेटा, आत्ता तू जे बोललास ते अत्यंत स्वाभाविक आहे. तुझ्या जागी मी असतो तर कदाचित याहीपेक्षा कटू बोललो असतो. जे घडले आहे, त्याचा मला जबरदस्त धक्का बसला आहे. तुमची क्षमा मागण्यासाठी मला तोंड नाही; पण बेटा, मला जे सांगायचे आहे ते जरा ऐकून घे. तेवढे उपकार माझ्यावर कर. या म्हाताऱ्याच्या शब्दाचा एवढा मान राख. चल, जरा बाजूला चल. तुला तुझ्या बापूंची कसम.''

पुन्हा तीच खोली. बंद दरवाजा. तणावपूर्ण वातावरण. फरक फक्त इतकाच की, भँवरलाल शेठ खोलीत नव्हते, तर त्यांचे कलेवर बाहेर विसावले होते. काही वेळ कोणीच काही बोलू शकत नव्हते. पाझरत्या डोळ्यांनी फक्त एकमेकांकडे बघत राहिले. हुंदक्यांमध्ये दडलेल्या शब्दांत लखीचंद शेठ

म्हणाले, ''प्रवीण, बेटा तुला जे सांगायचे ते लवकर सांग, बाहेर गर्दी खोळंबली आहे.''

''कोमलच्या बा, मी तुमचा गुन्हेगार आहे. माझ्या कृतीचे एवढे गंभीर परिणाम होतील याची मला कल्पना नव्हती. माझ्या या गुन्ह्याला क्षमा नाही हे मी जाणतो. माझ्यामुळे तुम्हा सर्वांचे जे नुकसान झाले आहे, ते कशानेही भरून निघणार नाही. तरी मोठ्या मनाने मला पदरात घ्या. क्षमा करा. कोमल, फक्त स्वतःचा, स्वतःपुरता विचार करण्याचे, स्वातंत्र्य घेण्याच्या नावाखाली स्वैराचार करण्याचे, वडीलधाऱ्यांचे न ऐकण्याचे परिणाम केवढे भयानक होऊ शकतात ते तू पाहिलेस? आपल्या घराण्याच्या प्रतिष्ठेचे, इभ्रतीचे, स्वतःच्या अब्रूचे, इतकेच काय, तुझ्या शीलाचे मोल तुझ्या या पापभीरू, सज्जन, देवलसी पित्याने आपल्या प्राणांनी दिले आहे. काल त्यांनी त्यांची पगडी बापूंच्या पायी ठेवली. आम्ही हतभागी तिची इज्जत राखू शकलो नाही. तुझ्या बापूंच्या शुद्ध चारित्र्याची किंमत ओळखू शकलो नाही. आमच्या या चुकीचे प्रायश्चित्त ते घेतील, अशा प्रकारे जिवाची कुरवंडी करून घेतील, अशी पुसटशीसुद्धा कल्पना आम्हा करंट्यांना आली नाही. यासाठी आम्ही सारे छेडा शरमिंदे आहोत. भाई, या अनर्थाला बऱ्याच अंशी मीसुद्धा जबाबदार आहे. माझ्या चुकीचे परिमार्जन मला केलेच पाहिजे. काल रात्री कोमलने फोन करून बाला नेमके काय आणि कसे घडले ते सारे सांगितले आहे. तिने पश्चात्ताप व्यक्त केला आहे. त्यात तिचा पूर्णांशाने दोष होता, असे म्हणवत नाही. तिच्या सांगण्यात सच्चेपणा असल्याचे, तिचा पश्चात्ताप खरा असल्याचे बाला जाणवले. तिच्या आणि बापूंच्या आज्ञेने आणि संपूर्ण छेडा परिवाराच्या वतीने मी तुम्हाला वचन देतो, कोमलवर आलेला हा ठपका आणि गाला परिवाराला लागलेला हा कलंक आम्ही आमच्या हातांनी धुऊन काढू. तुमच्या बापूंसारख्या देवमाणसाची कुर्बानी व्यर्थ जाऊ देणार नाही. तेराव्या दिवसाचे विधी पूर्ण होताच राहिलेले फेरे, श्रीनाथजींच्या साक्षीने नाथद्वाराला पूर्ण होतील. कोमलच्या बा, भाईजी याचा अव्हेर करू नका. माझी चूक सुधारण्याची एक संधी मला द्या आणि कृपा करून बापूजींना खांदा देण्यापासून आम्हाला वंचित करू नका.''

यानंतर शब्दांनी काही सांगण्या-विचारण्यासारखे शिल्लकच राहिले नाही. भारावलेल्या गाला मंडळींनी गळामिठी घालून एकमेकांना स्पर्शानेच सारे सांगितले.

भँवरलाल शेठची अंत्ययात्रा हवेलीतून बाहेर पडली, तेव्हा फुलवंती बेन विहिणीचा आधार घेऊन पतीचे अंत्यदर्शन घेत उभ्या होत्या. आक्रंदणाऱ्या कोमलला तिच्या जावांनी सावरले होते. चारही खांद्यांवर छेडा परिवाराच्या सदस्यांनीच भँवरलाल शेठचे कलेवर बाणगंगेकडे चालवले होते.

(२८ जून, २००५)

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

❖

गंमत कोडी - भाग १ ते ५

घनश्याम देशमुख

(५ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत) २२५/-रु. पोस्टेज ५०/-रु.



चित्रातील वस्तू मोजा, चित्र पूर्ण करा, खारूताईला मार्ग दाखवा, चित्रातील सारखेपणा - वेगळेपणा दाखवा इ. वैविध्यपूर्ण सचित्र कोड्यांची दुनिया म्हणजे गंमत कोडी : भाग १ ते ५. ही कोडी बालदोस्तांच्या बुद्धीला चालना देतात, अगदी हसतखेळत. बालदोस्तांची कल्पनाशक्ती, निरीक्षणशक्ती, एकाग्रता आणि सहनशक्ती वाढविणारी ही गंमत कोडी आहेत.

७वी आवृत्ती

'विंग्ज ऑफ फायर'नंतरचा स्फूर्तिदायक भाग

टर्निंग पॉइंट्स



ए.पी.जे. अब्दुल कलाम

अनुवाद

अंजनी नरवणे

किंमत : १६०/-रु. ।

पोस्टेज : ५०/-रु. ।

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

चेन्नईतील अण्णा विद्यापीठाच्या आवारातला नेहमीसारखाच एक दिवस. माझे 'संकल्पना ते ध्येय' ह्या विषयावरचे व्याख्यान संपले होते आणि ते एक ऐवजी दोन तास चालले होते. संशोधनाचे काम करत असणाऱ्या काही विद्यार्थ्यांबरोबर मी दुपारचे जेवण घेतले आणि परत वर्गाकडे गेलो. संध्याकाळी माझ्या खोलीवर परत जात होतो, तेव्हा विद्यापीठाचे उपकुलगुरू प्रो. ए. कलानिधी बरोबरच आले. ते म्हणाले की, 'कोणी तरी फोनवरून दिवसभर तुमच्याशी तातडीने संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होते.' आणि खरोखरीच; मी खोलीत पाऊल टाकले, तर फोन वाजतच होता. मी फोन उचलला, तेव्हा पलीकडच्या व्यक्तीने सांगितले, ''पंतप्रधानांना आपल्याशी बोलायचे आहे.'' काही महिन्यांपूर्वी 'भारत सरकारचा प्रमुख शास्त्रीय सल्लागार' ह्या केंद्रीय मंत्रिपदाच्या समकक्ष जागेचा राजीनामा देऊन मी अध्यापनाच्या कामावर परत रुजू झालो होतो. आत्ता जेव्हा मी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींशी बोलत होतो, तेव्हा माझे आयुष्य एका अनपेक्षित बदलाच्या टप्प्यावर होते.

'टर्निंग पॉइंट्स'मधील कलाम यांची अशक्य वाटणारी कथा, 'विंग्ज ऑफ फायर' जेथे संपते, तेथून पुढे सुरू होते. ह्या कथेत त्यांच्या कारकिर्दीतल्या आणि राष्ट्रपतिपदाच्या कालावधीतल्या कोणाला फारशा ठाऊक नसलेल्या, काही विवादास्पद घटनांबद्दलच्या अनेक बारीकसारीक गोष्टी प्रथमच समोर येतात. यातून एका असामान्य व्यक्तिमत्त्वाचे अंतरंग तर समजतेच; पण प्रयत्न केले, चिकाटी ठेवली आणि आत्मविश्वास असला, तर अनेक सिद्धी मिळवून, कौशल्ये आणि सामर्थ्ये मिळवून महान वारसा असलेला हा देश पुन्हा महान कसा होऊ शकेल, त्याची संकल्पनाही मिळते. सर्वांत विशेष म्हणजे, ही गाथा आहे एका व्यक्तीने स्वत: आणि इतरांना बरोबर घेऊन केलेल्या प्रवासाची – जो प्रवास भारताला २०२०पर्यंत आणि नंतरही एक 'विकसित राष्ट्र' म्हणून उभे करेल.

पुस्तक परिचय

थिंक युवरसेल्फ गॉर्जियस

आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा भक्कम पाया

अनिता नायक या वार्ताहर आणि लेखिका आहेत, ज्या विविध मासिकांसाठी लेखन करत असतात. 'जस्ट १७' आणि 'ब्लोजर' या किशोरावस्थेतील मुलांसाठीच्या मासिकांमध्ये वाचकांच्या वैयक्तिक समस्यांना उत्तरे देण्याचे काम त्या करत असत. सध्या त्या 'डव्ह' कंपनीच्या 'रिअल ब्यूटी वेबसाइट'च्या संपादक आहेत आणि वयात येणाऱ्या मुलींसाठी आणि त्यांच्या मतांसाठी स्वप्रतिमा याविषयी लिहीत असतात.

लेखक

अनिता नायक

अनुवाद

मंजुषा मुळे

'थिंक युवरसेल्फ गॉर्जियस' या पुस्तकात अनुभवी स्तंभलेखिका अनिता नायक यांनी अतिशय प्रामाणिक, व्यावहारिक आणि खात्रीलायक असे मार्गदर्शन केले आहे, ज्याची तुम्हाला तुमची वयात येण्याची वर्षे अगदी सहजपणे पार करण्यास नक्कीच मदत होईल. त्यांनी असे दाखवून दिले आहे की, खालावलेली स्वप्रतिमा आणि वाईट शरीरप्रतिमा असणे, हे प्रत्येकाच्याच बाबतीत घडत असते; मग ती व्यक्ती समाजात कशीही वागत असली (अगदी सुप्रसिद्ध मुलींचाही यात समावेश आहे.) तरीही आणि स्वतःच्या सर्व दोषांसह प्रेम करणे शिकण्यासाठी काय काय आणि का करावे लागते, हेही त्यांनी सांगितले आहे.

सौंदर्य, बारीकसारीक ताणतणाव, आत्मविश्वास, स्वप्रतिमा, शरीरप्रतिमा, वयात येणे आणि भावभावना या सर्वच गोष्टी अंतर्भूत असणारे 'थिंक युवरसेल्फ गॉर्जियस' हे पुस्तक म्हणजे, तुम्हाला स्वतःबद्दलच कमीपणा का वाटतो, कंटाळल्यासारखे वाटणे कसे नैसर्गिक आहे, तुमच्या दिसण्यापासून तुमच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि तुमच्या शरीराबद्दल प्रत्येक गोष्टीत तुम्हाला असुरक्षित का वाटते, हे सर्व समजून घेण्यासाठी तुम्हाला मदत करणारे आहे. तुम्हाला तुमच्या शरीराबद्दल विश्वास वाटावा यासाठीचा सल्ला, अर्थपूर्ण माहिती आणि प्रत्यक्षात आणता येतील असे मार्गदर्शक मुद्दे या सर्व गोष्टींनी परिपूर्ण असे हे पुस्तक, तुमचा आत्मविश्वास डळमळीत करणाऱ्या सगळ्या फसव्या गोष्टी तुमच्या लक्षात आणून देण्यास मदत करेल आणि तुम्हाला अंतर्बाह्य सुंदर वाटावे यासाठीही मदत करेल.

('थिंक युवरसेल्फ गॉर्जियस' पुस्तकातून...)

'थिंक युवरसेल्फ गॉर्जियस' हे पुस्तक तुम्हाला स्वतःविषयी काय वाटते, म्हणजेच तुमचे स्वतःबद्दलचे मत काय आहे याबाबत जाणून घेणारे आहे. तुमचे पालक व शिक्षकही तुम्हाला 'काय गं सारखी भुणभुण करतेस?' असे कदाचित म्हणत असतील. पण तुम्ही खऱ्या अशा आहात का? स्वतःविषयीचे तुमचे निर्भेळ मत म्हणजे, तुम्हाला स्वतःविषयी अंतर्यामी काय वाटते आणि तुमच्या शरीराच्या बाह्य रूपाविषयी तुम्हाला नेमके काय वाटते, ते तुमचे खरेखुरे मत होय. म्हणजेच तुमच्या मनात तुमची स्वतःचीच प्रतिमा कशी आहे, याबाबतचे तुमचे मत, अशी सोपी व्याख्या करता येईल. तुमच्या शरीराबद्दल तुम्हाला काय वाटते? तुमचे त्याच्यावर प्रेम आहे, की तुमच्या रूपाचा तुम्हालाच तिटकारा वाटतो? तुमचे व्यक्तिमत्त्व कसे आहे? तुमचे मन हळुवार आणि संवेदनशील आहे, की तुम्ही क्षुद्र, संकुचित वृत्तीच्या आणि चिडखोर आहात? तुम्ही जात्याच बुद्धिमान आहात की परीक्षेत नेहमी नापास होणाऱ्या आहात? तुमच्या अंगात काही विशेष कौशल्ये आहेत, की काहीच नाही? तुमच्या स्वतःबद्दलच्या या सर्व प्रश्नांची तुम्हाला वाटणारी उत्तरे जितकी सकारात्मक असतील, तितके तुमचे स्वतःबद्दलचे मत चांगले असेल. पण याउलट, स्वतःबद्दलची तुमची मते जर नकारात्मक असतील, तर मात्र तुमचा आत्मविश्वासही नक्कीच कमी असेल.

अर्थात, स्वतःबद्दल खूप चांगले मत असणे, आणि स्वतःच स्वतःला जसे आहोत तसे आवडणे; एवढ्यावरच हा विषय संपत नाही आणि संपूही नये. कारण आपल्यापैकी कोणीच कोणत्याच बाबतीत शंभर टक्के बरोबर नसतो किंवा १००टक्के चुकीचा किंवा अर्थशून्यही नसतो (जरी चुकणाऱ्याला कधीकधी तसे वाटले तरीही!). खरे तर प्रश्न हा आहे की, जेव्हा तुमचे वय १३ वर्षे ते १९ वर्षे यादरम्यान असते, म्हणजेच तुम्ही किशोरावस्थेत असता, तेव्हा आयुष्यातली प्रत्येक गोष्टच तुम्हाला नकारार्थी वाटत असते. म्हणूनच, तुमच्या दिसण्यापासून ते तुमच्या क्षमतांपर्यंत कोणत्याही गोष्टीबद्दल तुम्ही शंकाग्रस्त असाल आणि आपण काही फारशी चांगली व्यक्ती नाही, दिसायला अजिबात आकर्षक नाही, पुरेशा स्मार्टही नाही, असे जर तुम्हाला वाटत असेल, तर अगदी नक्की खात्री बाळगा, की तुम्ही एकदम व्यवस्थित, अगदी ठीक आहात.

पण स्वतःबद्दल फारसे चांगले मत नसणे, ही वेगवेगळ्या प्रकारे त्रास

देणारी एक समस्या असते आणि त्यामुळे स्वतःला स्वतःमुळेच त्रास होतो, वाईट वाटते. हे तर होतेच; पण आपल्या इतरांशी वागण्यावर, आपल्या आवडीनिवडींवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे तुम्ही स्वतःला आनंदी ठेवू शकत नाही. आयुष्यात जे करण्याची तुमची इच्छा आहे, ते तुम्ही करू शकत नाही आणि ज्यांच्यावर तुमचे प्रेम आहे, त्यांच्याशीही तुम्ही निष्ठुरपणे वागू शकता किंवा ज्यांना तुम्ही चक्क हाकलून दिले पाहिजे, त्यांच्या गळ्यात गळे घालून तुम्ही फिरत असता.

- तुमच्या मनात कमी आत्मप्रतिष्ठा असेल तर पुढील गोष्टी घडू शकतात
- तुम्ही कायमच स्वतःला कमी लेखत राहता.
- कोणतीही नवीन गोष्ट करून पाहण्याची तुम्हाला भीती वाटते.
- तुमच्याकडे कोणत्याच प्रकारचे कौशल्य किंवा बुद्धी नाही, अशी तुम्हाला खात्री वाटू लागते.
- कामात काहीतरी गोंधळ होईल, या भीतीने तुम्ही काम करायला तयारच होत नाही.
- स्वतःबद्दल ठामपणे काही सांगायला किंवा आपले मत मांडायला तुम्ही घाबरता.
- तुमच्या समस्यांबद्दल तुम्ही नेहमी इतरांनाच दोष देत राहता.

तुम्हाला स्वतःविषयी काय वाटते, याची काळजी करणे फारसे महत्त्वाचे नाही, असे कदाचित वाटू शकते. पण प्रत्यक्षात ते खूप गरजेचे आहे. कारण तुम्हाला स्वतःविषयी काय वाटते आणि त्या दृष्टीने कसे वागता, यावरच तुमचे पुढचे, मोठेपणीचे आयुष्य अवलंबून असते. जर या वयात तुम्हाला आपण अपात्र, कमी महत्त्वाचे आहोत असे वाटत असेल, तर नंतरच्या परिपक्व आयुष्यातही तुमच्या मनात याच भावना कायम राहतील आणि त्यामुळे तेव्हाही तुमचे वागणे आत्तासारखेच राहील. तुलनेने सांगायचे झाल्यास, जर तुम्ही स्वतःबद्दलचे मत आत्ताच सुधारू शकलात, तर त्यामुळे फक्त आत्ताच नाही; पण भविष्यातही चांगल्या गोष्टींची निवड करता येणे, चुकीचे किंवा धोकादायक वागणे कमी करणे, स्वतःविषयी शक्य तेवढा सकारात्मक विचारच करणे, यासाठी तुम्हाला खूप उपयोग होऊ शकतो. शिवाय त्यामुळे आपण अपूर्ण आहोत, अपात्र आहोत, या भावनेला तुमच्या मनात थारा मिळणार नाही आणि इतर ताणतणाव जाणवत असतानाही,

तुम्हाला जे योग्य वाटत असेल तेच करण्यासाठी तुम्हाला बळ येईल. इतरांच्या दबावाला तुम्ही बळी पडणार नाही.

अर्थात स्वतःबद्दलचे निर्भेळ मत म्हणजे 'स्वतःचे स्वतःबद्दलचे मत' या संज्ञेत अनेक गोष्टी समाविष्ट असतात. उदाहरणार्थ– आत्मविश्वास, शरीराची ठेवण, स्वतःवरचा भरवसा इ. आणि म्हणूनच, तुमच्या आसपास नेहमी कोण असते, तुम्हाला कशा प्रकारची मुले आवडतात, कोणत्या प्रसिद्ध व्यक्तींची तुम्ही प्रशंसा करता, तसेच तुमचे आई-वडील कोण आहेत, अशा विविध गोष्टींचा तुमच्या स्वतःबद्दलच्या मतावर परिणाम होत असतो. दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम, जाहिराती, डीव्हीडीज, चित्रपट, संगीत आणि मासिके यांचाही स्वतःबद्दलचे मत ठरवताना तुमच्यावर काही ना काही परिणाम होतो. पण या सर्व माध्यमांमधून निर्माण केल्या जाणाऱ्या प्रतिमा आणि कल्पना, वास्तव जीवनात अनुसरणे मात्र बहुधा अशक्यच असते. खरे तर, 'आपल्याला स्वतःबद्दल काय वाटते, या भावनांवर या सर्व गोष्टींचा परिणाम होऊ देणे मूर्खपणाचे आहे,' असा तर्कदृष्ट्या विचार करण्यास फारशा बुद्धिमत्तेची गरजच नाही. पण या बाह्यविश्वाचा आपल्या मनोविश्वावर परिणाम होऊ न देणे अशक्य असते; ही वस्तुस्थिती आहे.

'थिंक युवरसेल्फ गॉर्जियस' हे पुस्तक इथे तुमच्या मदतीला येईल. आत्ता तुम्ही कोण आहात, कशा आहात याबद्दल विलक्षण भावना तुमच्या मनात असाव्यात यासाठी खरोखरच हे पुस्तक तुम्हाला मार्गदर्शक ठरेल. तुमच्या मनातल्या नकारात्मक विचारांशी झगडताना, तुम्हीही खरोखरच कशा 'ग्रेट' आहात ते शोधायला शिकवणारे हे पुस्तक आहे. 'वयात येणे' या अवस्थेला प्रत्यक्ष कसे सामोरे जायचे, बरोबरीच्या मुलींमध्ये कसे वागायचे, क्षुद्र वृत्तीच्या मुलींना कसे तोंड द्यायचे आणि तुमच्या स्वतःच्या विश्वावर ज्यांचे नियंत्रण आहे आणि ज्यांच्यामुळे तुमच्या विचारांवर परिणाम होतो, अशा लोकांशी कसे वागायचे, यासारख्या किशोरावस्थेतील मुलीला नेहमी पडणाऱ्या प्रश्नांना कसे सामोरे जायचे, हे या पुस्तकात सांगितले आहे.

जरी वर सांगितलेल्या या गोष्टी जराशा घाबरवणाऱ्या, नाउमेद करणाऱ्या असल्या, तरीही तुम्ही स्वतःबद्दलचे मत आणखी सुधारू शकता, जास्त आनंदी राहू शकता आणि तुमची अस्वस्थताही कमी करू शकता आणि तुम्हाला वाटते त्यापेक्षा हे खूप सोपे आहे. हे पुस्तक वाचा, मग तुम्ही स्वतःलाच खूप जास्त आवडू लागाल, स्वतःचीच एक चांगली मैत्रीण बनू

शकाल. आपणही खरेच आकर्षक व सर्वोत्तम आहोत, असे तुम्हाला वाटू लागेल आणि सर्वांत जास्त म्हणजे तुम्ही खंबीर व्हाल. तुम्ही जशा आहात त्यातच तुम्हाला समाधान वाटेल आणि मुख्य म्हणजे तुमच्या हेही लक्षात येईल की, इतर लोक तुम्हाला काहीही म्हणत असले, तरी तुम्ही कशा आहात हे तुम्हालाच नेहमी जास्त चांगले माहिती असेल.

अर्थात या पुस्तकात सांगितल्याप्रमाणे वागताना हे सतत लक्षात ठेवा की, तुम्ही एक कठीण, त्रासदायक आणि वेदनादायक विषय हाताळत आहात; कारण सुंदर, आकर्षक आणि मोहक असण्याची क्षमता तुमच्यात आहे.

आरशात पाहून स्वतःलाच नाके मुरडण्याची मग गरज उरणार नाही आणि तुम्ही स्वतःलाच अगदी अंतर्बाह्य आवडू लागाल. स्वतःच स्वतःला आवडायला हवे हे शिका, आणि माझी खात्री आहे की, त्यामुळे मग तुम्ही तुमच्या कल्पनेपेक्षाही जास्त सुंदर दिसू लागाल!

❖

७वी आवृत्ती

विज्ञान जमती

डॉ. अरुण मांडे

किंमत : १००/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

विज्ञानबद्दल कुतूहल जागृत करणे हा या पुस्तकाचा हेतू आहे. या पुस्तकातले प्रयोग, लहान मुलांना करता येतील, असेच आहेत. त्यांतल्या उपकरणांसाठी कुठल्याही प्रयोगशाळेत जाण्याची गरज नाही. घरातच ती सापडतील. यांतले प्रयोग अतिशय सोपे आहेत.

विज्ञानातले मूलभूत नियम समजून घेण्यासाठी यांचा उपयोग होईल.

पुस्तक परिचय

द माईंड जिम

रिलेशनशिप्स

चांगले संबंध प्रस्थापित करण्यासाठी उत्तम मार्गदर्शन

बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये चीफ मॅनेजर, रिजनल मॅनेजर, ट्रेनिंग सेंटरचे प्राचार्य, तीन बँकांवर संचालक म्हणून काम केले.

सध्या आझेलटेक प्रा. लि., पुणे आणि अमेरिका येथे संचालक आहेत. अ. भा. सांस्कृतिक संघ, कथाभारती, डीएसके फाउंडेशन या संस्थांवर कार्याध्यक्ष आहेत. पुणे महानगरपालिकेच्या मराठी भाषा संवर्धक समितीचे सदस्य आहेत.

आत्तापर्यंत विविध विषयांवर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. आकाशवाणीवरून नभोनाट्ये सादर झाली. प्रसिद्ध नियतकालिकांमधून अनेक लेख प्रकाशित झाले आहेत. नाटकांमधून भूमिकाही केल्या. काही विषयांवर त्यांच्या ध्वनिफितीही प्रकाशित झाल्या आहेत.

पत्नी गीता भुर्के यांच्यासह विशेष लेखन व कार्यक्रमही सादर केले. देश-परदेशांत तीन हजारांवर टॉक-शो केले आहेत.

योगाभ्यास, मनाची कार्यशाळा, गिर्यारोहण, साहित्य संमेलनांमध्ये सक्रिय सहभाग.

अनुवाद
श्याम भुर्के

साहेब, ग्राहक, मित्र किंवा प्रेमिक– कुणीही असो. त्यांच्याबरोबरचे संबंध चांगले राहणे महत्त्वाचे. तुम्हाला या बाबतीत कसे यश मिळेल हे या पुस्तकात सांगितले आहे.

'माइंड जिम रिलेशनशिप्स' वापरणाऱ्या पाच लाख लोकांच्या अनुभवांवरून असे सिद्ध झाले आहे–

अधिक प्रेम प्राप्त करा, आदर मिळवा आणि तुमच्या आज्ञांचे ते पालन करोत.

विश्वास निर्माण होतो क्षणार्धात– तो वर्षानुवर्षे टिकतो.

रागातील वादावादीचे रूपांतर चिरकाल टिकणाऱ्या संबंधांत होते.

ज्यांचं इतर कोणाशीही जमत नाही त्यांच्याशी तुमचं जमणार.

तुटलेल्या संबंधांत दुरुस्ती करा. सर्वांत भक्कम संबंध जोडा.

तुम्ही हे पुस्तक पूर्णपणे वाचले नाही तरी चालेल. सुरुवातीस दिलेली प्रश्नावली सोडवा. त्यातून तुम्ही कोणती प्रकरणे वाचायची आणि कोणती सोडून द्यावयाची हे तुम्हाला समजेल.

त्याहूनही उत्तम म्हणजे तुम्हाला माइंड जिम ऑनलाइनचे मोफत सदस्यत्व प्राप्त होणार आहे. त्याच्या रॉयल्टीचे पैसे द माइंड जिम फाउंडेशनला जातील. सदर फाउंडेशन युवकांना वेगळ्या पद्धतीने विचार करायला शिकवते. जिम लहानांसाठी मोठं काम करत आहे. आम्ही तुमच्यासोबत आहोत.

(‘द माइंड जिम रिलेशनशिप्स’ पुस्तकातून...)

संबंध तुम्हाला आनंदी ठेवतात. सुखी कोण याबाबत मोठ्या प्रमाणावर एक पाहणी करण्यात आली होती. सुखी, खूप सुखी, दु:खी यामध्ये फरक करणारा एक महत्त्वाचा घटक होता. ते लोक किती श्रीमंत आहेत यावर तो अवलंबून नव्हता. ते किती सुंदर दिसतात हाही नव्हता. ते किती सकारात्मक आहेत हाही नव्हता. त्यांना दिवसाला किती चॉकलेट खायला मिळतात हाही नव्हता. ते किती लोकांमध्ये मिसळतात यावर ते अवलंबून होते. ज्यांचे अधिक चांगले संबंध, ते अधिक सुखी.

आपण आपल्या साहेबांशी कसं जमवून घेतो, आय.टी.मधील सहकारी, मुलीच्या शाळेतील शिक्षिका, आपले वकील, आपली प्रिय सहचारिणी यावर आपलं आयुष्य अवलंबून असतं. आपले संबंध जसे फुलतील तसे आपण राहणार. याबाबतीत एक चांगली गोष्ट आहे. संबंध कसे असावेत हे आपल्या हातात असतं. ते आपण अधिक फुलवू शकतो.

चमत्कारिक साहेब, विशीतले बंडखोर युवक, निराशाजनक दिवस, रागावलेली आई हे सारे कसे वागतील हे आपल्या वागणुकीवर अवलंबून असतं. आपले शब्द जपून वापरा; मग संबंध सुधारतील. पाठिंबा देणारे साहेब, आदर दाखवणारी आई दिसू लागेल. शब्द चुकले की, संबंध बिघडतील.

दुसरी एक चांगली बातमी आहे. एका व्यक्तीबरोबर संबंध सुधारण्याची आपली क्षमता ही सर्व व्यक्तींबद्दल संबंध सुधारण्यास उपयोगी ठरते. असं असूनही बहुतेक सर्व सल्लागार हे तुम्हाला मुलीला (किंवा मुलाला) कसे वश करावे हे सांगतात; परंतु जादूची गोष्ट म्हणजे एकाशी कसं जमलं हे ध्यानात घेतलं आणि तेच दुसऱ्यासाठी केलं तरी जमून जातं; त्यामुळे एकाशी नीट जमत असेल तर तुम्हाला अनेक मित्र, ग्राहक, फॅन प्राप्त होऊ शकतात (एक हवाहवासा वाटणारा प्रियकरही).

तिसरी आनंदाची बातमी म्हणजे हे प्रत्यक्षात कसं साधायचं हे या पुस्तकात सांगितलंय.

सायन्स इज सेक्सी : मानसशास्त्र आणि मनाशी संबंधित अन्य शास्त्रे ही आपले इतरांशी संबंध कसे सुधारतील हे पाहण्याची भव्य अशी अंतर्दृष्टी देतात. त्यासाठी आपली विचार करण्याची पद्धत बदलावी लागते.

काही वेळा अंतर्विचार आपणास कशाचा संशय येत होता याची आठवण करून देतो : दुसऱ्याचं भरपूर ऐका. मग तुम्ही त्यांचे आवडते व्हाल (तुम्ही वेटर असाल आणि ग्राहकानं सांगितलेली ऑर्डर शब्दशः म्हणून दाखवाल तर तुम्हाला मिळणाऱ्या टिपेमध्ये भरघोस वाढहोईल.) काही वेळा नव्या गोष्टी उघडकीस येतील; परंतु त्या फार आश्चर्यकारक असणार नाहीत. क्षमा करून टाका. मग तुम्हाला चांगली झोप लागेल. आशावादी लोक अधिक लोकप्रिय असतात. काही वेळा परिणाम हे आपल्याला वाटतात त्यापेक्षा फारच वेगळे असतात : एखाद्याला त्याचे पैसे देऊ नका, तो अधिक काळ कामावर राहील. काही वेळा अगदी छोटी गोष्ट असते. आपण विचारावे, 'कॉफी घेणार का?' त्यावर आपल्या संबंधांचे भवितव्य अवलंबून असते. त्यासाठी फार मोठी गोष्ट करावी लागत नाही (आपण कसे राहावे हे ठरवा).

अभ्यास करून उपयुक्त गोष्टी शोधून काढायची आपल्याला आवड नसते. ते करायला सवडही नसते. आपण खूप व्यग्र असतो. नेमकी इथेच माइंड जिमची आपल्याला मदत होते. त्यांच्याकडे मानसशास्त्रज्ञांचा उत्साही गट आहे. मानसशास्त्र आणि त्यासंबंधित शास्त्रे काय काय चांगलं देऊ शकतात हे ते शोधून काढतात. याचा प्रयोग पाच लाख लोकांवर करून ते तपासून घेतात. इतक्या लोकांवर हा प्रयोग करणं कसं शक्य आहे? त्याचं कारण म्हणजे द माइंड जिम हे पन्नास देशांमध्ये कार्यशाळा घेत असतं. त्यात सहभागी झालेले लोक त्यांना कार्यशाळेपासून कसा लाभ झाला हे सांगतात.

त्यात लोकप्रिय ठरलेले मार्ग पुन्हा तपासून पाहिले. ते अधिक प्रभावी बनवले आणि ते या पुस्तकात मांडले.

ते तुमचे संबंध सुधारण्यास निश्चितच मदत करतील. काही तुम्हाला लागू पडणार नाहीत. त्यासाठी पुढील पाठात एक प्रश्नावली दिलीय; ती भरा. मग कोणता भाग तुम्हाला उपयोगी आहे व कोणता भाग वगळला तरी चालेल हे पाहा.

क्षमस्व, आपली यापूर्वी भेट होऊ शकली नाही

यापूर्वी कदाचित माइंड जिमची व तुमची भेट झाली नसेल. असे असेल तर इथे माइंड जिमचा थोडक्यात परिचय करून दिलाय.

एका भोजनप्रसंगी दहा वर्षांपूर्वी माइंड जिमची कल्पना सुचली. त्या

रात्री गप्पांचे विषय होते– संगीत, फॅशन, प्रसिद्ध व्यक्ती कसे बनता येते इत्यादी इत्यादी. एकजण म्हणाला, १९८०चे दशक हे शरीरासंबंधी होते– जेन फोंडा, जॉगिंग, शाकाहाराचे प्राबल्य. १९९०चे दशक आत्म्याचे होते– फेंगशुई, योग, पर्यायी औषधे. मग पुढील दशक कोणाचे असेल असा प्रश्न पुढे आला.

एकजण म्हणाला, 'मन, शरीर आणि आत्मा.' मग क्षणार्धात सारे म्हणाले, सन २०००चे दशक हे मनाचे असेल. त्यासाठी आपण काय करू शकतो? आपण माइंड जिम काढू या.

दुसऱ्या दिवशी सहभागी लोकांची डोकी जरा जड झाली होती. आदल्या रात्रीचा उत्साह जरा कमी झाला होता. तरीही माइंड जिमची कल्पना मनात रुंजी घालतच होती. त्यातील दोघांनी वर्षभर प्रवास केला. संशोधन केलं. मानसशास्त्रज्ञांना एकत्र आणलं (त्यात एका प्राध्यापकाचाही समावेश होता. तो 'चेअर ऑफ इंटेग्रिटी' झाला.) व्यावसायिक सल्लागार आणि विचारांना चालना देणाऱ्यांनाही आमंत्रित केलं. माइंड जिम काय करू शकेल याचा अभ्यास केला.

जगभर जिममधून मनाचे व्यायाम करवून घेण्याची मूळ कल्पना होती. मंगळवारी तासभर किक बॉक्सिंग करावे, गुरुवारी वादावादी मिटवणे हा प्रयोग करावा. मान्यवर अशा जिममध्ये जाऊन आम्ही ही कल्पना उत्साहात मांडली; परंतु त्यांनी फारशी उत्सुकता दाखवली नाही.

आम्ही पुन्हा एकदा आमची योजना तपासली. माइंड जिम हे व्यावसायिक लोकांना सांगावं असं नेहमीच वाटत राहायचं. नेहमीच्या जिम मेंबर्सना जे भावतं ते कंपन्यांनाही आवडेल.

माइंड जिमने दि. १ सप्टेंबर २००० रोजी डॉईश बँकेत पहिली कार्यशाळा घेतली. त्या नव्वद मिनिटांच्या कार्यशाळेचा विषय होता 'बॉडी लँग्वेज– देहबोली'.

सुरुवातीचे काही महिने कठीण गेले. एका 'अंधाऱ्या नोव्हेंबर' महिन्यात अकाउंटंटने विचारले, 'हे यशस्वी होत नाही हे कळेपर्यंत तुम्ही किती तोटा करणार आहात?' आम्ही त्याचे आभार मानले आणि पुन्हा जोमाने कामाला लागलो.

त्यानंतर जगातील चाळीस देशांतील पाच लाखांहून अधिक लोकांनी

६वी आवृत्ती

मंतरलेले बेट

व्यंकटेश माडगूळकर

किंमत : १२०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

जन्माला यावे, ते एखाद्या रम्य बेटावर. हे भाग्य मला लाभले.
न्यूयॉर्कमधल्या 'मॅनहटन' या रम्य बेटावर माझा जन्म झाला.
'मॅनहटन' म्हणजे एक लहानसे जगच होते.
अशा या जगात मी जन्माला आलो आणि
अगदी सुरुवातीपासून त्याच्यावर माझा जीव जडला.
कळू लागल्यापासून मला वाटू लागले की,
हे गाव माझे आहे आणि मी या गावचा आहे.
...आणि मग या माझ्या गावात मोकळ्या अंगाने कुठेही हिंडायला
मला कधी काही वाटले नाही.
मन मानेल तसे भटकावे, पाहिजे ते बघावे,
पाहिजे त्याची चौकशी करावी. अर्थात नाकळता होतो
तेव्हा मी फार लांब भटकत नव्हतो;
पण लवकरच मी कळता झालो.
धीट झालो आणि न्यूयॉर्कची गल्लीन्‌गल्ली पालथी घातली.

माइंड जिमचा लाभ घेतला. त्यावरील पुस्तकांची मालिका अभ्यासली. त्यातील हे तिसरे पुस्तक एकूण सत्तावीस भाषांमधून प्रसिद्ध झालं.

वेगळ्या मार्गाने विचार करायचं तंत्र माइंड जिम फाउंडेशनने तरुणांपर्यंत नेलं. या पुस्तकातून मिळणारं उत्पन्न या कारणासाठी वापरलं जातं. आपल्या सहकार्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

असे अनेक विषय पुढे येणार आहेत. तुरुंगातील लोकांसाठी, एकाकी जीवन जगणाऱ्या खलाशांसाठी, दुसरा संबंध सुरू करणाऱ्यांसाठी माइंड जिम निर्माण करणार आहोत. असे किती विषय पुढे येतील हे मला सांगता येत नाही. मन विकसित करणाऱ्या या प्रयोगात तुम्हाला सहभागी व्हायचं असेल तर तुम्ही मोफत सदस्य म्हणून तुम्हाला दिलेला पासवर्ड वापरून माइंड जिम ऑनलाइनचा लाभ घ्या. तो पासवर्ड या पुस्तकातील मुखपृष्ठाच्या आतील पानावर दिला आहे.

आपला सोबती म्हणजे स्वर्गसुख

सोबत्याबरोबर राहणं म्हणजे स्वर्गसुख अनुभवणं यात चांगला उद्देश आहे; पण अनेकदा प्रत्यक्षात वेगळाच अनुभव येतो.

तुम्ही एका भव्य पुस्तकाच्या दुकानात उभे आहात. स्क्रीनवर पुस्तकांचे परीक्षण पाहत आहात. त्यातून पुस्तकाचा सारांशही जाणून घेत आहात. मग कदाचित पुस्तक खरेदी करायला लागायचं नाही. अशा वेळी पाच गोष्टींकडे लक्ष द्या.

१. मला सुरक्षित राहू दे

आपण सुरक्षित असावं, आपल्यावर प्रेम करावं, आपलं कौतुक व्हावं अशी मनाच्या तळाशी किंवा काही वेळा वरवरची तरी इच्छा असते. जर परस्परसंबंध चांगले नसतील तर एकाला किंवा दोघांनाही सुरक्षित वाटत नाही. दोघांनाही असुरक्षित वाटण्याची शक्यता अधिक, तेव्हा त्यांना ते कोण आहेत याची जाणीव करून द्या. ते सुरक्षित राहू शकतात याची कारणे सांगा.

एकदा एक प्रयोग करण्यात आला. विद्यार्थ्यांना एका परीक्षेला बसवण्यात आलं. नंतर कोणत्या विद्यार्थ्यांची क्षमता अधिक आहे हे शिक्षकांना विचारलं. मग परीक्षक शाळेतून बाहेर गेले ते एक वर्षाने परत आले. तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की, ज्या विद्यार्थ्यांना भावी तारे म्हणून

निवडले होते त्यांची प्रगती चांगली होती. इतर मुलांच्या तुलनेने त्यांच्या गुणांत चांगली वाढझाली होती. त्यांचा इंटलिजंस कोशंट म्हणजे बुद्ध्यांक – जो नेहमी स्थिर राहायचा तो चांगलाच वाढला होता.

मुलांमधील प्रचंड क्षमता आणि त्यांना प्राप्त झालेले गुण यांचा प्रत्यक्ष संबंध नव्हता हे शिक्षकांच्या ध्यानात आले नाही. ही परीक्षा कोणत्याही मुलांबाबत घेतली होती. यावरून असे लक्षात येईल की, एखादा चांगलं काम करू शकेल असा आपण विश्वास टाकला तर तो तसं करतो आणि अविश्वास दाखविल्यास तो अयशस्वी होऊ शकतो.

तुमच्या प्रेमिकेमध्ये, साहेबांमध्ये किंवा धाकट्या भावामध्ये चांगल्या गोष्टी असल्याची कल्पना करा; मग तुम्हाला नातं सुधारल्याचं ध्यानात येईल.

२. तंदुरुस्त राहा

नातं दृढराहण्यासाठी आपण तंदुरुस्त हवे. हे फक्त शरीरानं, आकारानं नव्हे. त्याचा उपयोग होतोच; पण मनानेही तयार राहा (त्यासाठी माइंड जिम उपयोगी आहेच.) नातं सुधारण्यासाठी दोघांपैकी किमान एकाचा उत्साह टिकून राहायला हवा; त्यामुळे कृतीपूर्वी तो विचार करू शकतो. निरुपयोगी भीतीवर नियंत्रण ठेवू शकतो, आपण गृहीत धरलेल्या गोष्टींत बदल करू शकतो. दिवसभराच्या कष्टप्रद कामानंतर थोडे जादा प्रयत्न करू शकतो. चांगले संबंध राखण्यात स्वत:चा उत्साह आणि नियंत्रण यांना विशेष महत्त्व आहे.

३. ही एक पद्धत आहे

हे पुस्तक वाचा. सद्यस्थितीत वापरण्यासारख्या शेकडो युक्त्या तुम्हाला आढळतील. मतभेदाची दरी वाढू नये म्हणून काय करायचं, शब्दामागील खरा अर्थ कसा समजायचा, वेगानं विश्वास प्राप्त करायला काय करायचं, तुम्ही मागितलेली क्षमा त्याने स्वीकारण्यासाठी काय करायचं हे समजेल.

तसंच लक्षात घ्या की, नातं हे प्रसंग किंवा काही शब्दांपेक्षाही अधिक काही आहे. अनेक कृतींच्या मालिकेतून ते निर्माण झालंय. प्रत्येक कृतीचा त्यावर परिणाम होतो. आपल्या प्रथम भेटीचा परिणाम पुढील संभाषणांवर होतो. आपल्या प्रथम भेटीवर आपल्या ई-मेलला उत्तर येणार की नाही हे अवलंबून असतं.

असे हजारो प्रसंग असतात की, त्यावर आपले संबंध ठरतात. अनेक

भागांनी जोडलेल्या गोष्टींतील काही भागच आपणास एका वेळी दिसत असतो; त्यामुळे पद्धतशीरपणे संबंधांचा विचार करण्यामुळे आपला संयम वाढतो. समज वाढते. आता काय करावं हे समजतं.

४. अनेक नाती

माइंड जिमच्या एका सदस्याने जिमचे व त्याचे संबंध कसकसे बदलले ते सांगितलंय. प्रथम तो तिचा ग्राहक होता. मग कर्मचारी, प्रेमी, पती, मुलीचा बाप, माजी नवरा, व्यवसायातील गुंतवणूकदार अशा नात्यांतून पुढे गेला. आता तो तिला व्यवसाय मिळवून देण्याचं काम करतो.

आपल्याला एवढ्या नात्यांतून जावं लागत नाही. तरीही ऑफिसमध्ये किंवा फ्लॅटसोबत्याशी प्रेमसंबंध जुळणं शक्य असतं.

विविध प्रकारच्या विचारांतून फिरणे ज्याला जमते तो एकाच व्यक्तीशी अनेक नाती ठेवू शकतो किंवा एकच नाते अनेक व्यक्तींशी ठेवू शकतो. आपण मात्र ठाम राहायला हवं (त्यासाठी शेवटचा धडा वाचा 'नवी सुरुवात'). माझ्यातील अनेक भूमिकांचं स्वागत करायला हवं. कामाच्या वेळी मी कसा आहे, माझ्या मित्रासमवेत कसा राहतो, आईबरोबर कसा वागतो इत्यादी केव्हा आणि कसं जुळवून घ्यायचं यात खरी हुशारी असते.

५. आपल्या विचारांप्रमाणे आपण निवड करतो

आपण कल्पना करतो त्यापेक्षाही आपण विचार कसा करतो यावर आपली निवड अवलंबून असते. ही माइंड जिमची शिकवणूक आहे. मनाच्या सवयीमध्ये अडकणं सोपं असतं– मी शीलाला पाहिलं की, मला जांभई येते. मी जेव्हा खायला काय आहे विचारतो तेव्हा तू दिवसभर काय करत होतास?– विचारलं जातं. एखादी बाई रडतेय म्हणजे ती दुःखी आहे असं मी समजतो.

ही सगळी अनुमानं योग्य वाटत असली तरी तीच असतील असे नाही. ती बाई रडतेय म्हणजे सुटकेमुळे, आनंदाने असू शकेल. ती अभिनय करत असेल. तिच्या डोळ्यांत काही गेल्यामुळेही असेल.

आपल्याला नेहमीच निवड करण्याची संधी असते. निवडीमुळे नियंत्रण वापरावे लागते. या नियंत्रणामुळे जबाबदारी येते.

आपल्या संबंधाला आपण शंभर टक्के जबाबदार असतो. काहींना हे संबंध म्हणजे अधिक पडलेलं तापदायक काम वाटतं; पण तसं वाटणं हा

त्यांचा दोष आहे. मी काहीही गैर करत नाही हा विश्वास बाळगा. इतरांनाही कसं वागायचं याचं स्वातंत्र्य आहे– मी एकटाही नातं सुधारू शकतो.

या स्वातंत्र्याच्या कल्पनेमुळे तुम्ही आनंदून गेला असाल तर पुढील भाग वाचा. तुमच्या मनाला कसं शिक्षण द्यायचं ते पाहा. मग तुमचं नातं प्रगतीपथावर जाईल, आनंददायी होईल, तुमच्या इच्छा पूर्ण होतील.

❖

आवाहन

पुस्तक वाचताना वाचक त्या पुस्तकाशी एकरूप झालेला असतो. काही वेळेला तर तुमच्या जीवनाला कलाटणी देण्याचं सामर्थ्य एखाद्या पुस्तकामध्ये असतं. आम्ही नेहमीच वाचकांना दर्जेदार पुस्तकं वाचण्याचा आनंद दिला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचं असंच एखादं तुम्हाला आवडलेलं, भावलेलं पुस्तक असेल तर त्या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय आम्हाला साधारण ५०० ते ८००शब्दांत लिहून कळवा. अभिप्रायाबरोबर आपला संपूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर देण्यास विसरू नये. ते पुस्तक आपल्याला का आवडलं ते लिहायचं आहे. आपल्या अभिप्रायाचं स्वागत असेल. यासाठी मानधनही दिलं जाईल. अभिप्राय छापण्याबाबतचा अधिकार संपादकांच्या अधीन राहील. त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि अस्वीकृत अभिप्राय परत पाठवला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात दूरध्वनी-वरून कोणीही संपर्क साधू नये. आपला अभिप्राय आमच्या या ई-मेलवर mmgj@mehtapublishinghouse.com किंवा खालील पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने पाठवावा.

मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ३०.

पुस्तक परिचय

ललितकलेच्या रुईवाड्यात

एक उत्कृष्ट नेपथ्यकार अशी पुरुषोत्तम श्रीपती काळे यांची ओळख होती. त्यांचं बालपण वाई येथील मेणवलीत व्यतीत झालं. बेचाळीस नाटकं, एकवीस चित्रपट, असंख्य लँडस्केप्स...येवढं काम एक नेपथ्यकार म्हणून त्यांच्या नावावर जमा आहे. ललितकलादर्श या नाट्यसंस्थेसाठी आणि राजकमल चित्रमंदिर या व्ही. शांताराम यांच्या चित्रपट संस्थेसाठी त्यांनी नेपथ्यकार म्हणून संख्यात्मक आणि गुणात्मक योगदान दिलं. ललित-कलादर्श संस्थेच्या 'सत्तेचे गुलाम,' 'पुण्यप्रभाव', 'सुवर्णतुला', 'पंडितराज जगन्नाथ', 'आंधळ्यांची शाळा' इ. नाटकांचे नेपथ्य त्यांनी केले, तर राजकमल चित्रमंदिरच्या डॉ. कोटणीस, अमरभूपाळी, झनक झनक पायल बाजे, सुबह का तारा, नवरंग इ. चित्रपटांसाठी त्यांनी नेपथ्य केले. नाट्यकलाप्रवर्तक, नाट्यनिकेतन इ. अन्य संस्थांसाठीही त्यांनी नेपथ्यकार म्हणून काम केले. पुण्याचे बालगंधर्व रंगमंदिर आणि उद्यानप्रासाद कार्यालय, मुंबईचे रवींद्र नाट्य मंदिर आणि श्रीनंद नाट्यगृह या वास्तूंचेही नेपथ्य त्यांनी केले. ज्या काळात तंत्रज्ञान फारसे प्रगत नव्हते त्या काळात रंगभूमीवर पावसाचा, मोटारीपासून रेल्वेच्या डब्यापर्यंत सगळ्या वाहनांचा इफेक्ट पु. श्री. काळे प्रभावीपणाने आणि कल्पकतेने देत होते. आत्महत्येसारखे प्रसंग रंगभूमीवर केवळ काळ्यांच्या नेपथ्यामुळे वास्तवतेने साकारत होते. पडदा उघडल्यावर स्टेजवर एकही कलावंत नसताना केवळ त्यांच्या नेपथ्याला प्रेक्षकांकडून दाद मिळत असे. १९७३मध्ये त्यांना विष्णुदास भावे सुवर्णपदकाने गौरविण्यात आले होते. त्यांना लेखनाचंही चांगलं अंग होतं.



पु. श्री. काळे

नाट्य- चित्रकलेच्या प्रांतात यश आणि प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या अनेक व्यक्ती 'पुश्रीं'च्या सहवासात आल्या. त्यात केशवराव भोसले ('ललितकलादर्श'चे मालक), बापूराव कोल्हटकर ('ललितकलादर्श'चे उत्तराधिकारी), सवाई गंधर्व (रामभाऊ कुंदगोळकर), नारायणराव राजहंस (बालगंधर्व), मामा वरेरकर (लेखक), बाबूराव पेंटर (चित्रकार), गोविंदराव टेंबे (पेटीवादक), बशीरखाँ (गायक), गोपाळराव गो. फाटक, बाबूराव देवभक्त. अशा कलेच्या प्रांतात विहरत असलेल्या दिग्गजांचे व्यक्तिचित्रच 'पुश्रीं'नी नेमक्या आणि मोजक्या शब्दांत व्यक्त केले आहे. या व्यक्तिचित्रणात त्या त्या व्यक्तीचे गुण दिलखुलासपणे वर्णिले आहेत, तसेच दोषही लपविले नाहीत; तेही परखडपणे स्पष्ट केले आहेत. या सर्व महान व्यक्तींच्या आवर्जून जपलेल्या आठवणी, किस्से थक्क करणारे आहेत...

मध्यान्ह आणि अस्त!

महात्मा गांधींनी १९२१ साली एक कोटी रुपयांचा लोकमान्य टिळक स्वराज्य फंड जमा करण्याचा संकल्प केला. निरनिराळ्या प्रांतांतून फंड गोळा करण्याचे काम सुरू झाले. मुंबईच्या कमिटीने 'गंधर्व' आणि 'ललितकला' या दोन कंपन्यांच्या संयुक्त प्रयोगाची अभिनव योजना आखून फंडास मदत करण्याचे योजिले. आणि त्यासाठी मुंबईहून डॉ. वेलकर, डॉ. साठे, दामोदर सांवळाराम यंदे ही मंडळी नारायणराव राजहंस यांना घेऊन पुण्यास केशवरावांकडे आली. केशवरावांनी त्या योजनेस आनंदाने संमती दिली.

'मानापमान' हा खेळ करण्याचे ठरले. मुंबईचे बालीवाला थिएटर घेण्यात येऊन पहिल्या रांगेचे तिकीट शंभर रुपयांचे ठेवले गेले. शेवटचा दर अडीच रुपये ठेवावा, असे नारायणराव व गणपतराव बोडस यांचे म्हणणे होते. पण केशवराव आणि शितूत यांनी शेवटचा दर पाच रुपये ठेवावा, असा आग्रह धरला आणि तो दर कायम केला गेला. दोन्ही बाजूंच्या नटवर्गांची यादी तयार झाली.

केशवराव : धैर्यधर
नारायणराव : भामिनी
चाफेकर : अक्कासाहेब
बोडस : लक्ष्मीधर
वालावलकर : विलासधर
रानडे : कुसुम

ही मुख्य पात्रे ठरली. इतर पात्रांची योजना करण्याच्या प्रसंगीं गणपतराव बोडसांनी विनोदाने एक सूचना केशवरावांना केली. ते म्हणाले, ''आमच्याकडे चोर भरपूर आहेत. शिपाई तेवढे तुमचे घेऊन या म्हणजे झाले!''

नाट्येतिहासात गाजलेला तो संयुक्त प्रयोग तारीख ८ जुलै १९२१ रोजी बालीवाला थिएटरमध्ये झाला. त्या दिवशी सायंकाळी साडेसात वाजता नाटकास सुरुवात झाली. नाटकाची सर्व दरांची तिकिटे अगोदरच संपली होती. आणि थिएटरचा कोनान्कोपरा प्रेक्षकांनी भरून गेला होता. त्या दिवशीच्या प्रेक्षकवर्गाच्या उत्साह-समुद्राने पौर्णिमेच्या भरतीसही लाजविले

असेल. जी गोष्ट घडून यावी, जी गोष्ट पाहण्यास मिळावी म्हणून नाट्योत्सुक मंडळीत नुसती चर्चाच चालावयाची आणि कल्पनेतील रम्य चित्रे रंगवून मनाचे समाधान करून घ्यावयाचे ती गोष्ट, तो नाट्यप्रयोग त्या दिवशी प्रेक्षकांना दिसणार होता. त्या दिवशीचा तो प्रयोग पाहण्याची उत्कंठा असलेले हजारो प्रेक्षक जागेच्या अभावी हळहळत परत गेले. नाट्यशताब्दी महोत्सवाप्रमाणे उघड्या आणि विस्तीर्ण मैदानात जर त्या दिवशीचा प्रयोग झाला असता तर एक लाख रुपये तरी उत्पन्न खास झाले असते.

नाटकास सुरुवात झाली. रंगभूमीवर धैर्यधराचा प्रवेश होण्याची वेळ येऊन 'तो पहा धैर्यधर' असे म्हणून विंगेकडे बोट दाखविले गेल्यापासून प्रत्यक्ष धैर्यधर स्टेजवर येईपर्यंत आणि आल्यावरही प्रेक्षकांकडून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होत होता. कोणाला थिएटर कोसळून पडेल की काय अशीच भीती वाटावी. केशवरावांनी आपला खडा स्वर 'माऽऽता' असे म्हणून लावला तेव्हा प्रेक्षकात विलक्षण शांतता पसरली. त्यांचे ते पद– तेच काय, एकूण एक पदे चढत्या श्रेणीने रंगलीं. 'रणगगनसदन,' 'झाले युवति मना,' 'अनार्या खास,' 'धि:कार मन साहिना' ही पदे तडफदार तर वठलीच, परंतु 'वन्स मोअर'च्या तडाख्यातून एकही पद सुटले नाही. 'धि:कार मन साहिना' या पदाने सात वेळा केशवरावांना स्टेजवर आणले! 'या नवनवलनयनोत्सवा' हे पद नुसत्या सुरावटीने- तान न घेता म्हणावयाचे असे स्टेजवर जाण्यापूर्वीच केशवरावांनी ठरविले होते. पण त्याही पदाला प्रेक्षकांनी सारख्या टाळ्या वाजवून ते पुन्हा म्हणावयास लावले. 'चंद्रिका', 'दे हाता', 'भालीं चंद्र असे धरिला' ही पदे गायकीचीच; तेव्हा केशवरावांनी त्या पदांत आपले सारे गानकौशल्य पणास लावून ती पदे इतकी रंगविली की, त्या प्रयोगाच्या गाण्यांची प्रेक्षकांना जन्मभर आठवण राहील.

पेंढारकर ऑर्गनवर होते. त्यांना केशवरावांच्या गाण्यांतील लकबी, हरकतींच्या जागा वगैरेंची पूर्ण माहिती असल्यामुळे त्यांची योजना केशवरावांनी मुद्दामच साथीसाठी केली होती. पेंढारकरांनी साथ चांगलीच केली. पण सारंगीवाल्याची आणि तबलजीची अक्षरश: त्रेधा उडाली.

आपले सहकारी मित्र नाराणराव यांच्याबद्दल केशवरावांना आदर होता. स्पर्धाही होतीच. पण त्यात जोडीदाराबरोबर खेळीमेळीचा सामना देण्याची निर्वैर खुशी प्रामुख्याने होती. नारायणरावांनीही त्या दिवशी आपल्या सुरेल आणि सहजसुंदर गायनाने आणि मोहक अभिनयाने प्रेक्षकांना तृप्त केले.

भामिनीचे त्यांचे काम हातखंडाच होते. त्यातून केशवरावांसारखा धैर्यधर पुढे उभा. त्यांनी आपल्या अभिनयकौशल्याची आणि निसर्गदत्त गोड आवाजातल्या स्वयंस्फूर्त अशा गायकीची कमाल केली. समोरासमोरच्या गायनप्रसंगी मात्र त्यांच्या गानकौशल्याचे तेज केशवरावांपुढे पडणे कठीणच झाले. आणि 'झाले युवति मना' हे केशवरावांचे द्रुतगतीचे, त्यांच्या खटकेबाज तानांनी आणि निरनिराळ्या हरकतींनी भरलेले पद अनेक 'वन्समोअर' घेऊन केशवराव विंगेमध्ये गेले तेव्हा तर 'मला मदन भासे' या नारायणरावांच्या पदाच्या वेळी प्रेक्षकवर्ग बाहेर पडू लागला. त्यांची 'धनराशी जातां', 'खरा तो प्रेमा' वगैरे पदे फारच रंगली होती.

चौथ्या अंकातील तंबूच्या सीनमधील भामिनी–धैर्यधराचा मनोहर संवाद आणि भामिनीचे धैर्यधराविषयीचे आत्यंतिक निष्ठाप्रकटन धैर्यधराचे जोडे उचलण्याच्या कमाल मर्यादेपर्यंत जाते त्या वेळच्या नाटककाराने लिहिलेल्या संवादांव्यतिरिक्त प्रत्यक्ष उभयतांच्या सहृदयतेने जो प्रासंगिक संवाद उद्‌भूत झाला आणि अभिनय केला गेला तो, अशा दोन जागा अत्यंत बहारीच्या झाल्या. नारायणरावांनी आपले जोडे उचलू नयेत, अशाविषयी केशवरावांनी परोपरीने आपली इच्छा व्यक्त करूनही नारायणरावांनी ते ऐकले नाही!

सायंकाळी साडेसात वाजता या ऐतिहासिक महत्त्वाच्या खेळाची सुरुवात झाली आणि तो रात्री अडीच वाजेपर्यंत चालला होता.

त्या प्रयोगाची तिकिटे मिळाली नाहीत असे शेकडो प्रेक्षक त्या रात्री पावसाच्या माऱ्यात रस्त्यावर उभे राहून केशवरावांच्या गाण्यांचा आस्वाद घेण्यासाठी धडपडत होते. दोन्ही बाजूंनी येणाऱ्या ट्रॅम्सना पुढे वाट न मिळाल्यामुळे परत फिरावे लागले, इतकी गर्दी बालीवाला थिएटरसमोर झाली होती.

केशवरावांचे उच्च सुरांतील आरोह-अवरोह, खटकेबाज तानांची कसरत आणि भरदार ललकारी थिएटरच्या बाहेर जमलेल्या प्रेक्षकांना स्पष्ट ऐकू जात होती. मध्यंतरात मुंबईच्या फंड कमिटीतर्फे प्रमुख लक्ष्मीदासराव तेरसी, डॉ. वेलकर, डॉ. साठे वगैरे मंडळीनीं स्टेजवर येऊन दोन्ही कंपन्यांचे आभार मानले. आणि केशवराव व नारायणराव यांच्या नाट्यगुणांची प्रशंसा केली. बालीवाला थिएटरचे व्यवस्थापक मि. बिलिमोरिया यांनीं त्या दिवशीच्या थिएटर भाड्याची सर्व रक्कम स्वराज्य फंडाच्या थैलीत आणून टाकली. टिळक स्वराज्य फंडासाठी योजिलेला तो

७वी आवृत्ती

A METHODICAL ENGLISH GRAMMAR

G. D. Moray



किंमत : ४९५/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

मराठी मुलं इंग्रजी या विषयापासून, का, कोण जाणे, सतत दूर राहतात. त्यांच्या मनांत इंग्रजीविषयी एक अनामिक भीती वसत असते.

इंग्लिशमधे संभाषण करतानाही ती बिचकतात. परिणामी स्पर्धात्मक परीक्षांमधे त्यांची सतत पीछेहाट होताना दिसते. याचं मुख्य कारण म्हणजे, इंग्रजी व्याकरणाबद्दल असलेली नावड आणि एकूण इंग्रजीबद्दल मनात घर करून बसलेला भयगंड. ही नावड नाहीशी व्हावी, म्हणून; आणि या भयगंडावर मात करता यावी, म्हणून विद्यार्थ्यांच्याच दृष्टिकोनातून व्याकरणाच्या अध्ययन-अध्यापनाची एक नवी पद्धती (Method) विकसित करून, हे पुस्तक सिद्ध करण्यात आलं आहे. यातील प्रत्येक विभाग अत्यंत कष्टपूर्वक संपादित करण्यात आला आहे.

शिवाय मराठी भाषेत विस्तारपूर्वक स्पष्टीकरण देऊन, पारिभाषिक शब्दांचा अडथळा दूर करण्यात आला आहे. सोप्या सोप्या उदाहरणांच्या साहाय्यानं इंग्रजी हा विषय सुलभ व रोचक करण्यात आला आहे.

माध्यमिक शाळा, ज्यूनिअर कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी व विशेषकरून स्पर्धात्मक परीक्षार्थी व इंग्रजीचे अभ्यासक या सर्वांना हा ग्रंथ सतत हाताशी ठेवावासा वाटेल.

प्रयोग झाल्यानंतर आणखी एक संयुक्त 'मानापमान' करण्याचे दोन्ही कंपन्यांनी ठरविले होते. पण शंकरराव मुजुमदारांनी त्या प्रयोगाच्या बाबतीत एक हजार रुपयांची मागणी केल्यामुळे दुसरा संयुक्त प्रयोग 'सौभद्र' ठरला.

'सौभद्र' नाटकात अर्जुनापेक्षा सुभद्रेच्या गायनाभिनयास अधिक वाव असल्यामुळे त्या दिवशी साहजिकच नारायणरावांच्या गुणांचे अधिक प्रदर्शन झाले. त्यांच्या गायनाची छाप प्रेक्षकांवर अधिक पडत गेली. त्यांनी 'सौभद्रा'तील प्रत्येक पद त्या दिवशी अत्यंत बहारीचे रंगविले. केशवरावांनीं 'कांते फार तुला' हें पद गाऊन आपल्या करामतीस सुरुवात केली. पण खरी मजा 'माझ्यासाठी तिने अन्न वर्जियेले' या अभंगाला आली. त्या एका अभंगाने त्यांनी आपले गुणवर्चस्व प्रस्थापित करून 'सौ सुनार की और एक लुहार की' या म्हणीचा उत्तम प्रत्यय आणून दिला.

पहिल्या संयुक्त 'मानापमान'ने अदमासे सोळा, साडेसोळा हजार रुपये टिळक स्वराज्य फंडास दिले. आणि दुसऱ्या संयुक्त 'सौभद्रा'चे नऊ हजार रुपये दोन्ही कंपन्यांनी सारखे वाटून घेतले. नारायणरावास त्या वेळी पुष्कळ कर्ज होते, हे केशवरावांना माहीत होते. तेव्हा केशवराव म्हणाले, ''नारायणराव, कर्जाची काही फिकीर करू नका. आपण असे संयुक्त प्रयोग ठिकठिकाणी करू आणि हां हां म्हणतां कर्ज फेडून टाकू!''

संयुक्त खेळाचे प्रचंड यश संपादून केशवरावानी आपल्या योग्यतेची जाणीव महाराष्ट्राला करून दिली आणि इथेच त्यांची इतिकर्तव्यता झाली. त्यांचे अवतारकार्य संपले. त्यांना विषमज्वराने गाठले आणि त्यांनी बिछाना धरला. मुंबईचे सुप्रसिद्ध धन्वंतरी डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर व पुण्याचे डॉ. व्ही. डी. फाटक हे अष्टौप्रहर त्यांच्या सन्निध होते. मुंबईची आपली प्रॅक्टिस टाकून केशवरावांच्या आजारात सतत त्यांच्या शेजारी राहून डॉ. भडकमकरांनी केशवरावांवरील आपली आत्यंतिक भक्ती व्यक्त केली.

सतरा-अठरा दिवस ते विविध उपचार करीत होते. केशवरावांच्या प्रकृतिमानाचे वृत्त वृत्तपत्रांतून जाहीर केले जात होते. अनेक स्नेहीसोबती, हितचिंतक त्यांना भेटण्यास येत होते. 'केशव आजारी आहे' हे ऐकताच कोल्हापूरचे शाहूमहाराज त्यांना पाहण्यास मुद्दाम आले. शनिवारवाड्यासमोरील केशवराव पडून होते ते बेगाळे यांचे घर जुन्यापुराण्या पद्धतीचे, अरुंद जिन्याचे असे होते. शाहूमहाराजांची स्वारी

कशीबशी वर आली. अशक्तपणामुळे केशवराव फारसे बोलू शकले नाहीत. केशवरावांची आप्तेष्ट मंडळी व कंपनीतील सर्व मंडळी त्यांच्या तैनातीत अखेरपर्यंत होती. रघुनाथ, शितूत हा सदैव त्यांच्या सन्निध असे. आणि तेही जे काही लागेल ते त्यालाच सांगत.

दिवस जात होते तो तो त्यांची शक्ती क्षीण होत चालली होती. पराकाष्ठेचे डॉक्टरी प्रयत्न चालू होते; पण आयुष्याची दोरीच बांधण्याचे कार्य मानवी धन्वंतऱ्याकडून कसे होणार? अमृताच्या घोटानेच होणारे कार्य इतर औषधींना कसे साधणार?

शेवटी ४ ऑक्टोबर १९२१ रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास केशवरावांनी आपली जीवनयात्रा संपविली आणि 'केशवराव पुन्हा रंगभूमीवर दिसणार नाहीत' ही जाहिरांतीतली छापील घोषणा अशा रीतीने पूर्ण केली! ज्यांच्या नाट्य आणि गायनकलेने महाराष्ट्रास झुलविले आणि ज्यांच्या गुणांचे कौतुक महाराष्ट्राने केले तो सर्वांचा आवडता संगीतसूर्य त्या दिवशी अस्तास गेला.

केशवराव निवर्तल्याची बातमी हा हा म्हणता पुणे शहरभर पसरली. त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी हजारो लोक धावत आले; आणि ते सर्व त्यांच्या अंत्ययात्रेबरोबर होते. केशवरावांना अकाली परंतु असे मरण लाभले. लकडी पुलाकडील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवास अग्नी देण्यापूर्वी शिवराम महादेव परांजपे व नरहर गणेश ऊर्फ बन्याबापू कमतनूरकर यांनी भाषणे करून त्यांच्याविषयीची आपली भक्ती आणि त्यांची योग्यता उचित शब्दांनी व्यक्त केली. आजारी पडण्यापूर्वी केशवरावांनी ज्या शेवटच्या भूमिका केल्या, त्याही विलक्षण योगायोगानेच, असे दिसते. तारीख ३१ ऑगस्ट १९२१ रोजी त्यांनी 'शाकुंतल'मधील दुष्यंताची भूमिका केली आणि १ सप्टेंबर रोजी 'शहाशिवाजी'तील शिवाजीची भूमिका केली. एक भूमिका आद्य नाटककार किर्लोस्कर यांच्या पहिल्या नाटकातील नायकाची आणि दुसरी भूमिका कशेवरावांनी बसविलेल्या शेवटच्या नाटकातील नायकाची!

'शारदा' नाटकातील शारदेच्या भूमिकेतले 'मूर्तिमंत भीति उभी' या पदातील करुण स्वर किंवा 'मृच्छकटिक' नाटकातील 'काय वधिन मी सुमति', आणि त्याहीपेक्षा जास्त हृदयस्पर्शी, डोळ्यांवाटे अश्रूंच्या धारा

वाहावयास लावणारे 'बाळा घालुनिया गळां, रक्त सुमनांच्या माळा' या पदातील हृदय गदगदवून सोडणारे शोकपूर्ण आलाप, त्यांच्या कंठातून निघालेले, त्यांच्या मृत्युमुळे त्या दिवशी हजारो प्रेक्षकांच्या कानी घुमत राहिले असतील! 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' नाटकातील 'भान हरी हा मोहि नयना मना' हे पद आठवून 'नयनांत खेळे, श्रवणात बोले, हृदयात डोले प्राणसखा हा!' अशी स्थिती कित्येकांची झाली असल्यास मुळीच नवल नाही. 'मृणालिनी'च्या वेषात त्यांची सुंदर दिसणारी तनुयष्टी, त्यांची ठसकेदार संभाषणशैली आणि निरनिराळ्या श्रवणमधुर रागदारीच्या चालींनी नटवलेली पदे गात असलेली त्यांची सुबक मूर्ती प्रेक्षकांच्या हृदयात दीर्घ काळपर्यंत अढळ राहिली असेल. अनेकांच्या मनात अनेक आठवणी त्या दिवशी उद्‌भूत झाल्या असतील. निरनिराळ्या नात्यांनी जखडलेल्या अनेक आप्तेष्टांमधला प्रेमळ तंतू, आश्रितांचा आश्रयदाता, गुणी आणि कलावंतांचा रसिक वाली, रंगभूमीचा एक तेजस्वी सेवक, ललितकलेचा कंठमणी, असा हा अष्टपैलू हिरा त्या दिवशी काळाने हिरावून नेला. ज्याच्या गायनकलेने महाराष्ट्र रंगभूमी तप- दीड तप अत्यंत आल्हाददायी पण तेजस्वी प्रकाशात चमकली तो संगीतसूर्य त्या दिवशी अस्तास गेला. संयुक्त 'मानापमान' नाटकाच्या दिवशी माध्यान्ही गेलेल्या आणि क्षणकालात अस्तास गेलेल्या या तेजोभास्करास अखेरचे अभिवादन करण्याचे भाग्य मला लाभले नाही, हें माझे दुर्दैव!

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

❖

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी
जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

५वी आवृत्ती

कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी

योगसाधना

बिजयालक्ष्मी होता

अनुवाद

अरुंधती महाम्बरे

किंमत : ८०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

'कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना' हे पुस्तक म्हणजे निरोगी प्रकृतीसाठी योग्य मार्गदर्शक होय. विशेषत: ज्या लोकांचे कार्यबाहुल्यामुळे स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते त्यांच्यासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरते.

निरोगी प्रकृतीचे रहस्य काय?

निद्रा, व्यायाम, विश्रांती ह्यांचे योग्य प्रमाण, पोषक आहार, शरीरांतर्गत स्वच्छता, हानिकारक व्यसनांपासून दूर राहणे, मन तणावमुक्त राखणे ह्या सर्वांची फलनिष्पत्ती म्हणजे निरोगी प्रकृती.

हे निरामय जीवन साध्य करण्यासाठी योगासने, प्राणायाम, षट्कर्म (शुद्धितंत्र), योगनिद्रा आणि ध्यानधारणा ह्यांचा अवलंब करणे अटळ आहे.

ही योगसाधना कोणालाही आचरणात आणता येईल अशी साधी, सहज असून रोजच्या दिनक्रमातही तुम्हांला ती पार पाडता येईल.

पुस्तक परिचय

जपुन टाक पाऊल!

भालचंद्र पेंढारकरांची नाट्यमुसाफिरी वपु यांच्या शब्दांत

लेखक, कथाकथनकार, आर्किटेक्ट, व्हायोलिन व हार्मोनियम-वादक, उत्तम रसिक आणि उत्तम फोटोग्राफर. सुंदर हस्ताक्षर आणि सुंदरतेचं वेड असणारे. सुंदर रस्ता, सुंदर इमारत, सुंदर सजावट आणि मनाने सुंदर असणाऱ्या माणसांचे चाहते. म्हणूनच त्यांच्या कथा ह्या सुंदर मनांवर अणि विचारांवर आधारित असणाऱ्या. मनाचे कंगोरे उत्तम निरीक्षणामुळे मांडता येणाऱ्या. विनोदी कथांमध्येही एक सत्यतेची किनार असणाऱ्या कथा. खरं तर त्या कथा नाहीतच. कारण त्या अतिरंजित किंवा काल्पनिक नाहीत. एका व्यक्तीच्या विचार-आचारांची पद्धत. वपु त्याला 'पॅटर्न' म्हणायचे. वपुंनी पॅटर्न्स मांडले. जे आपल्यासहित, आपल्या आवती-भोवती दिसतात. आणि म्हणूनच त्या पॅटर्न्सना दाद मिळते. विनोदी कथांमधून हसवता-हसवता एक शल्य भिडत राहातं आणि चटका लावून जातं. ही अशीच जीवनाची तऱ्हा आहे, हे सहज सोप्या शब्दांत आकलन होत जातं. महाराष्ट्र सरकारनं त्यांना 'उत्तम लेखक' म्हणून सन्मानित केलं आहे. पु.भा. भावे पुरस्कारही त्यांना प्राप्त झाला. फाय फाउंडेशनने त्यांच्या साहित्याची दखल घेऊन अमेरिकेत भरलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद बहाल केले. अनेक 'रंग मनाचे' दाखविणाऱ्या वपुंना अनेक जण आपला 'पार्टनर' मानतात. हा पार्टनर आजही अनेकांच्या मनांत अगदी खोलवर विराजमान झालेला आहे. २५ मार्च, १९३२ ते २६ जून, २००१... आणि गणती पुढे चालूच आहे. कारण वपु काळे ह्यांचा काळ संपलेला नाही. त्यांचा हा विचारांचा 'हुंकार' अजूनही 'वन फॉर द रोड' करता दिला-घेतला जातोय. हा 'दोस्त' असाच दोस्ती निभावत राहणार आणि रसिक वाचक वपुंच्या कथांमधून प्रत्येक पॅटर्नला भेटत राहणार.

निवेदक
भालचंद्र पेंढारकर

लेखक
वसंत पुरुषोत्तम काळे

काही सुखद, स्फूर्तिदायक क्षणांसाठी, व्यक्तींसाठी आपण जगतो. संसारातली सुखदुःखं विसरण्यासाठी नाटकाला येणाऱ्या प्रेक्षकांच्या आनंदासाठी आपण जगतो. तास न् तास रांगेत उभं राहून तिकिटं काढणाऱ्या रसिकांसाठी आपण आपले घाव विसरायचे असतात. एखादा कंट्रोलर, कलाकारासाठी जादा गाडी सोडतो आणि ड्रायव्हरही बेफाट वेगानं गाडी चालवतो. कलाकाराला नाटकाच्या वेळेत गावी पोहोचल्याचा आनंद मिळवतो. दौऱ्यावर निघालेल्या 'गोवा हिंदू असोसिएशन'च्या नावाचा फलक रेल्वेच्या डब्यावर दिसताच 'रायगडला जेव्हा जाग येते' या नाटकाची आठवण होऊन, कोण्या एका स्टेशनवरचा वर्तमानपत्रवाला पोऱ्या हातातले सगळे अंक, पैसे न घेता कलाकारांना वाटून टाकतो व स्वतःवरच खूष होऊन प्लॅटफॉर्मवरून पळत जातो. या शुद्ध आनंदासाठी, निरपेक्ष प्रेमासाठी ज्ञानेश, हाच व्यवसाय करायचा असं मी तुला सांगतो.

('जपुन टाक पाऊल!' पुस्तकातून...)

आज माझ्याऐवजी हा गाईल!

'या नारदमुनी, तुमच्या तोंडून हरिभजन ऐकायला आम्ही उत्सुक आहोत.'

प्रत्यक्ष श्रीशंकरांनी, नंदीच्या भजनबंदीचा हुकूम मोडून, हरिभक्तीचं गीत गायला नारदांना सांगितलं.

गोविंदरावांनी ऑर्गनमधून परत स्वर वाजवले,

'रमारमण श्रीरंग...'

भजन सुरू केलं मी आणि पुनः भूतकाळात गेलो.

काय योग असतात एकेक! 'जय जय गौरीशंकर' मधले काही काही प्रसंग, माझ्या डोळ्यांसमोर, भूतकाळातले- माझ्याच जीवनातले प्रसंग उभे करतात.

'हरिस्तवन सुरू करा' ही महादेवांची आज्ञा नारदाला जणू आकाशवाणीसारखी वाटली आणि मलाही भजन म्हणता म्हणता आठवली ती 'आकाशवाणीच.'

नभोवाणीचं मुंबई केंद्र- साल होतं १९४१. महिना आठवत नाही.

स्टेशन डायरेक्टर बुखारी मला एकाएकी म्हणाले,

''बुवांचा आवाज या एअरकंडिशनिंगमुळे एकाएकी बसलाय. त्यांना दम्याचा त्रास सुरू झालाय.''

''मग काय करू या?''

''बुवा म्हणतात, माझ्याऐवजी आज चंदू गाईल.''

''छे छे, भलतंच! बुवांचं गाणं कुठे? माझं कुठे? मला जमणार नाही.'' पण बुवांनी माझं ऐकलं नाही. बुखारींनी आग्रह केला; बुवांनी आशीर्वाद दिला. कार्यक्रमाला जेमतेम अर्धा तास उरला होता. शेवटी मनाचा हिय्या केला. कार्यक्रमाला सुरुवात केली. बुवांचा आवडता राग 'दरबारी कानडा' मी गायलो. बुवांचा आणि बापूंचा दोघांचाही हा आवडता राग. चीज होती 'हजरत तोरे' आणि 'नैन सो नैन.' दरबारी कानडा यासारखा धीरगंभीर राग. आयुष्याची सुरुवात या अशा रागाने झालेली; आपल्या भावी जीवनात या रागदारीसारखेच गंभीर प्रसंग आहेत, याची मला तेव्हा कल्पना तरी होती का?

बुवांच्या ऐवजी मी गायलो, आणि नभोवाणीकडून पहिलावहिला चेक मिळवला.

परिस्थिती फार बिकट होती. चालत चालत रिझर्व बँकेत गेलो चेक वटवायला. स्वतःचं खातं तर नव्हतंच. काउंटरवर चेक ठेवला तर क्लार्कनं सांगितलं, ''हा चेक पास व्हायचा नाही. साहेबांना भेटा.''

मी धास्तावलो. 'काय प्रकार असेल बुवा?' असं म्हणत म्हणत साहेबांसमोर जाऊन उभा राहिलो. तो रुबाबदार चेहऱ्याचा, हसतमुख, आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा माणूस पाहून थोडी काळजी कमी झाली. असा माणूस उगीचच कुणाला 'तकलीफ' देईल असं वाटेचना. ती व्यक्ती म्हणाली,

''चंदूच ना तू? बैस.''

मी बसलो.

''मी बाबूराव देसाई. बापूंचा व माझा फार स्नेह होता. तुझं गाणं परवा ऐकलं रेडिओवर. मला आवडलं. तू इथं येणार याची खात्री होतीच. तुझी भेट व्हायला हवी म्हणून चेक अडकवून ठेवला मुद्दाम.''

मला काय बोलावं ते सुचेना.

''इथं कुठे उतरलास?''

''नक्की जागा अशी नसते.''

''दॅट्स ऑल राईट! आता मी तुला आणि बुवांना कायमचं आमंत्रण देऊन ठेवतो. पुढच्या वेळेला तुम्ही दोघांनी माझ्या घरी उतरायला हवं.''

मी 'हो' म्हणून त्यांचा निरोप घेतला. बुखारीसाहेबांनी मला मग वारंवार कार्यक्रम द्यायला सुरुवात केली. पण त्यानंतर मी पुनः देसायांना भेटलोच नाही. त्यांच्या सौजन्यशील आमंत्रणाचा आपण लगेच फायदा घेतला, असा अर्थ होईल या धास्तीपायी, मी पुनः त्यांना भेटलो नाही. त्यांची व माझी गाठ पडली ती १९४२च्या एप्रिल महिन्यात- 'हाच मुलाचा बाप' नाटकाच्या वेळेला.

नाटकाकडे वळण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती, पण ती माझी इच्छा, नियतीची नाही!

'स्वयंसेवक'चे दोन प्रयोग आटोपल्यावर मी पुण्याला परतलो; फक्त संगीतसेवा या निश्चयानं. पण तसं घडलं नाही. पुनः 'स्वयंसेवक'साठी

आमंत्रण आलं. मुंबईत दोन प्रयोग झाले आणि जातीय दंगा उसळला. त्यानंतर कंपनीला मुक्काम हलवावा लागला. तिसरा प्रयोग कंपनीनं कल्याणला ठरवला आणि मला आमंत्रण पाठवलं. मी नकार देणार होतो; पण या वेळी मला 'पन्नास रुपये बिदागी देऊ' असं सांगण्यात आलं. पैशाची गरज तर होतीच. मी कबूल केलं.

प्रयोगाच्या दिवशी कल्याणला हजर झालो, आणि त्या दिवशी तिथलं वातावरण पाहून डोकं फिरून गेलं. तो शनिवार होता. माझा उपास होता. 'तुकाराम थिएटरवर' शुकशुकाट होता. प्रयोग असल्याच्या जबाबदारीची चिन्हं कुणाच्याही चेहऱ्यावर नव्हती. मागील प्रयोगाच्या वेळची काही प्रमुख मंडळी, प्यायलेली दिसली. भार्गवराम सोडून कुणीही माझी चौकशी केली नाही. ते सर्व पाहून उबग आला. प्रयोग करायचा म्हणून केला गेला. त्या प्रयोगाची नशा तरी कशी चढावी? चांगल्या कलाकृतीच्या निर्मितीची एक झिंग असते. नाटकाच्या प्रयोगाचीही एक सुखद नशा असते. सुखही किती बोचरं असतं याचा प्रत्यय देणारा तो एक सुखद सोहळा असतो. पण ती नशा चढण्यासाठी माणूस कोरा असावा लागतो. आधीच 'नशा' करून प्रयोग करणाऱ्या माणसाला प्रयोगाची नशा कशी चढावी?

नाटक संपलं. सर्व जण निघून गेले. मी एकटाच प्रेक्षागारात, अंधारात बसून राहिलो. माझ्याकडे लक्ष गेलं ते फक्त स्टेज मॅनेजर श्री. विनायक बेहेरे यांचं आणि भार्गवरामचं. त्यांनी मला चादर वगैरे देऊन, माझी स्टेजवरच झोपायची व्यवस्था केली.

माझं डोकं आणखीनच भडकलं. पुनः एकवार तोच निश्चय! इतःपर नाटक नाही. दुसऱ्या दिवशी स्वखर्चानं पुण्यास परतलो; कारण सहदेव कंत्राटदारानं पैसे कबूल करून दिले नाहीत.

पुनः आमंत्रण!

नियती थकत नसते. माझ्या होकार-नकाराची, इच्छे-अनिच्छेची, सुखदुःखाची, आसक्ती-परावृत्तीची तिला पर्वा नव्हती.

प्रयोग फलटणला. नाटक 'स्वयंसेवक'च पण भूमिका 'जगूची' नसून 'ऑर्गनवाल्याची'. आमंत्रण पत्रानं आलं होतं. कंपनीचा ऑर्गनवाला आजारी पडला होता. मला साथ करायला बोलावलं होतं.

मी गेलो. पण फलटणला पोहोचल्यावर समजलं की त्यांची पत्रातली ती

शुद्ध थाप होती. भूमिका जगूचीच करायची होती.

काम करावं लागलं!

त्यानंतर पुनः आमंत्रण.

हे मात्र मी नाकारू शकत नव्हतो. कारण, त्या वेळचं कारण फार फार निराळं होतं. बापूंची पहिलीवहिली जाहीर पुण्यतिथी होती. मार्चची १५ तारीख, साल १९४२. गोरेगावकर नावाच्या कंत्राटदारानं लावलेला तो प्रयोग. मी काम तर करणारच होतो; तरीही मनाविरुद्ध गोष्टी फार होत होत्या. त्या प्रयोगाची जाहिरातच मला आवडली नव्हती. 'राजहंस नाट्यमंडळा'तर्फे होणारा, 'केशव-नारायण संयुक्त प्रयोग' अशी ती जाहिरात. बापूंची पुण्यतिथी आणि त्यांच्या नावाचा त्यात उल्लेखही नाही. त्या वेळी दामलेला-म्हणजे नूतन पेंढारकरला मी म्हणालोही, की केशवराव व नारायणराव यांच्या पायाजवळही उभं राहण्याची योग्यता नसलेले तू आणि मी; मी कामच करत नाही. पण गोरेगावकरांनी समजूत घातली. परवानगी मिळवण्यासाठी असं छापावं लागलं म्हणून सांगितलं. ती थाप मला त्या वेळी खरी वाटली.

कसं का होईना, मी 'जगू' म्हणून पुनः उभा राहिलो. माझ्या बापूंची पहिल्यांदा जाहीर स्वरूपात पुण्यतिथी साजरी होत होती. मी बापूंचा वारस. मी त्याला साथ देऊन पहिली श्रद्धांजली वाहायची नाही, म्हणजे काय?

बॉम्बे थिएटर तुडुंब भरलं होतं.

तीन घंटा झाल्या. उदाधुपाचा वास दरवळला. ते वातावरण आता परिचयाचं झालं होतं. तरी मी भांबावलो होतो. पाणावलो होतो. बापूंच्या आठवणीनं जिवाची घालमेल होत होती.

आज त्यांची पुण्यतिथी. मी बापूंनी केलेली भूमिका पुन्हा करणार. त्यांच्या स्मृतिदिनाला!

पडदा वर गेला. प्रेक्षकांच्या भारावलेल्या उत्सुक नजरा रंगमंचाकडे वळल्या कुजबुज थांबली, श्वासही रोधले गेले आणि–

आणि–

तिसऱ्या घंटेला गेलेला पडदा, प्रयोग सुरू होण्यापूर्वीच, तसाच खाली आला!

❖

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

अभिप्राय



अमृतवेल	:	**वि. स. खांडेकर**
पृष्ठसंख्या	:	**१६०**
किंमत	:	**रु. १५०/-**

'अमृतवेल'ने खूप काही दिलं

अमृतवेल...

या पुस्तकानं जगण्याला दिशा दिली. हे पुस्तक मेंदूत व हृदयात मुक्कामाला आलं आणि तिथेच कायमचं विराजमान झालं.... हे मात्र खरं...! मूर्ती लहान, कीर्ती महान अशी कथा आहे या पुस्तकाची. पुस्तकाची पाने कमी, किंमत कमी आहे; पण... पुस्तकाचा विषय विश्वव्यापक आहे. या पुस्तकात ठिकठिकाणी विचारमंथन दिसतं.

मानवी भाव-भावनांवर लिहिताना वि. स. खांडेकरांची लेखणी चिरंतन सत्य अधोरेखित करताना दिसते. खूपच बोलकी होते.

या पुस्तकानं मला नवे विचार दिले. जगण्याचं नवं बळ दिलं. मीसुद्धा आत्महत्या करण्याचा विचार करत होतो, त्या वेळी हे पुस्तक माझ्या हातात पडलं...!

जीवन म्हणजे काय? जीवन कसं जगावं? माणूस म्हणून कसं वागावं? या नेहमी पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरं या पुस्तकात सहज मिळतात. माझ्या मते हे पुस्तक वाचल्यावर कुठलाच माणूस आत्महत्या करणार नाही, इतकी या पुस्तकाची ताकद आहे. मानवी जीवनात वासना किती महत्त्वाची? प्रीती किती महत्त्वाची? या प्रश्नांची उत्तरंसुद्धा या पुस्तकात सापडतात.

खरंच...

ज्ञानाचा स्फोट व्हावा तसा वि. स. खांडेकर यांनी या पुस्तकात जबरदस्त लिखाण केलं आहे.

या पुस्तकात आपणास दिसतं की, पुस्तकांच्या दुनियेत रमताना स्वत:ला कमी समजून एकटा पडत जाणारा, भरकटणारा देवदत्त आणि सर्व ठीक असताना, काही समजून घ्यायचं असताना चिडचिड करणारी वसू आणि देवदत्तच्या आईचा तो मोहाचा एक क्षण. देवदत्तच्या वडिलांचं अमर्याद संपत्तीप्रेम, लालसा... या गोष्टींकडे बघताना अनेक प्रश्न पडतात, काही प्रश्नांची उत्तरं मिळतात तर काही कायम राहतात.

नंदा आणि दासबाबूंचं बोलणं म्हणजे दोन महान पंडितांनी जीवनावर केलेलं भाष्य वाटत राहतं...आणि या पुस्तकानं माझ्यात घडवलेला ठळक बदल म्हणजे मी पत्र लिहू लागलो. आजही माझ्या मनातल्या गोष्टी मी पत्राद्वारे व्यक्त करतो. अनेकांना ही पत्रं खूप आवडतात. एक छान आठवण

सांगायची म्हणजे प्रसिद्ध विचारवंत आ. ह. साळुंखे सर यांचा मला फोन आला... ''तुमची पत्रं खूपच छान असतात हो!''

मी फक्त धन्यवाद म्हणत राहिलो. मला वाचनाची आवड लागली. लिखणाचीही लागली! त्याला हे पुस्तक कारण आहे. लिखाण करताना, जीवन जगताना हे पुस्तक पुन्हा पुन्हा बळ देत राहतं.

हे पुस्तक जीवनाशी एकरूप झालं आहे. शेवटी एक वाक्य मी छातीठोकपणे म्हणू शकतो की,

'अमृतवेल' या पुस्तकानं मला विचारी बनवलं.

-देविदास महादेव सौदागर

मोबा. ९१७५५४६५९३

❖

T BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

टी बुक क्लब

या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹१०० भरून उपलब्ध असलेली कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त

५वी आवृत्ती

भाऊबीज

वि. स. खांडेकर

संपादक

डॉ. सुनीलकुमार लवटे



किंमत : १६०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

'भाऊबीज' वि. स. खांडेकरांच्या कथालेखनाच्या पहिल्या दशकातील असंकलित राहिलेल्या कथांचा संग्रह. यात खांडेकरांची सर्वप्रथम लिहिलेली परंतु अद्याप असंकलित राहिल्याने अपवादस्वरूप वाचली गेलेली 'घर कोणाचे?' कथा आहे.

खांडेकर प्रारंभी कादंबरीची प्रकरणं शोभतील अशा विस्तृत कथा लिहीत. त्यातील त्या काळची (१९१९ ते १९२९) भाषा, भावविश्व, समाजजीवन आज वाचताना मोठं मोहक वाटलं नाही तरच नवल! विसाव्या शतकाच्या प्रारंभीचा मनुष्य, त्याचं जीवन, समस्या, रीतीभाती कशा होत्या हे 'भाऊबीज'मधील भावप्रवण कथा वाचताना उमजतं.

खांडेकरांच्या कथालेखनाच्या उमेदवारीच्या कालखंडातील या कथांतील जीवनउभारी खरोखरच विलक्षण! विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या कथा एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी प्रकाशित होताना वाचणे यास स्वत:चे असे एक अभ्यासमूल्य आहे खरे!

बालनगरी

द कॉमेडी ऑफ एरर्स

विल्यम शेक्सपिअर **अनुवाद : मंजूषा आमडेकर**

कोणे एके काळी इफेसस आणि सिरॅकसमध्ये खूप मोठं शत्रुत्व होतं. या दोन्ही राज्यांमध्ये इतकी वैरभावना होती की एका राज्यातला माणूस दुसऱ्या राज्यात दिसला तरी त्याला ठार करण्यात येई.

एके दिवशी एगॉन, हा सिरॅकसचा वृद्ध व्यापारी इफेससच्या रस्त्यांवरून भटकताना आढळतो. त्याला पकडून राजासमोर उभं करण्यात येतं. राजा दया दाखवतो. तो त्याला दंड भरायला सांगतो. तो त्याला दोन पर्याय देतो - एकतर खूप मोठ्या रकमेचा दंड तरी भर, किंवा मग मरायला तयार हो.

एगॉनकडे अजिबात पैसे नसल्याचं तो राजाला सांगतो. राजा एगॉनला मृत्यूदंडाची शिक्षा सुनावणारच असतो. पण त्याआधी एगॉन राजाला विनंती करतो की त्याची सगळी हकीकत सांगण्याची त्याला शेवटची परवानगी देण्यात यावी. राजा त्याला परवानगी देतो. कारण सिरॅकसच्या एका माणसानं इफेससच्या रस्त्यावर येण्याचं धाडस तरी का केलं, हे त्याला जाणून घ्यायचं असतं. तेही, असं करण्याचे भीषण परिणाम त्याला माहीत असताना!

एगॉन सांगतो की तो सिरॅकसमध्ये जन्माला आलेला होता आणि मग यशस्वी व्यापारी झाला होता. त्याचं एका सुंदर मुलीशी लग्न झालं होतं. त्याचं लग्न झाल्यानंतर लगेचच त्याला कामानिमित्त इपिडॅमनमला जाणं भाग पडतं. आपल्याला इथे बराच काळ घालवावा लागणार आहे असं जेव्हा

त्याच्या लक्षात येतं तेव्हा तो त्याच्या बायकोलाही तिकडे बोलावून घेतो. ती तिकडे आल्यानंतर काही काळातच तिला दोन जुळी मुलं होतात. ते हुबेहूब एकसारखेच दिसत असतात. एगॉन आपल्या दोन जुळ्या मुलांचा सांभाळ करायला लागतो. पण तेवढ्यात ते जिथं रहात असतात त्या खाणावळीच्या मालकीणीचा मृत्यू होतो. तिलाही दोन जुळी मुलं असतात. ती अनाथ होतात. त्यांच्याबद्दल एगॉनला फारच वाईट वाटत असतं. त्यामुळे तो त्यांनाही आपल्या सोबत घेतो आणि आपल्या मुलांचे नोकर म्हणून त्यांचा सांभाळ करतो.

पण तो सिरॅकसला परत यायला निघतो तेव्हा त्याचं दुर्दैव त्याला गाठतं. त्याचं जहाज वादळात सापडतं. इतकं भयानक वादळ त्यांनी आत्तापर्यंत कधीच पाहिलेलं नसतं. लवकरच जहाज बुडायला लागतं. त्यामुळे जहाज वल्हवणाऱ्यांना सोबत घेऊन जहाजाचा कप्तान एका लाईफबोटमध्ये बसतो. एगॉन, त्याची बायको, त्याची दोन मुलं आणि त्याच्या सोबत असणारी आणखी दोन मुलं, यांना जहाजातच सोडून देऊन कप्तान घाईघाईनं तिथून दूर निघून जातो.

आता काय करावं ते एगॉनला सुचेनासं होतं. तो त्याच्या एका मुलाला आणि एका नोकराला जहाजाच्या डोलकाठीला बांधतो. दुसऱ्या दोन मुलांनाही तशाच प्रकारे दुसऱ्या डोलकाठीला बांधायची बायकोला सूचना देतो. ती ताबडतोब त्यानं सांगितल्याप्रमाणं करते. आणि त्यांचं बांधून होतंय, न होतंय, तोच ते जहाज एका प्रचंड खडकावर आदळतं आणि त्याचे दोन तुकडे होतात. एगॉन दोन मुलांसह लांब जातो. त्याची बायको उरलेल्या दोन मुलांसोबत भरकटत या तिघांपासून भलतीकडेच वहात जाते. एगॉन लाटांच्या तडाख्यात हेलकावे खातच असतो. पण तेवढ्यात त्याला काही कोळी त्याच्या बायकोला आणि दोन मुलांना वाचवून काठावर नेताना दिसतात. किमान ते तिघे तरी सुरक्षित आहेत, हे पाहून एगॉनला खूप आनंद होतो.

थोड्या वेळानंतर काही बोटी येतात आणि एगॉनला दोन मुलांसह सिरॅकसपाशी सोडतात. पण त्या संकटामुळं एगॉनची बायको आणि तिच्यासोबतच्या दोन मुलांपासून ताटातूट होते.

त्याच्यासोबत असलेला मुलगा जेव्हा अठरा वर्षांचा होतो तेव्हा तो मनाशी ठरवतो. आपली आई आणि भावाला शोधून काढायचा तो निर्णय घेतो. आपल्या नोकराला सोबत घेऊन तो निघतो. त्या नोकरालाही त्याच्या जुळ्या भावाचा शोध घ्यायचाच असतो. या घटनेलाही आता सात वर्षं उलटून गेलेली असतात. आणि गेल्या पाच वर्षांमध्ये स्वत: एगॉन आपल्या संपूर्ण कुटुंबाला शोधत अख्खं जग फिरून आलेला असतो. कुटुंबाच्या शोधातच तो आता इफेससला आलेला असतो. ही त्याची शेवटचीच यात्रा आहे, हे एव्हाना त्याला कळून चुकलेलं असतं. त्याला आता फक्त आपलं कुटुंब सुखरूप आहे ना, याचीच खात्री करून घ्यायची असते. स्वत:च्या जगण्या-मरण्याची आता त्याला काडीइतकीही पर्वा राहिलेली नसते.

त्याची ती करूण कहाणी ऐकून राजाचंही मन कळवळतं. तो त्याला सांगतो की या राज्याचे कायदे बदलणं काही त्याला शक्य होणार नाही. पण तरीही त्याला त्याचे प्राण वाचवावेत असं वाटत असतं. तो एगॉनला त्या दिवसापुरतं जायला सांगतो. म्हणजे मग एगॉनला कुणाकडून तरी पैसे उसने घेता आले असते. आणि त्या पैशातून दंड भरून एगॉनला स्वत:चा जीव वाचवता आला असता.

ते ऐकून एगॉन खचूनच जातो. कारण तो इफेससमधल्या कुणालाही ओळखत नसतो. इतकी मोठी रक्कम त्याला कर्ज म्हणून देऊ शकेल असा कुणीही ओळखीचा माणूस निदान इफेससमध्ये तरी नक्कीच रहात नसतो. पण ज्या त्याच्या धाकट्या मुलाला तो गेली पाच वर्षं शोधत फिरत असतो तो नेमका त्या वेळी इफेससमध्येच असतो हे मात्र त्याला माहीतच नसतं. आणि त्याचा मोठा मुलगाही तिथेच असतो. त्याला तर त्यानं त्या दुर्दैवी दिवसानंतर पाहिलेलंही नसतं. फार काय, त्याला तो तिथेच राहतो आहे याचीही कल्पना

नसते.

एगॉनची दोन्ही मुलं एकसारखीच दिसत असतात. आणि त्या दोघांनाही लोक 'अँटिफोलस' या एकाच नावानं हाक मारत असतात. गंमत म्हणजे, दोन्ही जुळ्या नोकरांचीही तीच स्थिती असते. तेही दिसायला एकसारखेच असतात आणि त्यांचं नावंही एकच असतं - ड्रॉमियो.

ज्या दिवशी एगॉन इफेससमध्ये आलेला असतो, नेमकं त्याच दिवशी अँटिफोलस ऑफ सिरॅकस आणि ड्रॉमियो हे दोघेही इफेससमध्ये असतात. सिरॅकसमधून इफेससमध्ये येणाऱ्यांच्या बाबतीतला कायदा त्यांना माहीत असतो. त्यामुळे ते आपण एपिडॅमनमचे व्यापारी असल्याचं नाटक करतात.

एगॉनचा मोठा मुलगा, अँटिफोलस ऑफ इफेसस याला त्या वादळापासून कोळ्यांनी वाचवलेलं असतं. पण तेव्हापासून त्याला फार खडतर आयुष्य घालवावं लागलेलं असतं. त्याच्या असहाय्य आईपासून दोन्ही मुलांना कोळ्यांनी हिरावून घेतलेलं असतं. या दोन मुलांना गुलाम म्हणून विकून पैसे कमवायचा त्यांचा विचार असतो. बरेच चढउतार अनुभवल्यानंतर अँटिफोलस ऑफ इफेसस आता शहरातला एक श्रीमंत व्यापारी बनलेला असतो. तो त्याचा ड्रॉमियो नावाचा नोकर आणि ॲड्रियाना नावाच्या सुंदर बायकोसोबत रहात असतो. ती त्या शहरातली एक श्रीमंत स्त्री असते. त्याला त्याची आई आणि बाबा फारसे आठवतच नसतात. कारण त्यांच्यापासून तो जेव्हा दूर झालेला असतो तेव्हा तो फारच लहान असतो. सिरॅकसमधल्या ज्या माणसाला त्या दिवशी पकडण्यात आलेलं असतं, तो माणूस दुसरा तिसरा कुणी नसून आपले बाबाच आहेत हे जर त्याला माहीत असतं तर तो त्यांचा दंड सहजपणानं भरू शकला असता.

तिकडे आपल्या भावाला शोधण्यासाठी आलेला अँटिफोलस ऑफ सिरॅकस हा ही रस्त्यावरून भटकत असतो. रात्रीच्या जेवणासाठी तो ड्रॉमियोला खाणावळीत पाठवून देतो. सभोवताली थोडी चौकशी करून तो ड्रॉमियोबरोबर जेवायला जाणार

असतो. पण त्या शोधादरम्यान त्याचं मन साशंक झालेलं असतं. तो म्हणतो, 'मी म्हणजे महासागरात पडलेला थेंब आहे. असा थेंब, जो सोबतीच्या दुसऱ्या थेंबाला शोधत फिरतो आहे. तो थेंबही त्या महासागरात हरवून गेला आहे.'

स्वत:च्याच नादात तो रस्त्यावरून चालत असतो. तितक्यात त्याला समोरून ड्रॉमियो येताना दिसतो. ड्रॉमियो खाणावळीत आपली वाट पहात का थांबला नसावा, याचं त्याला नवलच वाटतं. त्यामुळं अँटिफोलस ऑफ सिरॅकस त्याच्याकडे जातो आणि त्याला इकडे का आलास म्हणून विचारतो. त्यावर ड्रॉमियो त्याला उत्तर देतो की अँटिफोलसला जेवायला बोलावून आण असा मालकीणबाईंचा निरोप घेऊन तो आलेला असतो. अँटिफोलस ऑफ सिरॅकसचा नोकर ड्रॉमियो हा नेहमीच त्याच्या मालकाची थट्टा करत असतो. किती झालं तरी ते नोकर आणि मालक म्हणून मोठे होण्याऐवजी भावंडांसारखेच लहानाचे मोठे झालेले असतात. तरी पण अँटिफोलस ऑफ सिरॅकसला हा प्रकार जरा अतिरेकीच वाटतो.

पण ड्रॉमियो मात्र पुन्हा पुन्हा त्याला सांगत राहतो की त्याच्या बायकोनं त्याला जेवायला घरी बोलावलं आहे. कारण घरी तिची बहीणही आहे आणि त्या एकत्र जेवण्यासाठी त्याची वाट पहात आहेत. पण अँटिफोलस ऑफ सिरॅकस त्याला एकसारखं सांगत राहतो की त्याला बायको नाहीये, आणि आता ड्रॉमियोनं त्याची चेष्टा करणं थांबवावं. त्यावर ड्रॉमियो सांगतो की मालक काय बोलतोय तेच आपल्याला कळत नाहीये. त्यावर मात्र अँटिफोलस ऑफ सिरॅकस त्याला बडवायला लागतो. मग ड्रॉमियो जो पळत सुटतो तो थेट अँटिफोलस ऑफ इफेससच्या घरी जाऊन पोचतो. कारण तो

दुसरा ड्रॉमियो असतो. घरी जाऊन तो आपल्या मालकिणीला सांगतो की मालक घरी यायला तयारच नाहीत. आणि ते आपल्याला बायकोच नाही, असंही म्हणतायत.

ते ऐकून ॲड्रियानाचं डोकंच फिरतं आणि ती मत्सरानं जळफळायला लागते. तिची बहीण ल्युसियाना त्यांच्याच घरी रहात असते. ती तिला शांत करण्याचा खूप प्रयत्न करते. पण ॲड्रियाना काही ऐकूनच घेत नाही.

दरम्यान अँटिफोलस ऑफ सिरॅकस आपल्या खाणावळीत परत येतो. तिथे त्याला ड्रॉमियो त्याची वाट पहात बसलेला दिसतो. आपली थट्टा केल्याबद्दल तो ड्रॉमियोला चांगलाच झापडणार असतो. पण तितक्यात तिथे स्वत: ॲड्रियानाच येते. त्याच्या समोर जाऊन ती त्याला घरी का येत नाही, असा प्रश्न विचारते. त्यावर अँटिफोलस तिला सांगतो की त्या शहरात त्याचं घरच नसल्यानं घरी जाण्याचा प्रश्नच येत नाही. ते ऐकताच आगीत तेल ओतल्यासारखा ॲड्रियानाचा संताप आणखीनच वाढतो. स्वत:च्याच बायकोला तो ओळख दाखवत नाहीये, असं वाटून ती खूपच चिडते. ॲड्रियानाची समजूत घालणं अशक्य झाल्यामुळे अँटिफोलस ऑफ सिरॅकस आपल्या ड्रॉमियोसोबत नाईलाजानं तिच्याबरोबर आपल्या भावाच्या, म्हणजे अँटिफोलस ऑफ इफेससच्या घरी जातो. तिथे जाऊन भावाची बायको आणि मेहुणीसोबत जेवण करणंही त्याला भाग पडतं. आपण झोपेत लग्न बिग्न तर करून बसलेलो नाही ना, अशी अँटिफोलस ऑफ सिरॅकसच्या मनात शंका यायला लागते. की जे चाललं आहे तेच मुळी त्याच्या स्वप्नात घडतं आहे, तेच त्याला कळेनासं होतं.

❖

२री आवृत्ती

वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध

राम प्रधान



किंमत : ३९५/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

२० नोव्हेंबर, १९६२ला यशवंतराव चव्हाण भारताचे 'संरक्षण मंत्रिपद' भूषविण्यासाठीच दिल्लीला गेले.

'हिमालयाच्या संरक्षणासाठी सह्याद्री' या शब्दांत मराठी जनतेने त्यांना निरोप दिला. पण दिल्लीत दाखल झाल्यानंतर सह्याद्रीला काय मनोव्यथा सहन कराव्या लागल्या याची जाणीव जनतेला झाली नाही. यशवंतरावांनी सर्व व्यथा सहन केल्या व एका वर्षात पंडित नेहरूंचा विश्वास व दिल्लीत आपले विशिष्ट स्थान प्रस्थापित केले. चीनविरुद्ध १९६२मधील युद्धातील पराभवानंतर यशवंतरावांनी सैन्याचे बल व मनोधैर्य उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न केले, तसेच सैन्याला लागणारी सामुग्री, स्वयंचलित बंदुका, दारूगोळा व हे सर्व निर्माण करण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी कारखाने उभारण्याचे कार्य तत्परतेने पार पाडले. त्यामुळे १९६५च्या भारत-पाक युद्धामध्ये भारताला विजय मिळाला. ताश्कंदमध्ये जे काही घडले आणि पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा मृत्यू कसा झाला, यांची उत्तरे यामध्ये सापडतील. या सर्व घटनांचा व युद्धानंतरच्या राजकीय घडामोडींचा ऊहापोह राम प्रधान यांनी या पुस्तकात केला आहे.

'यशवंतरावजी उत्तम व्यूहरचनाकार व जाणते रणनिती विचारवंत होते....'

– पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग

('1965 : War Inside Story' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात)

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे नुकतेच श्री छत्रपती शिवाजी महाराज निकेतन क्रमांक १ या महापालिकेच्या शाळेतील **विद्यार्थ्यांना सान्ताक्लॉजच्या हस्ते नाताळनिमित्त खाऊ व गोष्टीच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले.** या वेळी सान्ताक्लॉजसह शाळेतील विद्यार्थी, शिक्षिका आणि मेहता पब्लिशिंग हाऊसच्या विक्री विभाग प्रमुख संध्या कुलकर्णी.

प्रेस क्लब ऑफ बंगळूरतर्फे देण्यात येणारा **'पर्सन ऑफ द इअर'** हा मानाचा पुरस्कार यंदा **इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुधा मूर्ती यांना प्रदान करण्यात आला.** त्या वेळी (डावीकडे) कर्नाटकचे उपमुख्यमंत्री जी. परमेश्वर.

Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. SDO/Pune City/SR/3/2018 - Date : 1/01/2018
Posting at Marketyard, PSO, Pune 411037.
Publication Date : 09/01/2019 Posting Date : 11/01/2019

आवर्जून वाचावे

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,